फौज नव्हती म्हणून, शिपाई पाहिजे होते त्यांकरितां माणसांना त्यांच्या घरांहून बोलावून आणलीं. **सर एड्वर्ड सेसिल** ह्याकडे ह्या साऱ्या फौजेचें आधिपत्य होतें. त्याला, एकाद्या **स्पानिश** शहरावर हल्ला करावा, आणि **अमेरिके**हून द्रव्य भरून आणणारीं **स्पानिश** जहाजें पकडावीं असा हुकूम होता. त्यानें जहाजें हकारून **केडिझ** नांवाच्या अखातांत जाऊन एक किल्ला घेतला, आणि नंतर तो, अन्नसामग्री जवळ नसतां, वर त्या मुलुखांत कूच करून गेला. त्याच्या हाताखालच्या लोकांच्या हातीं कांहीं द्राक्षांची दारू लागली, ती पिऊन ते झिंगून बेसावध झाले, म्हणून त्याला त्यांना माघारें जहाजांवर नेणें भाग आलें. नंतर तो जहाजें हकारून स्वदेशीं परत जाण्याकरितां निघाला, आणि द्रव्य भरून आणणाऱ्या जहाजांची त्याची गांठ पडण्याला दोन दिवसांचें अंतर पडलें. ह्या स्वारीपासूनच आमच्या तान्ह्या मुलांच्या खोल्यांतलें तें सुप्रसिद्ध गाणें रचलें गेलें. त्याचा अर्थ हा.

केडिझवर केलेली अनर्थकारक स्वारी, आक्टोबर १६२५.

एक अरमार होतें तें **स्पेन** देशीं गेलें,
तें तेथें पोहोंचून जशाचें तसें माघारें आलें.

त्या स्वारीचा विजय होईल म्हणून आशा केलेली होती परंतु तिचा खेद वाटण्यासारखा विचका झाला. तिच्या पायीं भारी कर्ज झालें तें मात्र मागें राहिलें. त्यामुळें राजाला दुसरें एक **पार्लमेंट** पाचारणें भाग आलें.

परंतु प्रतिनिधींची निवडणूक होऊं लागण्यापूर्वी त्यानें आपल्याकडून एक चतुराईची म्हणून युक्ति केली. मागल्या **पार्लमेंटांत** जे अतिशय त्रास देणारे म्हणून सभासद होते त्यांपैकीं **कांहींकांना, पार्लमेंटाचे सभासद निवडतां येऊंच नये अशा हेतूनें, त्यानें शेरिफ**

नेमलें. परंतु ती त्याची युक्ति सर्व व्यर्थ गेली. **पार्लमेंटांत** अशा कपटयुक्तीनें कांहींकांचीं तोंडें जरी बंद केलीं तरी, दुसरे बोलणारे होतेच, त्यांचें तर बोलणें सभेनें ऐकून घेतलेंच असतें. असो, **पार्लमेंटाच्या** दोन्ही सभा भरून कामाची सुरवात होतांच, **कामन्सांच्या** सभेंत **सर जान एलियट** नांवाचा एक सभासद उभा राहून, ज्या गैरव्यवस्थेनें इतकीं पुष्कळ अरिष्टें उद्भवलीं, तिची चौकशी करण्याविषयीं त्यानें सूचना केली, आणि **कामन्सांनीं बकिंगहमवर** त्या गैरव्यवस्थेचा दोषारोप केला, तो येणेंप्रमाणें. "राजाचा खजीना आणि सामग्री हीं देशाचे स्नायु आणि "शिरा होत, त्यांचा **बकिंगहमानें**, चुराडा केला. त्याचे धौताल "खर्च, त्याच्या अतिरिक्त मेजवान्या, त्याच्या आलिजाहां हवे-"ल्या, त्याच्या धुमश्चक्र्या, आणि त्याच्या धुमाळ्या, ह्यांनीं राज्याच्या "महसुलाची उधळपट्टी होत आहे.... कोणाचा कसलाही "हक्क, हितसंबंध, किंवा मालकीसंबंध असो, तो त्याला बा-"धक किंवा प्रतिरोधक होत नाहीं... त्याच्यापासून आ-"मचीं सारीं अरिष्टें उद्भवलीं ... आणि त्यांचे उपाय न के-"ल्याचा सारा दोष त्याच्या माथीं आहे." **कामन्सांच्या** ह्या सर्व तक्रारींविषयीं राजाचें उत्तर म्हणून एवढेंच होतें कीं, त्यानें, तो **एलियट**, आणि त्याच्या सूचनेला पाठबळ देणारा **डिग्झ**, ह्यांला, कैदकरून **टौअरांत** पाठविलें, आणि जेव्हां **कामन्सांनीं** त्या दोघांवांचून आम्ही सभेंत बसणारच नाहीं असें साफ सांगितलें, आणि **बकिंगहमाला** अधिकारावरून दूर केलें पाहिजेच

दुसऱ्या पार्लमेंटांत बकिंगहमवर दोषारोप होतो, १६२६.

राजा पार्लमेंटाचें विसर्जन करतो.

असें मागणें केलें, तेव्हां राजानें **एलियट** आणि **डिग्झ** ह्यांना कैदेंतून मुक्त केलें, परंतु **पार्लमेंटानें** पैका देण्याविषयीं आपली संमति देण्यापूर्वींच त्याचें त्यानें विसर्जन केलें.

आतां **चार्लस** अडचणींत पडला. **राणी हेन्रिएट्टा** हिच्या **क्याथलिक**पंथी सेवकांना त्याला फांटा देणें भाग पडलें होतें, ह्या कारणानें कांहीं वांटे, आणि कांहीं वांटे, **ला रोशेल** एथील **ह्यूगेनोस**, म्हणजे **फ्रेंच प्राटेस्टंट्स** लोक, ह्यांचा, त्यांच्या राजाविरुद्ध पक्ष धरण्याला आपण बद्ध आहों असें त्याला वाटत होतें, ह्या कारणानें, त्याचा **फ्रान्स** देशाचा राजा, **तेरावा लूइ**, ह्याच्याशीं नुकताच कलह उपस्थित झालेला होता. परंतु युद्ध करण्याला त्याला द्रव्य पाहिजे होतें, आणि जरी तो बेकायदेशीर प्रकारानें **टनेज** आणि **पौंडेज** हा कर वसूल करीत होता, आणि देशांत स्थापित झालेल्या धर्माला न अनुसरणाऱ्या **क्याथलिक्स** लोकांना दंड करीत होता, तरी त्याला द्रव्याची फारच तंगी होती. तेव्हां त्यानें आपणाला द्रव्याची "स्वसंतोषानें देणगी" द्यावी म्हणून सर्व देशांत मागणें केलें, परंतु कोणींही कांहीं दिलें नाहीं. नंतर कोणी एकानें त्याला सुचविलें कीं, जरी आपणाला आपल्या प्रजाजनांवर देणगी म्हणून देण्याला जुलूम करवत नाहीं, तरी, उसनवार म्हणून देण्याला त्यांवर आपणाला सक्ती करण्याला हरकत नाहीं, आणि त्यांत फारसा भेदही नाहीं, कारण उसनें घेतलेलें आपण कधीं परत द्याल असा संभवही नाहीं. ही सूचना रुचून त्यानें दरएक कौंटींत, प्रत्येक माणसाकडून त्याच्या ऐपतीप्रमाणें द्रव्य उसनें म्हणून घेण्याकरितां, अधिकार देऊन कामदार पाठविले.

राजा जुलुमानें उसनवार म्हणून पैसा वसूल करतो, १६२७.

फार असंतोष उत्पन्न होतो.

ह्या कृत्यानें किती असंतोष उत्पन्न झाला असेल! ह्याची कल्पना करतां येईल. ट्यूडरांच्या अमलाखालीं देशांत स्वस्थता राखलेली होती, आणि कर हलके केलेले होते. जेम्सानें देखील फक्त जकातींनीं आणि श्रीमंतांपासून पैसा वसूल केलेला होता. परंतु आतां बकिंगहमाचा उधळेपणा, आणि ज्या युद्धांनीं परिणामीं अपयश मात्र जोडलें त्या युद्धांचा खर्च, हीं भागविण्याकरितां, प्रत्येक माणसाच्या खासगी व्यवहाराची किंवा ऐपतीची तपासणी करून त्यापासून जबरीनें पैशाची रकम उसनी म्हणून घेतली. देशाच्या निरनिराळ्या भागांतून एकंदर ऐशीं सभ्य गृहस्थ कांहीं देईनात, तेव्हां त्यांना कैदेंत टाकलें, आणि ज्या गरीब लोकांनीं पैसा देत नाहीं म्हणून सांगितलें, त्यांना शिपायांची कामगिरी करण्याकरितां वेठीस धरलें, किंवा त्यांच्या घरांत शिपायांस चकत्या देऊन राहवयास लावलें.

बकिंग्हमच्या हातून ला रोशेल शहराची सुटका करणें होत नाहीं, १६२८.

शेवटीं युद्धाची तयारी पुरी झाली, आणि बकिंग्हम हा समागमें शंभर जहाजांचें अरमार घेऊन ला रोशेलास जहाजें हकारून गेला. त्या शहराच्या समोर -हे नांवाच्या बेटांत सेन्ट मार्टिन्स नांवाचा किल्ला होता, त्याला त्यानें वेढा घातला, आणि त्या कामांत त्याला यश आलें असतें तर, प्राटेस्टंट्स ह्यांना मदत करण्याच्या उद्देशानें तें युद्ध आरंभिलेलें होतें, म्हणून लोकांना तें प्रिय झालें असतें. परंतु पूर्वीप्रमाणेंच सारी बदछान झाली. फ्रेंचांनीं वेढा देणाऱ्या जहाजांची फळी फोडून त्या किल्ल्यांत अन्नसामग्री पोहोंचविली. बकिंग्हमाच्या फौजेंत रोग

उत्पन्न होऊन शिपाई पटापट मेले, आणि मदतीकरितां नवीन फौज मिळविण्यासाठीं त्याला स्वदेशीं माघारें यावें लागलें.

सर्व इंग्लिश प्रजाजनांना भारी दिलगिरी उत्पन्न झाली. ते पूर्वी फार बलाढ्य होते, त्यांचाच आतां इतर राष्ट्रांतील लोकांच्या समोर असा सतत अपमान होऊं लागला. ते पूर्वी न्याय किंवा कायदा आणि स्वातंत्र्य ह्यांविषयीं गर्व वाहत होते, त्यांनाच आतां, कसलाही गुन्हा केलेला नाहीं अशा माणसांना कैदेंत टाकलेलें पाहणें भाग आलें. खेड्यापाड्यांत राहणाऱ्या पांच सभ्य गृहस्थांना तुरुंगांत टाकलेलें होतें, त्यांनीं न्यायाधीशांकडे **हेबियस कॉर्पस**[1] (शरीर हाजीर कर) ह्या नांवाच्या लेखी हुकुमाकरितां अपील केलें. त्या हुकुमानें जेलर, म्हणजे तुरुंगावरचा अधिकारी, ह्याला, त्यांत लिहिलेल्या कैद्याला कोडतांत हाजीर करून, अमुक गुन्ह्याकरितां त्याला कैदेंत ठेवावें असें वारंट, म्हणजे परवाना किंवा अधिकारपत्र, असेल तें दाखवावें लागे. आतां ह्या पांच गृहस्थांविरुद्ध कसल्याही गुन्ह्याचा आरोप नव्हता, कारण, उसनवार पैसा देत नाहीं म्हणणें हा कांहीं गुन्हा नव्हता, आणि **माग्ना कार्टा** नांवाच्या सनदेंत ह्याप्रमाणें स्पष्ट लेख होता;

पांच सभ्य गृहस्थ आपणांला कैदेंत टाकल्याबद्दल अपील करतात.

"देशांतल्या कायद्याच्या आधारावांचून किंवा बरोबरीच्या लोकांच्या "कायदेशीर निर्णयावांचून कोणाही माणसाला पकडतां किंवा "कैदेंत ठेवतां कामा नये." असें असतांही, त्या न्यायाधीशांनीं, राजा नाखुश होईल ह्या भीतीनें, त्या पांच गृहस्थांना तुरुंगांत माघारें पाठविलें.

---

१ त्या हुकुमाच्या आरंभीं हेबियस कॉर्पस हे शब्द असत, त्यांवरून त्याला तें नांव पडलें. त्या शब्दांचा अर्थ शरीर हाजीर कर.

आतां पार्लमेंटानें त्या पांच गृहस्थांस कैदेंतून सोडलें पाहिजे असें अधिकारानें मागणें केलें, आणि त्यांतले **सर टामस वेन्टवर्थ, व सर जान एलियट,** हे दोघे सभासद फार धाडसाचे शब्द बोलले. त्यांपैकीं **वेन्टवर्थ** म्हणाला, " आमचीं प्राचीन स्वा-" तंत्र्यें आम्हांला रक्षण केलीं पाहिजेत. आमच्या पूर्वजांनीं के-" लेल्या कायद्यांची नवे कायदे करून आम्हाला मजबुती केली " पाहिजे." नंतर **कामन्सांनीं** एक **"पिटिशन आफ् राइट"** (हक्काविषयीं अर्ज) नांवाचा, गैरकायदा कर बसविणें, बेनेव्होलेन्सिझ (उपकार बुद्धीनें देणग्या) नांवाची पट्टी वसूल करणें, आणि पाहिजे त्या माणसाला गुन्हा नसतां कैदेंत टाकणें, ह्या तीन गोष्टींविरुद्ध, अर्ज तयार केला. त्यांत राजाचें वचन ज्या गोष्टींविषयीं मागितलें होतें, त्या येणेंप्रमाणें:– (१) **पार्लमेंटा**च्या संमतीवांचून कोणाही स्वतंत्र माणसाकडे उसना पैका मागूं नये; आणि (२) योग्य कारण दाखविल्यावांचून कोणाही स्वतंत्र माणसाला तुरुंगांत पाठवूं नये किंवा कैदेंत ठेवूं नये. **हौस आफ् लार्ड्स** ह्या सभेनें तो अर्ज मान्य केला, आणि जरी राजानें त्या अर्जाच्या विरुद्ध फार धडफड केली तरी, पैशाविषयीं तो इतका अडचणींत पडलेला होता कीं, त्याला हेका सोडणें भाग आलें, आणि १६२८ त जूनच्या ७ व्या तारिखेस, त्या अर्जांत दाखल असलेल्या गोष्टींविषयीं अर्जांत मागितल्याप्रकारें कायदा झाला. तेव्हां सर्व देशभर मोठमोठाले उत्साहप्रदर्शक अग्नि पेटविले, आणि घांटांचे गजर झाले, त्यांवरून आपलें स्वातंत्र्य स्थापित झालें म्हणून लोकांना किती आनंद झाला हें कळून आलें, आणि **चार्लसानें** मागितला होता तितका पैसा **कामन्सांनीं**

पिटिशन आफ् राइट (हक्काविषयीं अर्ज), तारीख ७ जून १६२८.

दिला. परंतु जेव्हां त्यांनीं **बकिंग्हमाला** बरतरफ करावें असें पुनः मागणें केलें, तेव्हां तें त्यानें ऐकून सुद्धां घेतलें नाहीं, आणि त्यानें **पार्लमेंट** कांहीं मुदतीपर्यंत तकूब केलें.

कामन्सांना, तो राजाच्या प्रेमांतला **बकिंग्हम** ह्यावर पुनः दोषारोप करण्याचा प्रसंगच उरला नाहीं. आगस्टच्या २३ व्या तारिखेस, तो **बकिंग्हम, ला रोशेल्लवर** दुसरी मोहीम करण्यासाठीं **पोर्ट्स्मौथ** एथून निघत होता इतक्यांत, ज्याला पूर्वीं फौजेंत बढती दिलेली नव्हती, व जो **बकिंग्हमाला** सकल जनांचा शत्रु मानीत होता, अशा **जान फेल्टन** नांवाच्या एका आवेशी किंवा धर्मपिशा माणसानें, **पब्लिक हाल** (सार्वजनिक दिवाणखाना) नांवाच्या इमारतीच्या दरवाज्यांत, " तुझ्या आत्म्यावर **देव** दया करो, " अशी मोठ्यानें आरोळी मारून, त्या **बकिंग्हमाच्या** उरांत काळिजाला पोहोंचे अशी जोरानें सुरी भोसकली. तेव्हां तेथें घप्पाघोळ उडाला. तो संपला तेव्हां तो खून करणारा माणूस, डोकीवर टोपी नसतां, वरून खालीं, आणि खालून वर, पायीं फिरत असलेला सांपडला. त्यानें पळून जाण्याचा प्रयत्न केलेला नव्हता, आणि त्याला पुढें फांशीं दिलें.

बकिंग्हमाला दग्यानें ठार मारलें, ता० २३ आगस्ट १६२८.

ह्या प्रकारें सर्वच द्वेष करीत होते ज्याचा असा तो **बकिंग्हमचा ड्यूक** मरण पावला, तेव्हां लोकांना फार आनंद झाला. परंतु **चार्लसानें बकिंग्हमाचा सेक्रेटरी, वेस्टन,** ह्याला बडा किंवा मुख्य खजीनदार केलें, आणि सर्व गोष्टी पूर्वीप्रमाणें चालूं लागल्या. **इंग्लंडचें** अरमार **ला रोशेल्लला** गेलें, परंतु त्याला यश आलें नाहीं, आणि १६२९ त **चार्लसानें फ्रान्स** देशाशीं तह केला. **रिशलू** नांवाचा **फ्रान्स** देशाचा मुख्य प्रधान होता,

त्यानें **ला रोशेल** सर केलें, आणि सर्व दुनियेंत **इंग्लंड**चा दर्जा त्यामुळें पराकाष्ठेचा खालावला. **यूरोप**खंडांत सर्व **क्याथलिक्स** लोकांची खरोखर सरशी होत चालली होती, आणि ह्या कारणामुळेंच, जेव्हां राजानें **बाथ** आणि **वेल्स** ह्या दोहों गांवचा **लॉड** नांवाचा **बिशप** ह्याला बढती देऊन **लंडन**चा **बिशप** केलें, तेव्हां **इंग्लंडां**तील लोक फार अस्वस्थ झाले. **लॉड** ह्याला, **क्याथलिक्सां**प्रमाणें, श्रीमंती, सजवणुका किंवा थाटमाट, आणि मोठ्या संस्कारांच्या अवडंबरासह उपासना, ह्यांची आवड असे, आणि तो नेहमी राजाचा "ईश्वरदत्त हक्क," आणि अनिर्बंध अधिकार, ह्यांचें समर्थन करी. हा अनिर्बंध अधिकार, **चार्लस** आतां मनास येईल तेथें टन्नेज आणि पौन्डेज हा कर बसविण्याच्या कामीं चालवीत होता, आणि जे व्यापारी तो कर देत नाहीं म्हणत, त्यांचा माल तो जप्त करवी.

लॉड ह्याला लंडनचा बिशप केलें, १६२८.

ह्या प्रकारें जप्त केलेल्या मालापैकीं कांहीं माल **पार्लमेंटा**च्या एका सभासदाचा होता, आणि जेव्हां १६२९ च्या जान्युअरींत, **हौस आफ् कामन्स** ही सभा पुनः भरली, तेव्हां तींतील **सर जान एलियट** नांवाच्या सभासदानें जकात खात्याकडील ज्या कामदारांनीं तो माल जप्त केला असेल त्यांना बोलावून आणून सजा करावी, अशी सूचना केली. त्या कामदारांनीं, हाजीर होऊन, आम्हीं राजाच्या हुकुमानें तो माल जप्त केला, अशी तकरार केली, आणि राजानें **कामन्सांच्या सभेचा स्पीकर**, म्हणजे अध्यक्ष, ह्याला **सभा** तकूब करण्यास आज्ञा केली. त्या वेळीं आज्ञेप्रमाणें तकूब तर केली, परंतु जेव्हां ती सभा पुनः जमली, आणि पुनः

तकूबीचा हुकूम आला, तेव्हां तो हुकूम सभासद ऐकेनात. स्पीकरानें खुर्चीवरून उठण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु दोघां सभासदांनीं त्याला खुर्चीवरून उठूं न देतां दाबून धरलें, आणि सभेच्या दिवाणखान्याच्या दरवाज्यांना कुलुपें घातलीं. इतक्यांत एलियटानें सर्व सभेचें मत घेण्याकरितां सूचना पुढें मांडली ती येणेंप्रमाणें. "जे कोणी धर्मांत फेरफार करूं पाहतील, किंवा "पार्लमेंटानें मंजूर केलेले नाहींत, असे कर किंवा जकाती जे "कोणी घेतील किंवा देतील, ते राजद्रोही आहेत." सभासद ह्या सूचनेला "होय होय" अशा आरोळ्या ठोकून अनुमोदन देत आहेत तोंच, राजाच्या हुकुमानें गाडदी शिपाई दिवाणखान्याचे दरवाजे फोडून उघडण्याकरितां आले. इतक्याची गरजच राहिली नव्हती. सभा तत्काल तकूब झाली, आणि राजानें पुढें थोड्या दिवसांनीं त्या पार्लमेंटाचें विसर्जन केलें. त्यानें एलियट आणि इतर कित्येक सभासद ह्यांना कैदकरून तुरुंगांत पाठविलें, परंतु त्यांपैकीं जे शरण आले त्यांना लवकरच कैदेंतून सोडलें. एलियट, व्हालेन्टाइन, आणि स्ट्रोड, ह्या तिघांनीं मात्र, पार्लमेंटाच्या हक्कांविरुद्ध आम्ही कांहीं बोलणार नाहीं असें साफ सांगितलें, आणि एलियट हा साडेतीन वर्षें टौअरांत कैदेंत राहून, तेथेंच मेला. स्वातंत्र्याच्या काजाकरितां किंवा पक्षाकरितां तो पहिलाच प्राण देणारा होय.

पार्लमेंट राजाला जुमानीत नाहीं, १६२९.

बैदा होऊन पार्लमेंटाचें विसर्जन होतें.

सर जान एलियट ह्याचा मृत्यु, १६३२.

पुढील अकरा वर्षें, चार्लसानें पार्लमेंटावांचून राज्यकारभार केला, आणि त्याचे मुख्य प्रधान, वेस्टन, लॉड, आणि वेन्टवर्थ

हे तिघे होते. **एलियट** आणि **पिम** ह्यांसारखे पुरुष **पार्लमेंटाचें** स्वातंत्र्य रक्षण करण्याकरितां कसे उदयास आले होते, हें पाहण्यांत आलेंच आहे. त्यांच्या बरोबरीचे निग्रही किंवा दृढनिश्चयी असे

वेन्टवर्थ आणि लॉड.

दोघे पुरुष, **वेन्टवर्थ** (हा पुढें लार्ड स्ट्राफर्ड हा किताब पावला), आणि **लॉड,** ह्यांनीं आतां राजाच्या अनिर्बंध अधिकाराचा पुरस्कार मांडला. राजाचा अनिर्बंध अधिकार, व **पार्लमेंटाचें** स्वातंत्र्य, ह्या दोहोंपैकीं कोणाचा विजय होतो, ह्या प्रश्नाचा आतां उलगडा व्हावयाचा होता. **वेन्टवर्थ** हा फार महत्वलोभी होता, त्यानें **बकिंगहम** मृत्यु पावतांच आपल्या जुन्या मित्रांशीं असलेलें सख्य तोडून राजाचा पक्ष स्वीकारला होता. तो **कौन्सिल आफ् धि नार्थ,** म्हणजे उत्तरेकडील मुलुखाचा राज्यकारभार चालविण्यासाठीं नेमिलेलें मंत्रीमंडल, ह्याचा अध्यक्ष झाला, आणि त्यानें लोहदंडानें, म्हणजे अतिशय करडेपणानें, अमल केला. **लॉड** हा त्याहून फार इमानी किंवा नेकीचा, आणि एकचित्त, होता खरा, परंतु दुर्दैवानें, तो उदार मनाचा नसून स्वमताभिमानी होता. ह्या दोघां पुरुषांनीं प्रथम आपल्या धन्याचा नाश करण्याच्या कामीं मदत केली, आणि नंतर त्याच्या पक्षाकरितां त्यांनीं आपले प्राण खर्चीं घातले.

पहिल्या पांच वर्षांत बाहेरून सर्व गोष्टी शांत किंवा निवांत होत्या. नेमस्त विचारी पुरुष होते त्यांना, **कामन्सांनीं** अतिक्रम केला, आणि राजाचा अपमान केला, असें वाटे. **वेस्टन** हा सावध खजीनदार होता, व त्यानें करांनीं लोकांना जर्जर केलें नाहीं म्हणून लोक संतुष्ट होते. ह्याच काळीं, म्हणजे १६३५ त, देशांतल्या दे-

देशांतल्या देशांत टप्पालाचा कारखाना स्थापित होतो, १६३५.

शांत टप्पालाचा कारखाना पहिल्यानें स्थापला, आणि पत्रें आठवड्यांतून एकदा जाणाऱ्या डांकेनें जाऊं लागलीं. भाड्याच्या गाड्या प्रथम १६२५ त सुरू झालेल्या होत्या, त्या आतां विपुल झाल्या, परंतु त्यांना दाटीच्या रस्त्यांतून फिरूं देत नसत; आणि लोकांना शहरांतल्या शहरांत वाहून नेण्याकरितां, १६३४ त नालक्या वहिवाटींत आल्या. ह्याच काळाच्या सुमारास एक शास्त्रीय शोध लागला. **हार्व्ही** नांवाचा राजाचा वैद्य होता, त्यानें १६२८ त आपला रुधिराभिसरणप्रतिपादक ग्रंथ छापून प्रसिद्ध केला.

हार्व्ही, जार्ज हर्बर्ट, आणि मिल्टन.

खेड्यापाड्यांत शांतिसुखांत माणसांच्या आयुष्याचा काळ कसा जाई, ह्याची थोडी झुलुक, **जार्ज हर्बर्ट** नांवाचा साळ्याभोळ्या अंत:करणाचा धर्मोपदेशक असून कवि होता, त्याच्या चरित्रांत मिळते. त्यानें आपलीं तऱ्हेवाईक धर्मविषयक काव्यें **वुइल्टशायरां**तील **बेमर्टन** गांवांत एक **रेक्टरी**, म्हणजे पाद्री राहवयाचें घर, म्हणून होतें त्यांत रचलीं, आणि पुढें येणारा अरिष्टाचा काळ सुरू होण्यापूर्वींच १६३३ त तो महानिद्रेप्रत गेला. पुढें १६३४ त **मिल्टन** नांवाच्या कवीनें **बकिंग्हमशायरां**तील **हॉर्टन** नांवाच्या गांवीं आपलें **"कोमस"** (उत्साहाचा आणि हास्यविनोदाचा देव) नांवाचें काव्य रचलें. तो पहिल्यानें **चर्च**, म्हणजे धर्मसंबंधी खातें, ह्यांत होता, तें खातें त्यानें सोडलें होतें, कारण मोकळेपणानें, मनांत असेल तें त्याला बोलूं देईनात.

ह्या साऱ्या काळांत हजारों **प्यूरिटन्स** लोक स्वदेशत्याग करून **अमेरिकें**तील **न्यू इंग्लंडा**ला जाऊं लागले होते. **जान वुइन्थ्रॉप** ह्यानें १६३० त एकहजार **प्यूरिटन्स** लोक **न्यू इंग्लंडांत** नेले,

आणि पुढील अकरा वर्षांत वीस हजारांहून एकही कमी नाहीं इतके **प्यूरिटन्स** समुद्र ओलांडून **अमेरिकेंत** राहण्यास गेले. **लार्ड बाल्टिमोर** नांवाचा एक **क्याथलिक** गृहस्थ होता, त्यानें १६३४ त **अमेरिकेंत**, **व्हर्जिनियाच्या** उत्तरेस एक **मेरीलांड** नांवाची नवी वसविलेली राज्यशाखा स्थापली. ही राज्यशाखा जरी **इंग्लंडांत** स्थापित झालेल्या धर्माला अमान्य अशा **क्याथलिक्सांकरितां** स्थापलेली होती, तरी, हरएक माणसानें सुखरूप आपल्या धर्माला अनुसरून चालावें, हा त्या राज्यशाखेंतला पहिला कायदा होता.

स्वदेशत्याग करून लोक अमेरिकेंत राहण्यास जातात.

स्वातंत्र्याला असल्या आश्रयस्थानांची आतां फार जरूर होती, कारण **इंग्लंडांत** सर्व गोष्टी अधिकाधिक वाईट होत चालल्या होत्या. **वेन्टवर्थाला** १६३३ त **आयर्लंडावर** अमल करण्यासाठीं पाठविलें. तेथें **इंग्लिश** आणि **स्काच**, ह्या लोकांच्या ज्या नवीन "**प्लांटेशन्स**," म्हणजे वसाहती, झालेल्या होत्या, त्यांमुळें त्या देशांतले लोक फार अस्वस्थ झालेले होते. एका अर्थी **वेन्टवर्थानें** तेथें अमल चांगल्या प्रकारें केला. त्यानें **आयरिश पार्लेमेंट** पाचारण करून भरविलें, आणि चांगली कवाईत शिकविलेली फौज ठेवून तिचा खर्च भागविण्यापुरतें त्यानें त्या **पार्लमेंटापासून** द्रव्य मिळविलें. त्या फौजेच्या योगें त्यानें चांगला बंदोबस्त राखला. त्यानें व्यापाराला उत्तेजन दिलें, आणि लिनेन, म्हणजे तागाचें कापड, करण्याचे **आयर्लंडच्या** उत्तरेकडील भागांत जे कारखाने निघाले ते, त्याच्या कारकीर्दींत पहिल्यानें सुरू झाले. परंतु वचनें किंवा कायदा, ह्यांविषयीं त्याच्या

वेन्टवर्थाचा आयर्लंडांतील अमल, १६३३-१६३९.

मनांत बिलकूल पूज्यबुद्धि नव्हती. **लॉड** झाला त्यानें एकवेळ लिहिलें होतें त्याप्रमाणें, त्याला सर्व गोष्टींत "पूर्ण" होण्याची काय ती काळजी होती, आणि त्यानें लोकांच्या इच्छेकडे बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं. परंतु, त्यानें फार सक्तीनें **क्याथलिक** धर्म लयास नेला, आणि **कॉन्नाट** प्रांतांत परकी लोकांची वसाहत केली जाणार नाहीं असें राजानें आपलें वचन दिलें असतांही, त्या **वेन्टवर्थानें** त्या प्रांतांत परकी लोकांची वसाहत करण्याविषयीं प्रयत्न केला. ह्या प्रकारें त्याची कारकीर्द फार भयानक झाली. जोंपर्यंत **आयरिश** लोकांवर त्याचा खंबीर हात चालत होता तोंपर्यंत ते लोक निवांत होते. परंतु तो त्यांना सोडून गेल्यावर त्यांच्याकडून भयंकर प्रतिक्रिया झाली हें पाहण्यांत येईल.

ज्या वर्षी **वेन्टवर्थ आयर्लंडास** गेला, त्याच वर्षी **आब्बट** नांवाचा **कांटर्बेरीचा आर्चबिशप** वारला. तो नेहमी समेट करणारा होता. नंतर **लॉड** हा त्याच्या जागीं **आर्चबिशप** झाला, आणि पुढें दोन वर्षांनीं, म्हणजे १६३५ त जेव्हां **वेस्टन** मरण पावला, तेव्हां तो **लॉड इंग्लंडांत** वस्तुतः मुख्य प्रधान झाला. नंतर, प्राचीन धर्म पुनः प्रवृत्तींत ज्यांच्या योगें येईल असले फेरफार करण्यास त्यानें एकदम आरंभ केला.

लॉड हा प्यूरिटन्स लोकांशीं कलह करतो.

उदाहरणार्थ, फारां दिवसांपासून वेदी देवळांच्या मध्यभागीं असत, त्या, देवळांच्या पूर्वेकडील शेवटांकडे, त्यानें मागें हटविल्या; देवळांत रंगीत खिडक्या पुनः पूर्ववत करविल्या, आणि **लांबेथ** एथील देवळांतून क्रूसावरील (वधस्तंभावरील) ख्रिस्ताची मूर्ति काढून टाकलेली होती, ती त्यानें पुनः स्थापविली. ह्या गोष्टींनीं **प्यूरिटन्स** लोकांना भीति पडली. आमच्या हालींच्या काळांत, कोणाही माणसाला देवळां-

तली उपासना न आवडेल तर त्याला उपासनेकरितां दुसऱ्या ठिकाणीं खुशाल जातां येतें; परंतु उपासनेचे वेगवेगळे मार्ग असणें हें शक्य आहे असें त्या दिवसांत कोणासही वाटत नव्हतें. त्या दिवसांत सर्व देवळें एकाच धर्माचीं असून त्यांत हरएक माणसानें भजनपूजनाकरितां गेलेंच पाहिजे अशी सक्ती होती. म्हणून अधिकारावर असलेल्या **लॉड** सारख्या कोणाही पुरुषानें बहुतेक लोकांना न आवडणारे असे फेरफार केले तर त्यांपासून अर्थात् खवदव उत्पन्न व्हावयाचीच हें सांगायास नलगे. आतां **प्यूरिटन्स** लोकांची संख्या फारच वाढलेली होती, आणि **पार्लमेंटाच्या** हुकुमानें, **आदित्यवार** हा पूर्वीपेक्षां फारच भक्तिभावानें लोक पाळीत. प्राचीनकाळीं बहुतेक खेड्यांतून खेळ आणि करमणुकी, चालत असत, परंतु आतां, **जस्टिसिझ आफ् धि पीस** (स्वस्थता राखणारे न्यायाधीश) म्हणून सन्मानाचे न्यायाधीश नेमलेले असत, त्यांनीं, त्यांपासून छाकटेपणा उत्पन्न होतो म्हणून ते खेळ आणि करमणुकी बंद केल्या. **लॉड** आणि राजा, ह्यांनीं, कायद्याकडे लक्ष्य न देऊन, ते खेळ पुनः सुरू करण्याचा निश्चय केला, आणि धर्मोपदेशक पीठांवर उभे राहून उपदेश करीत असतां, त्यांनीं ते खेळ पुनः सुरू करण्याविषयीं आपला केलेला ठराव लोकांस कळवावा, म्हणून त्यांनीं हुकूम केला. धर्मोपदेशकांनीं तसें करण्याचें नाकबूल केलें. ह्यास्तव शेंकडों **प्यूरिटन**पंथी धर्मोपदेशकांच्या वृत्ति काढून घेतल्या. इतक्यानेंच संपलें नाहीं, कारण, ह्याच वेळीं, **लॉड** ह्याच्या राज्यकारभाराविरुद्ध त्यांनीं लहान लहान निबंध लिहिले होते म्हणून, **प्रिन्न** नांवाचा एक बारिस्टर म्हणजे वकील, **बास्टवुइक** नांवाचा

प्रिन्न, बास्टवुइक, आणि बर्टन, ह्या तिघांस दिलेली शिक्षा, १६३७.

एक वैद्य, आणि **बर्टन** नांवाचा एक धर्मोपदेशक, ह्या तिघांना **स्टार चेम्बर** नांवाच्या कोडतानें सजा केली. त्यांना मानखोडा घालून त्यांचे कान कापले, आणि नंतर त्यांना जन्मभर कैदेंत टाकलें. ह्या गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, पुष्कळ नेमस्त विचारी पुरुषांनीं **प्यूरिटन्सांचा** पक्ष धरला. ह्या प्रकारें, पावलापावलानें, राजा आणि त्याचे प्रधान लोकप्रीति गमावीत चालले होते.

"**पिटिशन आफ् राइट**" हें मान्य करून, **चार्लसानें** दिलेलीं वचनें फारां दिवसांपूर्वींच त्यानें मोडलेलीं होतीं, आणि तो जुन्या मार्गांनीं द्रव्य उकळीत होता, आणि जे कोणी देण्याला तक्रार करीत, त्यांना कडक शिक्षा करीत होता. आतां अरमाराची

राजा शिप-मनी (जहाजपट्टी) नांवाचा कर बसवितो, १६३४–१६३८.

जरूर लागली म्हणून, जेव्हां **आर्माडा** येऊन **इंग्लंडाला** दहशत घातली (३४४ वें पृष्ठ पहा), तेव्हां **एलिझाबेथला** जशीं जहाजें पुरविलीं होतीं, तशीं आपणाला जहाजें पुरविलीं पाहिजेत, आणि जहाजें न द्याल तर, त्यांबदली **शिप-मनी** (जहाजपट्टी) नांवाचा कर दिला पाहिजे, असा समुद्रकांठच्या शहरांना त्यानें हुकूम केला. "**पिटिशन आफ् राइट**" मान्य करून त्यानें दिलेल्या वचनाच्या धडधडीत हें अगदीं विरुद्ध होतें, आणि जेव्हां ह्याच्याही पुढें जाऊन त्यानें मध्य देशांतील शहरांतही तसाच तो कर बसविला, तेव्हां **बकिंगहमशायरमधल्या जान हांप्डन** नांवाच्या एका **स्क्वायर** पदवीच्या गृहस्थानें, तो कर

हांप्डन अपील करतो.

देत नाहीं म्हणून साफ सांगितलें, आणि अपील कोडताच्या न्यायाधीशांकडे त्यानें अपील केलें. त्या काळीं सर्व न्यायाधीश राजाच नेमीत असे, तथापि त्या कोडतांतील बारा न्यायाधीशांपैकीं पांचांनीं, **हांप्डनाचा वाद**

रास्त आहे, असें आपलें मत धडकून दिलें. परंतु हांपूडनाच्या विरुद्ध बहुमत पडल्यामुळें तो कर पुढें चालू ठेवला, आणि सारें **इंग्लंड** क्रुद्ध झालें.

असें असतांही, राजा आणि लॉड ह्यांनीं, **स्काट** लोकांना **इंग्लिश प्रार्थनापुस्तक** वापरण्याचा हुकूम करून ह्याच वेळीं त्यांच्यांशीं कलह उत्पन्न केला नसता, तर हें उठलेलें वादळ निघून गेलें असतें. **धर्मसुधारणा** झाल्यापासून **स्काटांनीं** समयस्फूर्त किंवा प्रसंगीं सुचलेली प्रार्थना करण्याचा पाठ ठेविलेला होता, आणि आतां त्यांवर प्रार्थनापुस्तक लादलें तें त्यांनीं झिटकारलें.

चार्लस स्काट लोकांवर प्रार्थनापुस्तक जबरीनें लादण्याविषयीं प्रयत्न करतो.

एडिंबरोंतील मुख्य देवळांत जेव्हां तेथील धर्मोपदेशक त्या प्रार्थनापुस्तकांतून प्रार्थना वाचूं लागला, तेव्हां एका वृद्ध बाईनें त्याच्या डोक्यावर एक चौरंग फेंकला, आणि अशीच साऱ्या **स्काटूंड**भर सर्व लोकांची वृत्ति बदलून गेलेली होती. राजानें त्या देशांतील सर्व धर्ममंडलांना आमची आज्ञा पालन करावी म्हणून निरोप पाठविला; परंतु त्याचा एवढाच परिणाम झाला कीं, त्या मंडलांनीं **नाशनल कॉव्हेनांट** (राष्ट्रीय करारनामा) ह्या नांवाचा जो १५५७ त करारनामा झाला होता (३२४ वें पृष्ठ पहा), त्याचीच समारंभपूर्वक यथाविधि उजरणी केली, आणि सभ्य गृहस्थ लोक, बडे लोक, आणि धर्मोपाध्ये एक प्रतिज्ञालेख हातीं घेऊन घोड्यांवर बसून सर्व देशभर दौडत फिरले, आणि हर कोणत्याही स्थलीं ते गेले तेथील लोकांनीं त्या प्रतिज्ञालेखावर सह्या केल्या.

धि कॉव्हेनांटर्स-(करारनामा करणारे लोक), १६३८.

राजाला ह्या स्काटांच्या वागणुकीनें फार राग आला, आणि तो

कूच करून **इंग्लंडच्या** सरहद्दीवर गेला. परंतु ते **स्काच कॉव्हे-नांटर्स**, म्हणजे करारनाम्यानें बद्ध झालेले लोक, कडेकोट तयारी करून होते. तशांत **इंग्लिश** शिपायांना त्या **स्काटांचा** कन्हवाळा येऊन, आम्ही **स्काटांशीं** लढणार नाहीं अशी त्यांनीं **चार्लसाला** स्पष्ट सूचना केली. म्हणून त्याला दुराग्रह सोडून देणें भाग आलें, आणि पुनः येऊन ह्यांना आपण जिंकूं असा मनांत गुप्त निश्चय करून तो **लंडनास** परत आला. त्यानें **वेन्टवर्थाला** (हा आतां **अर्ल आफ् स्ट्राफर्ड** हा किताब पावलेला होता) स्वदेशीं परत यावें असा निरोप पाठवला. **स्ट्राफर्ड** त्या निरोपाप्रमाणें माघारा आला, आणि **पार्लमेंटाला** पाचारण करावें असा त्यानें राजाला बोध केला, आाणि नंतर आपली चांगली कवाईत शिकवून तयार केलेली फौज तिकडून आणण्याकरितां तो **आयर्लंडास** त्वरेनें माघारा गेला.

लार्ड स्ट्राफर्ड ह्याला आयर्लंडांतून इंग्लंडास माघारें बोलावलें.

असें असतां, राजा व **स्ट्राफर्ड** ह्या दोघांतून एकालाही, लोक किती असंतुष्ट होत चालले होते, हें कळलें नव्हतें. **पार्लमेंट** १६४० त एप्रिलच्या १३ व्या तारिखेस भरलें, परंतु तें अवघें तीन आठवडेपर्यंत टिकलें. **कामन्सांनीं**, आमचीं दुःखें किंवा जाच ह्यांची दाद घेऊन परिहार होई तोंपर्यंत आम्हीं कांहींही पैसा देण्याविषयीं संमति देणार नाहीं असें साफ सांगितलें, आणि ते **स्काटूलंडाशीं** युद्ध करण्याची गोष्ट तर बिलकूल ऐकून देखील घेईनात. तेव्हां **चार्लस** तर नेहमी सारखाच दुराग्रही असल्यामुळें, त्यानें त्या **पार्लमेंटाचें** विसर्जन केलें, आणि गोळा करवेल तेवढी फौज बरोबर घेऊन तो कूच करून उत्तरेकडे गेला. **स्काटांनीं** पूर्वीच

थोड्या दिवसांचें पार्लमेंट, १६४०.

आघाडी साधली होती. त्यांनीं **नार्थंबर्लंड** प्रांतावर स्वारी केलेली होती, आणि आतां **न्यूकास्टल** नजीक **न्यूबर्न** एथें लढाई झाली, तींत त्यांनीं **इंग्लिशांना** मागें हटवून, **डर्हम** प्रांतांतूनही माघारें पिटून लावलें. तेव्हां द्रव्याची मोठी रकम देण्याचें वचन देऊन **चार्लसाला** तह करणें भाग आलें. ही रकम दुसरें **पार्लमेंट** पाचारिल्यावांचून त्याला मिळणें शक्य नव्हतें.

धि लाँग पार्लमेंट, (दीर्घकालिक पार्लमेंट) १६४०–१६५३; १६५९–१६६०.

परंतु आतां तो पेंचांत सांपडलेला होता, त्यामुळें कोणतेंही **पार्लमेंट** निःसंशय त्याचें धनी होणार होतें, आणि १६४० त नोव्हेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस जें **पार्लमेंट** भरलें, त्याला **"लाँग पार्लमेंट"** (दीर्घकालिक पार्लमेंट) असें नांव पडलें. तें राजाच्या हयाती बाहेर टिकलें. **कामन्सांनीं** जें पहिलें काम केलें तें हें, ज्यांचे कान कापलेले होते त्या माणसांना त्यांनीं कैदेंतून मुक्त केलें, आणि **लॉड** आणि **स्ट्राफर्ड** ह्या दोघांवर दोषारोप केला, हें दुसरें काम केलें. ते **स्ट्राफर्डाचा** अति द्वेष करीत; कारण, त्यानें आपला पक्ष सोडला होता, **इंग्लंडांत आयरिश** फौज आणण्याचा घांट त्यानें घातला, आणि **पार्लमेंटाला** न जुमानून वागण्याला राजाला त्यानें उत्तेजन दिलें. तो तेव्हां **यार्कशायरमध्यें** होता, आणि त्याच्या मनांत **आयर्लंडास** माघारें जावयाचें होतें, परंतु जर तूं **लंडनास** येशील तर, "तुझ्या डोकीवरील एका केंसाला सुद्धां ढका लागूं देणार नाहीं असें त्याला **चार्लसानें** वचन दिलें." म्हणून तो **लंडनास** माघारा आला, आणि **हौस आफ् लार्ड्स** ह्यांच्या दिवाणखान्यांत प्रवेश करूं लागतो, तों, **पिम** आणि त्याच्या मागून **कामन्सांच्या सभेचे** तीनशें सभासद, **कामन्सांनीं** त्यावर दोषारोप केलेला होता, त्याचा

त्यांच्याकडून निरोप घेऊन येऊन, त्या लार्ड्सांच्या दिवाणखान्यांतील वेगळी केलेली कठड्याची जागा होती तींत उभे राहिलेले, त्यानें पाहिले. तेव्हां त्याला पकडून **टौअरमध्यें** पाठवलें, आणि १६४१ त जान्युअरीच्या ३० व्या तारिखेस त्याची चौकशी **वेस्टमिन्स्टर हाला** (दिवाणखान्या)मध्यें झाली. ती चौकशी चालली असतां, **सर हेन्री व्हेन** नांवाच्या एका तरुण गृहस्थानें (त्याचा बाप राजाच्या दरबारांत वागणारा माणूस होता, परंतु तो स्वतः **पिम** ह्याचा मोठा दोस्त होता), **आयरिश** फौजेच्या मदतीनें साऱ्या राज्यावर मी अमल करीन असें **स्ट्राफर्डानें** राजाला सुचविलें होतें, ही गोष्ट, आपल्या बापाच्या कांहीं कागदपत्रांवरून साबीत केली. तथापि कायदेशीर प्रकारानें त्या प्रधानावर गुन्हा साबीत करणें इतकें मुशकील होतें कीं, नेहमीच्या कायद्याप्रमाणें त्यावर खटला चालविण्याचा बेत सोडून देऊन त्या मोबदला त्याच्याकरितां मुजरत **बिल आफ् आट्टेन्डर,** म्हणजे दूषित करण्याच्या कायद्याचा मसूदा, **पार्लमेंटानें** पसार केला.

स्ट्राफर्डाची चौकशी आणि शिरच्छेद, १६४१.

त्या मसुद्यावर सही करण्यासाठीं तो राजाकडे पाठवला. **चार्लसानें** पहिल्यानें सही करीत नाहीं म्हणून सांगितलें. परंतु संतप्त झालेल्या लोकांची **व्हाइट हाल** नांवाच्या राजमंदिराभोंवतीं मोठी गरदी जमली, तीमुळें राणीला दहशत पडली. म्हणून शेवटीं, त्याला रडें कोसळून, ज्या आक्टाच्या खरड्यानें आपला विश्वासू नौकर देहांतशिक्षा देण्याच्या माचोळीवर जाणार होता, त्या खरड्यावर सही करण्यासाठीं त्यानें एक अखत्यार देऊन कामदारांचें मंडल नेमलें. **स्ट्राफर्ड** हा राजाहून फार दिलदार किंवा उदार होता. त्यानें आपला धनी जो राजा, त्याला पत्र लिहिलें, त्यांत, माझें रक्षण

करण्याचें आपण वचन दिलेलें होतें, त्यापासून आपण मुक्त आहांत असें त्यानें कळविलें होतें; तथापि राजानें आपल्याला शेवटीं सोडलें ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली. मरणाला तयार होत असतां, तो म्हणाला, "राजांवर विश्वास ठेवूं नका." १६४१ त, मेच्या १२ व्या तारिखेस त्याचा शिरच्छेद केला, लॉडाचा शिरच्छेद १६४५ पर्यंत झाला नाहीं.

त्रैवार्षिक पार्लमेंट करण्याविषयींचा आक्ट आणि दुसऱ्या सुधारणा, १६४१.

स्ट्राफर्डाच्या मृत्यूनंतर, **पार्लमेंटा**नें मोठमोठ्या सुधारणा केल्या. **"ट्रायेन्निअल आक्ट"** (पार्लमेंट त्रैवार्षिक असावें अशाविषयीं आक्ट) नांवाचा एक कायदा पसार केला, त्यांत, निदान प्रत्येक तीन तीन सालांनीं नवीन **पार्लमेंट** भरावें, आणि कोणतेंही पुढील **पार्लमेंट** त्याच्या स्वतःच्या अनुमतावांचून विसर्जन करूं नये, असे ठराव झाले. **धि कौन्सिल आफ् धि नार्थ** (उत्तरेकडील मुलुखाकरितां कौन्सिल), **धि स्टार चेंबर** (स्टार चेंबर नांवाचें कोडत), आणि **धि कोर्ट आफ् हाइ कमिशन** (हाइ कमिशन नांवाचें कोडत), हीं मोडून टाकलीं, आणि बेकायदा कर बसविण्याविरुद्ध नवीन स्टाट्यूटें (कायदे) पसार केलीं. आतां **पार्लमेंटां**त दोन पक्ष झालेले होते. (१) कोर्ट पार्टी, म्हणजे दरबार तरफेचा पक्ष; त्यांत राजावर अति सख्ती करूं नये अशी इच्छा करणारे लोक होते. ह्या पक्षाचे प्रमुख, **लार्ड फाक्लंड** (हा शूर, सौम्य, आणि उदार मनाचा पुरुष होता), आणि **हाइड** (हा पुढें **लार्ड क्लारेन्डन** हा किताब पावला), हे होते. (२) **प्यूरिटन** पार्टी, म्हणजे **प्यूरिटन्सां**चा पक्ष; त्या पक्षाचा **पिम** हा प्रमुख होता. त्या **पिम**नें, कौन्सिलदार, न्यायाधीश, आणि प्रधान, ह्यांच्या नेमणुका पुढें पार्लमें-

टाकडून होत जाव्या, अशी सूचना केली. ह्या सूचनेविषयीं वाटाघाट चालली असतां, आणि **चार्लस** त्या समयीं दूर **स्काट्लंडांत** असतां, **आयर्लंडां**तून भयानक खबर आली.

आयर्लंडांतील प्राटेस्टंट्स लोकांची कत्तल, १६४१.

आयरिश क्याथलिक्स लोकांना दाबांत ठेवलेलें नसल्यामुळें, १६४१ त आक्टोबरच्या २३ व्या तारिखेस बंड करून उठून, त्यांनीं **इंग्लिश** आणि **स्काच** ह्या लोकांची कत्तल केली. तींत, पुरुष, बायका, आणि मुलें, ह्यांचे कसावांप्रमाणें क्रूरपणानें त्यांनी प्राण घेतले, आणि उरलेल्या लोकांना, त्यांनीं बर्फांत पडून किंवा नदींत बुडून मरावें, अशाकरितां पिटून लावलें. ही खबर ऐकतांच सारें **इंग्लंड** भीतीनें थरारलें, आणि जेव्हां त्या **आयरिशांनीं**, आपणांला शस्त्र घेऊन उठण्याला आधार म्हणून राजाच्या शिक्कमोर्तबाचें आज्ञापत्र दाखविलें, तेव्हां तर **इंग्लंडां**तील सर्व लोकांना मोठीच दहशत पडली. कत्तल होईल ही गोष्ट खचीत **चार्लसा**च्या स्वप्नींही आली नव्हती, परंतु **इंग्लंडांतील पार्लमेंटा**च्या विरुद्ध **आयरिशांना** चिथवून उठविण्याची तरी त्यानें आशा केलेली होती ह्यांत संशय नाहीं. त्याची ती आशा सफळ झाली, परंतु त्यानें इच्छा केली होती तितकी सफळ झाली नाहीं, कारण, **पिम** आणि **हांप्डन** ह्या दोघांनीं, राजावर किंवा त्याच्या प्रधानांवर आतां बिलकूल **पार्लमेंटा**ला विश्वास ठेवतां येत नाहीं, ही गोष्ट धाडसानें स्पष्ट त्याच्या नजरेस आणली. मग **काम-**

ग्रांड रिमान्स्ट्रन्स.

न्सांनीं एक **"ग्रांड रिमान्स्ट्रन्स"** (मोठा आपत्तिलेख किंवा कानझाडणी) नांवाचा एक लेख तयार केला, त्यांत, मागल्या कित्येक वर्षांपासून ज्या त्यांनीं आपत्ति भोगल्या होत्या त्या दाखवून, **पार्लमेंटानें** नेमलेले प्रधान

असावेत असें मागणें केलें होतें. त्या लेखाविषयीं सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत कडक वादविवाद चालून शेवटीं तो "**ग्रांड रिमान्स्ट्रन्स**" एकच कल्लोळ होऊन त्यामध्यें पसार झाला. त्या कल्लोळापासून परिणामीं रक्तपातच झाला असता. परंतु तो **हांप्डनाच्या** वज्रसंकल्पी खंबिरीनें टळला.

पुढें पांच दिवसांनीं राजा **स्कात्लंडाहून** माघारा आला, आणि अजूनही पुष्कळ सभासद आपल्याला पाठबळ देतील ह्या भरवशानें, त्यानें **लार्ड्सांपैकीं लार्ड किंबोल्टन**, आणि **कामन्सांपैकीं पिम, हांप्डन, हॉलिस, हासलिरग**, आणि **स्ट्रोड**, हे पांच सभासद, इतक्यांवर तोहमत ठेवून खटला करावयाचा आहे म्हणून त्यांना पाठवून द्यावें असा निरोप पाठविला. त्या सहा जणांवर बिलकूल जुलूम जबरदस्ती होणार नाहीं, असें त्यानें हा माझा "राजाचा बोल" म्हणून वचन दिलें. परंतु त्या दोन्ही **सभा** त्यावर भरवसा ठेवीनात, आणि त्या सहा जणांना आम्ही आपल्या ताब्यांत देत नाहीं असें त्यांनीं साफ सांगून पाठविलें.

त्या पांचां सभासदांना पकडण्याविषयीं राजाचा प्रयत्न.

तेव्हां दुसऱ्या दिवशीं आपलें वचन मोडून, तो, **हौस आफ् कामन्समध्यें**, गाडदी शिपाई आणि हत्यारबंद स्वारांचा लांबच लांब तांडा, त्या पांच सभासदांना पकडण्याकरितां, बरोबर घेऊन आला. तो सभागृहांत शिरून पाहतो तों त्या पांचांच्या बैठका रिकाम्या होत्या. त्यांना संरक्षणाकरितां शहरांत पाठविलेलें होतें. तेव्हां तो म्हणाला, "ज्यापक्षीं माझे "पक्षी उडून गेलेले आहेत, त्यापक्षीं ते एथें परत आल्याबरोबर "तुम्ही त्यांना मजकडे पाठवाल अशी मी तुम्हांपासून अपेक्षा करतों, "नाहीं तर, त्यांना शोधून काढण्याबद्दल अर्थात् माझा मार्ग मला

"स्वीकारावा लागेल." असें बोलून तो रोषानें निघून गेला. तो जाऊं लागला तेव्हां, सभासदांनीं "प्रिव्हिलेज, प्रिव्हिलेज" (आमचा हक्क आमचा हक्क), असें म्हणून मोठमोठ्यानें आरोळ्या ठोकल्या.

त्याला ते पांच गुन्हेगार कधींही सांपडले नाहींत. **लंडन** शहर नेहमीचेंच बलाढ्य होतें. तें आतां सारें स्वातंत्र्याच्या तरफेचें झालेलें होतें. त्या दिवसांत तें शहर, आतांसारखें, केवळ वखारी आणि हपीसें, म्हणजे कचेऱ्या, ह्यांचें जुंबाड नव्हतें. **टेंपल बार,** आणि **एक्सचेन्ज,** ह्या त्या शहरच्या दोहों भागांच्या दरम्यान, तेव्हां तीन लक्ष लोकांचीं घरें होतीं. व्यापारी मोलवान सामानानें भरलेल्या हवेल्यांत राहत. दुकानदार आपआपल्या दुकानांच्या वरील मजल्यांत, धंदा शिकण्याकरितां करारनामा करून घेऊन ठेवलेले शागिर्द मुलगे, ह्यांसहवर्तमान राहत. ते शागिर्द दुकानांचीं तोंडें म्हणून उतरलेल्या छपरांतून "आपणांस काय पाहिजे" असें रस्त्यांतून जाणाऱ्या लोकांना मोठ्यानें ओरडून विचारीत. प्रत्येक धंद्याची **"कंपनी"** (मंडळी) असे. उदाहरणार्थ, **मर्चंट टेलर्स** (व्यापारी शिंपी) ह्यांची, **फिशमांगर्स** (मासे विकणारे) ह्यांची, **गोल्डस्मिथ्स** (सोनार) ह्यांची; आणि ह्या कंपन्यांच्या कवाईत शिकवून तयार केलेल्या शिपायांच्या टोळ्या किंवा जमाती असत, त्यांत आल्डर्मेन (सनदी गांवचे अधिकारी), दुकानदार, आणि करारनाम्याचे शागिर्द, हे हुद्देदार आणि शिपाई असत. असल्या बलाढ्य संरक्षणकर्त्या लोकांच्या आश्रयाखालीं, ते पांच सभासद, आतां, **हौस आफ् कामन्सच्या** एका कमिटीला दररोज भेटत, आणि एका आठवड्यानंतर एका

लंडनशहर राजाला जुमानीत नाहीं.

दिवशीं त्यांना नदीच्या किनाऱ्याच्या लगतीनें, मोठा जयजयकार करीत **वेस्टमिन्स्टर** एथें माघारें आणलें.

हा वेळ येई तों राजा हा, **लंडनां**त तर धनी नाहीं असें स्पष्ट दिसून आलें, आणि तो शहर सोडून आपल्या कुटुंबासह **हाम्टन-कोर्ट** एथें गेलेला होता. राणी आपल्या वडील मुलांसहवर्तमान, लागेल तसा पैसा उत्पन्न करण्यासाठीं राजाच्या खासगीकडील जवाहीर बरोबर घेऊन समुद्र ओलांडून **नेदर्लंड्स** देशीं गेली, आणि १६४२ त आगस्टच्या २२ व्या तारिखेस राजानें **नार्टिंग्हम** एथें आपला जरीपटका चढविला. आपआपसांतलें युद्ध सुरू झालें.

आपआपसांतलें युद्ध सुरू होतें, ता० २२ आगस्ट, १६४२.

पुढील चार वर्षेपर्यंत साऱ्या **इंग्लंड**भर लढाया चालल्या होत्या. स्थूलमानानें म्हटलें म्हणजे, साऱ्या राष्ट्राचे उत्तर आणि पश्चिम हे दोन भाग राजाच्या तरफेचे होते, आणि पूर्व व दक्षिण भाग **पार्लमेंटा**च्या तरफेचे होते. **लार्ड्सां**पैकीं पांसष्ट, आणि **कामन्सां**पैकीं निमें आपल्या राजाच्या भोंवतीं जमले. राजाचा भाचा, **राजपुत्र रूपर्ट, इलेक्टर पालाटाइन**चा पुत्र, ह्याच्याकडे **राजकीय घोडदळाचें** आधिपत्य होतें. तें दळ **"प्रिन्स रूपर्टचा रिसाला"** ह्या नांवानें प्रसिद्धीस आलें. त्यांत सभ्य गृहस्थ, आणि त्यांचे पुत्र होते. ते धाडस, धसके, अयटबाज, घोड्यावर बसणारे, होते. राजाच्या साऱ्याच पक्षाला **"काव्हलीयर्स"** (शिलेदार) असें नांव पडलेलें होतें. **कामन्सां**पैकीं बाकीचे निमें, वीस लार्ड्स, पुष्कळ स्कायर पदवीचे खेड्यापाड्यांत राहणारे लोक, धारेकरी,

राजाचा पक्ष अथवा "काव्हलीयर्स."

व्यापारी, आणि वाणीउदमी, ह्यांनीं **पार्लमेंटा**चा पक्ष धरलेला होता; त्या पक्षांतील नौकर आणि करारनाम्याचे शागिर्द लोक होते, त्यांनीं आपले डोक्यावरचे केंस कातरून अखूड किंवा तोकडे केलेले होते, त्यामुळें त्या पक्षाच्या लोकांना काव्हलीयर्स लोकांनीं "**रौंडहेड्स**" (वाटोळ्या डोक्यांचे) हें निंदेचें नांव ठेवलें.

पार्लमेंटचा पक्ष अथवा "रौंडहेड्स."

युद्ध चालू झाल्यावर पहिल्यानें राजाची सरशी होती. **पार्लमेंटा**कडील सेनापति **एसेक्स**चा **अर्ल** हा होता, त्याच्या मनांत **चार्लसा**ला उलथून टाकण्यापेक्षां त्याच्याशीं करार किंवा अटी कराव्या हें बरें असें होतें, आणि **प्रिन्स रूपर्टा**च्या धसक्या स्वारांनीं शेतकरी आणि वाणीउदमी शिपाई झालेले होते त्यांच्यामध्यें भीति उत्पन्न केली. **पौवुइक ब्रीज्ज** एथें सेप्टेंबरच्या २२ व्या तारिखेस, आणि **वारिकशायरांत एज्जहिल्ल** एथे आक्टोबरच्या २३ व्या तारिखेस, ज्या लढाया झाल्या, त्यांत जरी जय म्हणून उभय पक्षांपैकीं कोणत्याच पक्षाचा झाला नाहीं, तरी एकंदरीनें राजकीय फौजेची सरशी होती. त्यामुळें **एसेक्स** मागें हटला. **चार्लस** त्याचा पाठलाग करीत आला. तो शेवटीं नोव्हेंबरच्या १२ व्या तारिखेस **ब्रेन्टफर्ड** एथें पोहोंचून, त्यानें **लंडन**वर हल्ला करण्याचें भय घातलें. जर त्यानें त्या समयीं तें शहर आणि त्यांतील सारी संपत्ति हस्तगत करून घेतली असती, तर त्या युद्धाची समाप्तीच झाली असती. परंतु तेथल्या कवाईत शिकविलेल्या टोळ्या किंवा जमाती एकत्र जमून शौर्यानें **टर्न्हेम ग्रीन**पर्यंत शहराबाहेर चाल करून आल्या. तेव्हां राजाची फौज मागें हटली.


पौवुइक ब्रिज्ज आणि एज्जहिल्ल एथील लढाया, १६४२.

चार्लसानें आतां आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण **आक्सफर्ड** एथें केलें, आणि नैर्ऋत्य दिशेकडील कौंटी राजपक्षीय लोकांनीं हळू हळू सर केले. साऱ्या देशभर युद्ध चालू होतें. उत्तरेकडे **पार्लमेंटच्या** पक्षाकडील सेनापति, **फेरफाक्स,** हा अत्यंत पेंचाटींत सांपडला. पश्चिमेकडे **कार्नीशमेन** (कार्नवालमधले लोक) हे कळकळीचे राजपक्षीय होते. ते **जनरल वाल्लर** (सेनापति वाल्लर) ह्याचा पराभव करीत होते, आणि **प्रिन्स रूपर्ट** हा **आक्सफर्डशायरांत एसेक्सा**शीं लढत होता. **पार्लमेंटच्या** पक्षाकडील **कौन्सिल,** नेहमीं तह करण्याची आशा बाळगून होतें. **पिम** आणि **हांपूडन** ह्या दोघांनीं मात्र तो झगडा लढूनच संपविला पाहिजे असा निर्धार केला होता. परंतु ते दोघे शूर पुरुष लवकरच हा मृत्युलोक सोडून जाणार होते. १६४३ त जूनच्या १८ व्या तारिखेस, **प्रिन्स रूपर्ट** हा पश्चिमेकडे **वाल्लरवर** चाल करून निघाला असतां, **बकिंग्हमशायरांत शाल्ग्रोव्ह** एथें, त्याची आणि **हांपूडनाची** गांठ पडली. तेव्हां **हांपूडनाबरोबर** एक लहानशी स्वारांची टोळी मात्र होती. **प्रिन्स रूपर्ट** ह्यानें **हांपूडनाचा** पराभव केला, त्या चकमकींत **हांपूडनाला** असाध्य जखम लागून तो रणांतून घोड्यावर बसून दौडत निघाला. त्याची मान लोंबकळत होती, आणि हात घोड्याच्या मानेवर ठेवलेले होते. तो त्या स्थितींत **टेम** एथें पोहोंचला. तेथें सहा दिवस पडून राहून **कौन्सिलाकरितां** आपल्या मनांतले बेत कागदावर लिहून ठेवण्याविषयीं प्रयत्न करीत असतां, शेवटीं, "हे **देवा,** माझा देश तार" असें मोठ्यानें ओरडून तो मरण पावला. पुढल्या दोन महिन्यांत

राजपक्षीय लोकांचे जय, १६४३.

हांपूडनाचा मृत्यु, तारीख २४ जून १६४३.

नकाशा नं ५ आपआपसांतील युद्धांतल्या मुख्य लढाया आणि वेढे



शहरापुढें शहर राजपक्षीयांच्या हातीं येत चाललें. **बाथ, एक्झीटर, ब्रिस्टल, डार्चेस्टर** आणि पुष्कळ इतर शहरें त्यांनीं घेतलीं, आणि **ग्लास्टर**ला त्यांनीं गच्च वेढा घातला. त्या समयीं **पार्लमेंट** महत्संकटांत होतें, कारण, **लंडनां**तील लोक असंतुष्ट होत चालले होते. परंतु पारडें लवकरच फिरणार होतें. महत्प्रयास

पार्लमेंटाच्या पक्षाचे जय, फाक्लंड ठार मारला जातो, तारीख २० सेप्टेंबर १६४३.

करून नवी फौज गोळा केली. तिचें आधिपत्य **एसेक्स**ला दिलें. त्यानें ती बरोबर घेऊन जाऊन **ग्लास्टर**चा वेढा उठविला. नंतर माघारा वळून त्यानें राजपक्षीय फौजेला **बर्कशायरांत न्यूबरी** एथें १६४३ त सेप्टेंबरच्या २० व्या तारिखेस गांठलें, आणि तेथील लढाईंत **लार्ड फाक्लंड** "सल्ला, सल्ला" असें ओरडत घायाळ होऊन पडला, आणि त्याला मृत्यु येऊन विश्रांति मिळाली.

दरम्यानच्या वेळांत **पिम** ह्यानें **सर हेन्री व्हेन** ह्याला कुमक मागण्याकरितां **स्काट्लंडांत** पाठविलें होतें, आणि सेप्टेंबरच्या २५

स्काटांशीं कट होतो, तारीख २५ सेप्टेंबर १६४३.

व्या तारिखेस, "**सॉलेम्न लीग आंड कॉव्हेनांट**" (इब्रतीचा कट आणि करारनामा) नांवाचा करारनामा होऊन त्यावर सह्या झाल्या. त्या करारनाम्यांत **प्रेस्बिटीरियन** धर्माचें रक्षण केलें पाहिजे, ह्या अटीनें **स्काटांनीं पार्लमेंटा**करितां लढण्याचें वचन दिलें. ह्या करारनाम्यावर सह्या होतात तोंच, डिसेंबरच्या ८ व्या तारिखेस, काळजीनें झिजून **पिम** मरण पावला.

परंतु त्याची जागा घेण्याला दुसरा एक नायक ह्यापूर्वींच तयार होऊन राहिलेला होता. **ऑलिव्हर क्रॉम्वेल** नांवाचा एक निष्ठुर, आस्थेवा-

ऑलिव्हर क्राम्वेल.

ईक, निग्रही, पुरुष होता. तो **हंटिंग्डनशायरां**तील एका सभ्य गृहस्थाचा पुत्र होता, आणि तो आपल्या देशाची दैना झालेली फारां दिवसांपासून लक्ष्यपूर्वक पाहत आला होता. १६२८ त जेव्हां **पिटिशन** आफ **राइट** नांवाचा अर्ज पसार झाला, तेव्हां तो **पार्लमेंटां**त सभासद होता. १६४१ त त्यानें **स्टार चेंबर** नांवाच्या कोडताच्या क्रूर कर्मांविरुद्ध भाषण केलेलें होतें, आणि जेव्हां युद्ध सुरू झालें, तेव्हां **पार्लमेंट**तरफेच्या फौजेंत मिळून लढण्याच्या हेतूनें तो एकदम एक रिसाला जमविण्यास लागला. युद्धाला आरंभ झाला, व लवकरच, राजाच्या तरफेच्या हिंमतदार **काव्हलीयर्स** (शिलेदारां)विरुद्ध आपल्या तरफेच्या जमा केलेल्या कतवाराच्यानें टिकाव धरवणार नाहीं, हें त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें. म्हणून त्यानें आपल्या रिसाल्यांत सभ्य गृहस्थ, आणि मिरासी जमीनदार, भरले. ते लुटीकरितां नव्हे, परंतु स्वातंत्र्य आणि धर्म ह्यांकरितां लढले. असल्या लोकांमध्यें प्रत्येकाचीं स्वकीय धर्मसंबंधी मतें होतीं, आणि **क्रॉम्वेल्लानें** आपल्या शिपायांपैकीं हरकोणी शिपाई, जोंपर्यंत ईश्वरावर निष्ठा ठेवून **पार्लमेंटा**करितां लढण्याला सिद्ध असे, तोंपर्यंत, तो **प्रेस्बिटीरियन** आहे, **बाप्टिस्ट** (मुलांचा बाप्तिस्मा करूं नये वयांत आलेल्याचा मात्र करावा असें ज्या ख्रिस्त्याचें मत आहे तो) आहे, किंवा **इंडिपेंडेन्ट** (स्वतंत्रमतवादी, म्हणजे धर्माच्या संबंधांत कोणाही वरिष्ठाचा अधिकार न मानणारा) आहे, ह्या गोष्टीविषयीं त्यानें बिलकूल फिकीर केली नाहीं. ह्या सर्व कृतीचा परिणाम असा झाला कीं, **पिम**च्या मृत्यूच्या पूर्वींही पुष्कळ दिवसांपासून “ **क्रॉम्वेल्लाचे आयर्नसाइड्स** ” (लो-

क्रॉम्वेल्लचा आयर्नसाइड्स नांवाचा रिसाला.

हकुक्षि, वज्रदेह) असें ज्या रिसाल्याला म्हणत, तो रिसाला **"रूपर्टच्या रिसाल्या"**सारखाच विख्यात झालेला होता, आणि जेथें कोठें तो रिसाला जाई तेथें त्याचा जय होई. **पिमच्या** मृत्यूनंतर सात महिन्यांनीं, म्हणजे १६४४ त जुलईच्या ४ थ्या तारिखेस, जेव्हां **स्काट** लोक, आणि **रौंडहेड्स** (पार्लिमेंटच्या पक्षाकडील लोक) मिळून एकवटलेल्या फौजेनें, **जनरल** (सेनापति) **फेरफाक्स** ह्याच्या हुकमतीखालीं **मार्स्टन मूर** एथें **रॉयलिस्ट्स** (राजाच्या पक्षाकडील फौज) ह्यांना गांठून त्या फौजेचा पराभव केला, तेव्हां जो **पार्लमेंटाच्या** पक्षाला पहिला मोठा जय मिळाला, तो सर्वथा त्या **क्रॉम्वेलच्या** रिसाल्यामुळें मिळाला.

मार्स्टनमूर एथील लढाई, ता. ४ जूलई १६४४.

क्रॉम्वेलचें आतां वजन फार वाढलें, आणि **पार्लमेंटच्या** फौजेला विशेष नेटदार सरदार मिळत तोंपर्यंत युद्ध तडीस जाणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट त्याच्या ध्यानीं आली. त्यानें **कौन्सिलाला** स्वच्छ सांगितलें कीं, तुमच्या फौजेचा घाट पालटून नवा केला पाहिजे, आणि तींत हालीं अमलदार किंवा सरदार **पार्लमेंटचे** सभासद आहेत, तें ठीक नाहीं, त्यांच्या जागीं लष्करी अमलदार नेमले पाहिजेत. ती गोष्ट **कौन्सिलाला** मान्य झाली, आणि लष्करी अमलदार नेमले, आणि ज्या कानूला **"सेल्फ डिनाइंग आर्डिनन्स"** (आत्मसंयामक नियम) म्हणत तो कानू करून त्याला अनुसरून **पार्लमेंटच्या** सभासदांनीं फौजेंतील अमलदारीच्या जागा सोडून दिल्या. साऱ्या फौजेचा घाट सुधारून नवा केला, आणि **सर टामस फेरफाक्स** ह्याला त्या सेनेचा मुख्य अधिपति केलें.

सेल्फ डिनाइंग आर्डिनन्स, १६४५.

फेरफाक्साच्या मुजरत विनंतीवरून **क्रॉम्वेल्ला** थोडावेळपर्यंत **लेफ्टेनेंट–जनरल,** (नायब किंवा दुय्यम सेनापति) ह्या हुद्यावर राहूं दिलें. त्या थोड्या वेळांत सारा कार्यभाग उरकला. **पार्लेमेंट**च्या सैन्याला **"न्यू मॉडेल"** (नवीन घाटाचें सैन्य) असें म्हणूं लागले. त्या सैन्यानें १६४५ त जूनच्या १४ व्या तारिखेस राजाच्या पक्षाच्या सैन्याला **नार्थहाम्प्टनशायरांत नेस्बी** एथें गांठलें, आणि त्याचा पूर्ण पराभव केला. नंतर पहिल्यानें **चार्लस वेल्स**मध्यें पळून गेला, आणि पुढें **न्यूआर्क** एथें **स्काच** फौजेचा तळ होता तेथें, पळून गेला; आणि थोडीं थोडीं अशीं मिळून सर्व तटबंदीचीं गांवें किंवा ठाणीं **पार्लेमेंट**च्या हातीं आलीं.

नेस्बीएथील लढाई, तारीख १४ जून १६४५.

राजा जर सर्व फौजेवरची अवघी हुकुमत वीस वर्षेपर्यंत आम्हांकडे देण्याचें, आणि **प्यूरिटन्सां**ना भजनपूजन किंवा उपासना ह्यांविषयीं स्वातंत्र्य देण्याचें, कबूल करीत असेल तर, आम्ही आपल्या राजाला परत घेण्याला सिद्ध आहों असें **कौन्सिलानें स्काटां**कडे बोलणें लावलें. परंतु एका पक्षावर दुसऱ्या पक्षाला उठवून त्यांचा परस्पर कलह लावून आपण मुखत्यार धनी पुनः होऊन बसावें असा अजून **चार्लसा**चा इरादा होता. शेवटीं **स्काट** लोकांना राजाच्या कारस्थानांचा कंटाळा येऊन, युद्धसंबंधानें आपणांस झालेल्या खर्चाबद्दल म्हणून त्यांनीं ४००००० पौंड घेऊन राजाला १६४७त जान्युअरीच्या ३० व्या तारिखेस **पार्लेमेंटा**च्या हवालीं केलें.

त्याला **नार्थहाम्प्टनशायरां**त **हॉम्बिहौस**मध्यें ठेवलें, आणि त्याला मोठ्या सन्मानानें वागविलें. नंतर **पार्लेमेंट** आणि त्यांची फौज ह्यांच्या दरम्यान कलह सुरू झाला, त्यामुळें मी पुनः लवकरच राजा होईन अशी तो आशा करून होता. आतां युद्ध संपलें,

राजा कैदी होतो, १६४७.

म्हणून फौजेचें देणें निघत होतें त्यापैकीं षष्ठांश मात्र देऊन तिला फांटा द्यावा, असा **पार्लमेंटचा** इरादा होता. परंतु त्या फौजेंत जे माणूस होते, त्यांनीं आपला धर्म आणि स्वातंत्र्य ह्यांकरितां मोठमोठ्या घशी किंवा नुकसानें सोसलेलीं होतीं, ह्यास्तव, आमच्या इच्छेस येईल त्या रीतीनें आम्हांला भजनपूजन करण्याची मोकळीक दिली आहे असें वचन मिळे तोंपर्यंत, आमच्या मुशाऱ्याची बाकी निघत असेल ती देण्यांत येई तोंपर्यंत, आणि आम्हांपैकीं लढाईत मेलेल्या लोकांच्या विधवा स्त्रिया आणि पोरकीं मुलें ह्यांच्या पोटापाण्याचा बंदोबस्त होई तोंपर्यंत, आम्हांला फांटा देण्याचा हुकूम आम्ही मानणार नाहीं असें त्यांनीं साफ सांगितलें. वास्तविक पाहतां, ते फौजेंतले लोक, आम्ही आज शेर किंवा अति बलाढ्य आहों, असें ओळखून चुकले होते, आणि एके दिवशीं, म्हणजे १६४७ त जूनच्या २३ व्या तारिखेस, उत्पन्न झालेला कलह चालू असतांच, **कॉर्नेट** (स्वारांचा एक अमलदार) **जॉइस** ह्याच्या हुकमतीखालीं एक घोडेस्वारांची टोळी **हॉम्बि-हौस** एथें गेली, आणि तिनें सर्व सत्ता आपल्या हातीं यावी ह्या इराद्यानें, राजाला तेथून **हाम्टनकोर्ट** एथें पळवून आणलें. इतक्यांत शहरांतल्या एका बंडाळ जमातीनें **पार्लमेंटच्या** दिवाणखान्यांत घुसून गर्दी केली, आणि मोठे दंगे होण्याचा रंग दिसूं लागला. अशा ह्या चिमट्यांत किंवा कातरींत **पार्लमेंट** सांपडलें असतां, त्या फौजेचा कांहीं भाग, **क्राम्वेल** आणि **फेरफाक्स** ह्यांच्या हुकमतीखालीं कूच करून **लंडनास** आला,

राजाला फौजेनें पकडून आपल्या हातीं घेतलें.

आणि प्रत्यक्ष राजाशीं आपणांस योग्य वाटतील ते करार करून घेण्याचा त्यांतील लोकांनीं निश्चय केला.

स्काटांशीं आणि आयरिशांशीं राजा फंदफितूर करतो.

तेव्हां मागलेंच गाणें पुनः सुरू झालें. **चार्लसानें**, एकीकडे तुम्ही उठून मला पाठबळ द्याल तर तुम्हांला जें पाहिजे असेल तें मी देईन असें वचन देऊन **स्काटांशीं** व **आयरिशांशीं** गुप्तपणें सारा वेळ मसलती चालविल्या होत्या, आणि एकीकडे त्यानें त्या फौजेंतील लोकांशीं बोलणें करण्याचें ढोंग मांडलें होतें. नंतर तो नोव्हेंबरच्या १२ व्या तारिखेस **हाम्टनकोर्ट** एथून निसटून **आइल आफ् वाइट** नांवाच्या बेटांत पळून गेला, परंतु त्याला तेथें पकडून त्या बेटांतील **कारिस्ब्रूक कास्टल** नांवाच्या किल्ल्यांत पुनः कैदेंत ठेवलें. इतक्यांत त्यानें पूर्वी चालविलेल्या मसलतींत त्याला यश येऊन **स्काटांचें** मन वळवून त्यांना त्यानें **इंग्लंडावर** स्वारी करण्यास लावलें, आणि **वेल्स**, **केन्ट**, आणि **एसेक्स**, ह्या प्रांतांत त्यानें राजपक्षीय लोकांना चिथवून बंड करावयास लावलें.

दुसरें आपआपसांतलें युद्ध, १६४८.

ह्या दुसऱ्या आपआपसांतील युद्धानें राजाचा नाश झाला. **फेरफाक्सानें केन्ट** आणि **एसेक्स** प्रांतांतील बंड मोडलें. **क्राम्वेल्लानें वेल्स**मधलें बंड मोडलें, आणि नंतर त्यानें १६४८ त आगस्टच्या १७ व्या तारिखेस **प्रेस्टन** एथें **स्काटांचा** पराभव केला. ज्या राजानें एकीकडे गुप्त रीतीनें युद्ध उत्पन्न केलें, आणि एकीकडे आपणांला वचनें देऊन फसविलें, त्या राजाचा शेवट लावला पाहिजे असा निश्चय करूनच **प्रेस्टन** एथून शिपाई माघारे आले. ते म्हणाले, राजा जिवंत असेल तोंपर्यंत स्वस्थता होण्याचा संभवच उरला

नाहीं. आतां न्यायाधीशांनीं राजाची चौकशी आम्ही करणार नाहीं असें सांगितलें, किंवा **पार्लमेंट** त्यावर दोषारोप करण्याला कोंडतच नेमीना, म्हणून कांहीं मुजाखा उरला नाहीं. सारें सैन्यच धनी झालें. नंतर एका दिवशीं सकाळीं **कर्नेल प्राइड** हा, एक शिपायांची पलटण संगतीं घेऊन, **पार्लमेंट**च्या सभागृहाच्या दरवाज्यांत जाऊन उभा राहिला, आणि **सर हेन्री व्हेन** ह्यासारखें, **पार्लमेंट**च्या सभेपैकीं ज्या सभासदांनीं राजाचा न्याय करण्याला आम्ही बसणार नाहीं म्हणून सांगितलें, त्यांना त्यानें तेथून घालवून दिलें. ह्या कृतीला "**प्राइड्स पर्ज**" (प्राइडचें विरेचन) असें नांव पडलें. तें विरेचन संपल्यावर फक्त त्रेपन्न सभासद उरले, आणि त्यांनीं राजाच्या चौकशीकरितां एक न्यायसभा नेमली. तींत एकशेंपसतीस गृहस्थांच्या नेमणुका केल्या. **ब्राड्शॉ** नांवाचा प्रसिद्ध धर्मशास्त्रवेत्ता वकील होता, त्याला त्या न्यायसभेचा अध्यक्ष नेमलें, आणि **क्रॉम्वेल** आणि त्याचा जांवई **आयर्टन** हे त्या न्यायसभेंत होते; परंतु जेव्हां तो प्रतापी **जनरल फेरफाक्स** (सेनाधिपति फेरफाक्स) ह्याचें नांव पुकारलें, तेव्हां त्याच्या बायकोनें मोठ्यानें ओरडून सांगितलें. " तो एथें नाहीं, आणि तो कधींही एथें येणार "नाहीं, त्याला नेमण्यांत तुम्ही रास्त नव्हे ती गोष्ट करीत आहां."

प्राइड्स पर्ज म्हणजे प्राइड ह्या नांवाच्या पुरुषाचें विरेचन किंवा रेचक, तारीख ६ डिसेंबर १६४९.

ह्या न्यायसभेला, नेमलेल्या एकशे पसतीसांपैकीं फक्त त्रेसष्ट गृहस्थ आले, आणि तीपुढें राजाला, १६४९ त जान्युअरीच्या २० व्या तारिखेस अधिकारानें बोलावणें करून आणविलें, आणि तुम्ही प्रजापीडक, राज्यद्रोही, आणि खुनी, आहां असा त्यावर आरोप केला. त्यानें आपल्यावरील दोषनिवृत्तीबद्दल कांहींही बोलण्याचें

नाकारिलें, कारण खरोखर ती चौकशी म्हणजे केवळ थट्टा होती; आणि त्याचा शिरच्छेद करावा हें त्याला शासन ठरविलें. पुढें नऊ दिवसांनीं, त्यानें आपलीं सर्वांत लहान दोन मुलें, **हेन्री** आणि **एलिझाबेथ,** (हींच काय तीं त्या वेळीं इंग्लंडांत होतीं) ह्यांचा हृदयद्रावक प्रकारानें शेवटचा निरोप घेतला, आणि, **हेन्रीला** आज्ञा केली कीं, जोंपर्यंत तुझे वडील भाऊ, **चार्लस** आणि **जेम्स,** हे जिवंत असतील, तोंपर्यंत तूं राजा होऊं नको. तेव्हां त्या शूर बालकानें उत्तर केलें, "मी पहिल्यानें आपले फाडफाडून तुकडे करून घेईन." नंतर त्याचा बाप तो **चार्लस** बाहेर चालत येऊन, **व्हाइटहाल** नांवाच्या राजमंदिराच्या एका खिडकीच्या बाहेरल्या आंगास पहाड बांधला होता त्यावर, शांतचित्तानें आणि गौरवाच्या मुद्रेनें चढला. तेथें १६४९ त जान्युअरीच्या ३० व्या तारिखेस त्याचा शिरच्छेद केला.

राजाची चौकशी होऊन त्याचा शिरच्छेद होतो, तारीख ३० जान्युअरी १६४९.

प्रकरण १८.

इंग्लंडांत लोकसत्ताक राज्यपद्धतीनें राज्य चालविण्याचा प्रयत्न होतो.

धि कामन्वेल्थ, म्हणजे लोकसत्ताक राज्य, १६४९–१६६०.

राजा मृत्यु पावला, आणि थोड्याशा (ऐशींहून ज्यास्ती नाहींत) सभासदांचें मिळून **पार्लमेंट** अद्यापि होतें, आणि त्या देशांत सरकार म्हणून ते सभासदच काय ते उरले होते. त्या सभासदांनीं **हौस**

आफ् लार्ड्स मोडून नाहींसें केलें, आणि राजाची आतां जरूर राहिली नाहीं असा ठराव केला. नंतर त्यांनीं राज्यकारभार चालविण्यासाठीं चाळीस सभासदांचें **कौन्सिल आफ् स्टेट** (राज्याचें मंत्रिमंडल) म्हणून एक मुतसद्दीमंडळ निवडून नेमलें, आणि १६४९ त मेच्या १९ व्या तारिखेस राज्य "**कामन्‌वेल्थ**" किंवा "**फ्री स्टेट**" (लोकसत्ताक, किंवा स्वतंत्र राष्ट्र) झालें असा डांगोरा पिटला. हें **कामन्‌वेल्थ** (लोकसत्ताकराज्याधिकारीमंडल) एका राजाचा वध करून उत्पन्न झालें, असें असून, तेंच त्या देशाचें कल्याण करावें असें इच्छित होतें. हा विचित्र प्रकार समजून घेण्याला आपण प्रयत्न करून आपणांला त्या **कामन्‌वेल्थ**च्या स्थानीं ठेवून पाहिलें पाहिजे. **फेरफाक्स** आणि **व्हेन** हे दोघे पुनः त्या लोकसत्ताकराज्याधिकारीमंडलांत मिळाले, कारण राजाचा वध केला ह्या भयानक कृत्याविरुद्ध आतां तक्रार करून ह्यापुढें कांहीं उपयोग होण्याजोगा नव्हता. **क्राम्वेल** तर त्या राज्याधिकारीमंडलांत होताच. तो निष्ठुर, आणि धर्मपिसा, असून **बायबलाच्या जुना करार** नांवाच्या भागांतील कडक आज्ञांना अनुसरून सर्व कर्मांत वागणारा होता. तसाच त्यांत **ब्राड्‌शॉ** होता. त्यानें, राजा देशाचा नाश करील अशा भीतीनें, त्यावर अपराध लागू करून शिक्षा ठरविली होती, आणि **क्रॉम्वेल्लाचा** जांवई **आयर्टन** त्यांत होता. तो शूर आणि नेकीचा शिपाई होता. हे सारे त्या राज्याधिकारीमंडलांतले प्रमुख लोक होते, आणि त्यांच्याबरोबर **मार्टेन, स्काट, लड्लो,** आणि **हचिन्सन** हे व ह्यांसारखे दुसरे पुष्कळ इमानी लोकसत्ताकराज्यभक्त होते.

कामनवेल्थ, तारीख १९ मे १६४९.

त्या सर्वांच्यापुढें मोठें दुष्कर किंवा अवघड काम करावयाचें

पडलें होतें. सर्व यूरोपखंड त्यांना औदासीन्यानें मानीत होतें. त्यांच्या परमुलखी वकीलांपैकीं **हेग** एथील वकीलाचा खून झाला. तेथें **चार्लस स्टयूअर्ट**, पहिल्या **चार्लस** राजाचा सर्वांत वडील मुलगा, ह्याला **दुसरा चार्लस** ह्या नांवानें उघडपणें राजा म्हणून मान्य केलें. त्या **कामन्वेल्थ**च्या सभासदांनीं एकत्र बसून कामकाजास आरंभ करूं लागण्याच्या पूर्वीच दुसऱ्या एका **मड्रिड** एथील वकीलाचा खून झाला. युद्धसंबंधानें जबर कर बसले होते त्यामुळें, आणि फांटा दिलेले राजाच्या पक्षाकडील शिपाई आणि वाटमाऱ्ये ह्यांनीं सारा देश स्वाऱ्या घालून आक्रांत केला होता त्यामुळें, **इंग्लंडां**तील लोकही असंतुष्ट झालेले होते. ही सर्वसामान्य अस्वस्थता, **ऐकॉन बासिलैके** ऑर धि **रॉयल इमेज** (राजाची मूर्ति किंवा प्रतिमा) ह्या नांवाच्या पुस्तकानें वृद्धिंगत झाली. तें पुस्तक वास्तविक कोणा एका **डॉक्टर गौडेन** नांवाच्या गृहस्थानें लिहिलेलें होतें, परंतु तें **चार्लस राजानें** कैदेंत असतां लिहिलें असा लोकांचा तर्क होता. त्या पुस्तकांत राजाची धर्मनिष्ठा, आणि त्यानें भोगलेले क्लेश, ह्यांचें हृदयवेधक चित्र उतरलेलें होतें, त्यामुळें, पुष्कळ लोक त्याला आपल्या धर्ममताकरितां प्राण देणारा असा लेखूं लागले, आणि आपआपसांतील युद्धापूर्वीचा सुखकर गतकाल पुनः येईल तर बरें, अशी ते उघडपणें इच्छा करूं लागले. नंतर १६४९ त फेब्रुअरीच्या १२ व्या तारिखेस, **स्काटांनीं** एकदम **दुसरा चार्लस** ह्याला आपला राजा केलें, म्हणून डांगोरा पि-

कामन्वेल्थला उत्पन्न झालेलीं संकटें.

ऐकॉन बासिलैके.

स्काटलंड आणि आयर्लंड हीं राजनिष्ठ राहतात.

टला. इतक्यांत **आयर्लंडांत ऑर्मंडचा ड्यूक** ह्यानें, **क्याथलिक्स** लोक, राजपक्षाचे लोक, आणि **अल्स्टरचे प्राटेस्टंट्स** लोक देखील, ह्यांना, त्या तरुण राजपुत्राच्या वतीनें एकदिल करण्याविषयीं यत्न केला तो सफल झाला, आणि **नेदर्लंड्सांतून** येऊन आपल्या राज्याकरितां युद्ध करा असें त्या **ड्यूकानें** त्या सर्वांच्या तरफें त्या राजपुत्राला बोलावणें केलें. शेवटीं, राजपक्षाकडील अकरा जहाजें **डचांच्या** बंदरांत **प्रिन्स रूपर्ट** ह्यानें सुरक्षित ठेवलेलीं होतीं तीं संगतीं घेऊन तो **इंग्लिश चानल**मध्यें **इंग्लिश** व्यापाऱ्यांच्या जहाजांवर हल्ले करण्यासाठीं आला.

प्रिन्स रूपर्ट हा इंग्लिश चानलमध्यें येतो.

ह्या सर्व संकटांनीं, राज्याधिकारी लोकांच्या त्या लहानशा समुदायाला, **पार्लमेंटाचें** विसर्जन करून, लोकांकडून नवीन **पार्लमेंटा**करितां सभासदांच्या निवडणुका करवून त्यांना (लोकांना) आपल्यावर अमल करण्याला राज्यव्यवस्था कशा प्रकारची असावी ह्या गोष्टीचा निर्णय करूं देण्याला, भय वाटत होतें. उलटपक्षीं, **पार्लमेंटाच्या** बाकी राहिलेल्या त्या तुकडीनें, **पार्लमेंट** त्यासमयीं होतें तसेंच पुढें चालू ठेवण्याचा निश्चय केला; आणि त्यावेळचें अत्यंत निकडीचें संकट म्हटलें म्हणजे **आयर्लंडांतील** बंड हें होतें, म्हणून त्या तुकडींतील सभासद लोकांनीं, **क्रॉम्वेल्लाला** १२००० फौज बरोबर देऊन **आयर्लंडास** पाठवून आपल्या कामाला आरंभ केला. ही **आयर्लंडास** फौज पाठवितांना देखील त्यांना अडचण उत्पन्न झाली. त्या फौजेंतल्या शिपायांनीं दंगा केला, आणि आपणांला वागविणारा अधिपति कोण हें जेव्हां त्यांस कळलें, तेव्हांच मात्र ते जाण्यास कबूल झाले.

क्रॉम्वेल्ल १६४९ त आगस्टच्या १५ व्या तारिखेस, समुद्र

ओलांडून जाऊन, **आयर्लंडांत** जमिनीवर उतरला. त्या वेळीं फक्त **डब्लिन** शहर काय तें **पार्लमेंटच्या** हातीं राहिलेलें होतें.

क्रॉम्वेल आयर्लंडांत जातो, १६४९.

तीन महिन्यांत त्या साऱ्या देशाचा तो मालक झाला. परंतु त्यानें तो देश भयंकर कडवेपणानें जिंकला. आपल्याला आपलें काम त्वरेनें आटोपलें पाहिजे हें तो जाणून होता, आणि १६४१ त **आयरिशांनीं** केलेल्या कत्तलीबद्दलची (३९९ वें पृष्ठ पहा) **देवानें** केलेली शिक्षा मी अमलांत आणीत आहें असा त्याचा विश्वासपूर्वक ग्रह होता. म्हणून, **ड्राघीडा** नांवाच्या शहराला वेढा घालून युद्धाला आरंभ झालेला होता त्या वेळ्याच्या समयीं, जो कोणी हत्यारबंद भेटेल त्याला वगळूं नये असा त्यानें आपल्या शिपायांना हुकूम दिला होता. सप्टेंबरच्या ११ व्या तारिखेस रात्रीं जेव्हां ते शिपाई तटाला खिंडार पाडून त्या शहरांत शिरले तेव्हां, २००० त एकही कमी नाहीं इतकीं माणसें त्यांनीं तरवारींनीं कापलीं. त्या शहरांत **सेन्ट पीटर** नांवाचें देवालय होतें, त्याचा पुष्कळ लोकांनीं आश्रय केलेला होता, त्या देवळाला त्यांनीं आग लावली; आणि जे शरण आले त्यांपैकीं प्रत्येक दहाव्याला गोळ्या घालून मारलें, आणि बाकीच्यांना **बार्बेडोझ** नांवाच्या बेटांत गुलाम करून पाठविलें. **वेक्सफर्ड** एथें आक्टोबरच्या ११ व्या तारिखेस ह्यासारखीच कत्तल झाली, परंतु ती **क्रॉम्वेलाच्या** हुकुमानें झाली नाहीं. ह्यानंतर पुढें प्राणनाश कमी झाला, कारण इतर शहरें भयाभीत होऊन शरण आलीं; तथापि, ह्या दोन कत्तली, **क्रॉम्वेलाचें** स्मरण ह्यात्याबरोबर त्याच्या नांवाला निरंतर कलंकासारख्या होऊन राहतील.

ड्राघीडा आणि वेक्सफर्ड ह्या दोहों शहरांचे वेढे, १६४९.

आयर्लंड काबीज करण्याच्या उद्योगांत, तो त्या देशांत नऊ महिने राहिला, आणि त्या कालावधींत इंग्लंडांत कौन्सिल राज्यकारभार करीत होतें. सर् हारी व्हेन ह्याला अरमाराचा अधिपति केलें, आणि त्याच्या हाताखालीं तो विख्यात आड्मिरल ब्लेक (अरमाराचा नायक किंवा अध्यक्ष ब्लेक) होता; त्यानें लवकरच कीर्तिप्रद जय मिळवावे असा योग होता. कवि मिल्टन ह्याला कौन्सिलाचा लाटिन सेक्रेटरी (लाटिन चिटणीस) केलें, कारण त्या भाषेंत पत्रव्यवहार चालविण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य होतें, आणि ब्राड्शॉ हा कौन्सिलाचा अध्यक्ष होता.

इंग्लंडांतील मुलकी राज्यकारभाराची व्यवस्था.

त्या कौन्सिलदारांना लवकरच एका नवीन संकटाची निर्गति करण्याचा प्रसंग आला, कारण १६५० त जूनच्या २४ व्या तारिखेस चार्लस हा समुद्रावरून येऊन स्काट्लंडांत जमिनीवर उतरला अशी खबर येऊन पोहोंचली. तेथले कॉव्हेनांटर्स (करारनाम्यानें जूट करणारे) ह्यांनीं, जरी राजपक्षाकडील मान्ट्रोझचा अर्ल ह्याला फांशीं दिलेलें होतें, तरी, चार्लसानें जेव्हां, त्यांचा तो कॉव्हेनांट (करारनामा), व प्रेस्बिटीरियन धर्म, ह्यांचा संभाळ करीन अशी शपथ घेतली, तेव्हां त्याच्याकरितां ते लढण्याला राजी झाले. तेव्हां, जर स्काच फौज संगतीं घेऊन चार्लस कूच करून इंग्लंडांत आला, तर ती किती संकटकारक गोष्ट होईल, हें इंग्लंडांतील कामन्वेल्थच्या तत्काल नजरेस आलें, आणि त्यांतील सभासदांनीं, चार्लस स्काट्लंडांत असतांच, त्यावर तेथें हल्ला करण्याचा निश्चय केला. परंतु

दुसरा चार्लस स्काट्लंडांत येऊन पोहोचतो, तारीख २४ जून १६५०.

त्यांनीं जेव्हां **स्काट्लंडा**वर पाठवावयाच्या सैन्याचें आधिपत्य करण्यास **फेरफाक्स**ला सांगितलें, तेव्हां, **स्काटां**नीं आपण होऊन **इंग्लंडा**वर हल्ला केल्याशिवाय **स्काट्लंडा**शीं केलेला करार मोडण्याचा तुम्हांला बिलकूल हक्क नाहीं असें सांगून, त्यानें फौजेचें आधिपत्य करण्याचें नाकारिलें.

ह्यास्तव त्या फौजेचें आधिपत्य स्वीकारण्याकरितां **क्रॉम्वेल्ला**ला **आयर्लंडां**तून माघारें बोलावलें, आणि तो परत आला तेव्हां **लंडनां**त त्याचा मोठा आदरसत्कार करून, त्याला १६००० फौजेनिशीं उत्तरेकडे पाठविलें. तो जेव्हां सरहद्द ओलांडून गेला तेव्हां, **स्काट्लंडा**च्या दक्षिणेकडील लोकांनीं **आयर्लंडां**तील त्याचा कडवेपणा ऐकला होता म्हणून ते उत्तरेकडे पळून गेले, आणि तो दक्षिणेकडील मुलूख त्यांनीं सारा उजाड सोडून दिला. पुढें **क्रॉम्वेल्ला**चे शिपाई किती चांगल्या प्रकारें वागतात हें जेव्हां त्या पळून गेलेल्या लोकांनीं ऐकलें तेव्हां, त्यांपैकीं पुष्कळ परत आले. तथापि अन्नसामग्री फारच दुर्मीळ झाली, आणि जेव्हां ती फौज **एडिंबरो**जवळ पोहोंचली, तेव्हां समुद्रा**वरून** फौजेला अन्नसामग्री मिळत जाण्याची सोय व्हावी म्हणून, समुद्रकांठीं **डन्बार** नांवाच्या गांवीं **क्रॉम्वेल्ला**ला फौज घेऊन मागें हटून जाणें भाग आलें. त्या गांवानजीक त्या **इंग्लिश** फौजेच्या तळाच्या दक्षिणेस, **लाम्मरमूर** नांवाच्या टेंकड्या होत्या. त्यांवर **स्काच** सेनापति, **डेव्हिड लेस्ली**, ह्यानें आपली फौज युक्तीनें नेऊन ठेवली. त्यामुळें त्या **इंग्लिश** फौजेचें **बेरिक** आणि **इंग्लंड** ह्यांच्याशीं दळणवळण अगदीं तुटलें. तेव्हां **क्रॉम्वेल्ल** महत्संकटाच्या स्थितींत पडला. त्याचे शिपाई आजारी

क्रॉम्वेल्ल स्काट्लंडांत जातो, १६५०-१६५१.

होऊन उपाशीं मरूं लागले, आणि स्काट लोक त्या टेंकड्यांवर होते तोंपर्यंत, त्यांवर त्याच्यानें हल्ला करवेना. इतक्यांत त्याच्या सुदैवानें, ते कॉव्हेनांटर्स, म्हणजे स्काच लोक, उतावळे झाले, आणि एका दिवशीं तिसऱ्या प्रहरीं, लेस्ली आपल्या लोकांना त्या टेंकड्यांवरून खालीं उतरवून, एका लहानशा ओढ्याकडे नेत आहे असें त्यानें पाहिलें. त्या ओढ्यावरून डन्बाराला जाण्याला सुगम मार्ग होता. तेव्हां लेस्लीच्या मनांत आपणावर हल्ला करावयाचा आहे हें त्यानें तत्काल जाणलें, म्हणून आपणच पहिल्यानें लढण्याला आरंभ करावा असा त्यानें निश्चय केला. नंतर तो आपल्या सरदारांपैकीं एक लांबर्ट नांवाचा सरदार होता त्याला म्हणाला, "आतां देवानेंच त्यांना माझ्या हातीं दिलें आहे." दुसऱ्या दिवशीं सकाळीं, म्हणजे १६५० त सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस, सूर्योदय होण्यापूर्वीं त्यानें आपली फौज चालती केली, तेव्हां तींतील शिपायांनीं, "जय सैन्याचा देव, जय सैन्याचा देव" अशी आरोळी ठोकीत, स्काट लोक पुरे जागेही झाले नाहींत तोंच त्यांवर हल्ला केला. तेव्हां कांहीं मिनिटेंपर्यंत त्या ओढ्यावर तुंबळ लढाई झाली. परंतु इतक्यांत स्काटांना एकाएकीं दहशत पडली, आणि सूर्य उगवतो तों त्यांची सारी फौज अव्यवस्थेनें, सैरावैरा पळतांना दृष्टीस पडली.

डन्बारची लढाई, तारीख ३ सेप्टेंबर, १६५०.

एका तासांत ती फौज उधळली. मग क्रॉम्वेलानें पहिल्यानें, आपल्या साऱ्या फौजेस थोपवून उभें राहण्यास हुकूम केला, आणि त्यानें बायबलांतलें ११७ वें गीत गाइलें, आणि नंतर तो त्या पळणाऱ्या फौजेच्या पाठीस लागला. तीपैकीं ३००० लोक ठार मारले, आणि १०००० पकडून कैदकेले; आणि त्या फौ-

जेचें बहुतेक सामानसुमान आणि तोफा छिनावून घेतल्या. **एडिं-बरो**च्या वेशी उघडल्या, आणि **क्रॉम्वेल्लानें** तें शहर हस्तगत केलें.

इतकें झालें तथापि तो सुमारे आणखी एक वर्षपर्यंत **स्काट्लं-डां**त लढत राहिला. राजपक्षाकडील लोक आणि **कॉव्हेनांटर्स** ह्यांनीं एक नवी फौज तयार केली, आणि **दुसरा चार्लस** ह्याला १६५१ त जान्युअरीच्या १ ल्या तारिखेस, **स्कोन** एथें मुकुट मस्तकीं घालून राज्याभिषेक केला. शेवटीं **क्रॉम्वेल्लानें फाइफ्** हा **कौंटी** सर केला, आणि **स्काट्लंडा**च्या उत्तरेकडील मुलुखाचा **चार्लसा**चा लगा तोडून टाकला; परंतु, त्याला त्यानें, कदाचित् जाणूनबुजून, **इंग्लंडा**चा मार्ग खुला ठेवला. **चार्लस स्काट्लंडां-**तील त्या कडकडीत **प्रेस्बिटीरियन**पंथी लोकांना कंटाळला, आणि **इंग्लिश** लोकांमध्यें जाऊन आपल्या दैवाची परीक्षा पाहण्याचा त्यानें निश्चय केला. म्हणून आपला तळ मोडून, कूच करून तो **लांकाशायर**मधून दक्षिणेकडे जाऊन तिकडून, **इंग्लंड**च्या पश्चिमेकडील मुलूख नेहमीच राजनिष्ठ होता तिकडे गेला. तिकडेही एका ठिकाणीं स्थिर न राहतां तो पुढें पुढें चालला. **क्रॉम्वेल्ल** त्याच्या पाठोपाठ येतच होता. परंतु **इंग्लिश** लोकांपैकीं हिय्या करून त्याला इतके थोडे लोक मिळाले कीं, शेवटीं जेव्हां **वूर्स्टर** एथें त्याला **क्रॉम्वेल्लानें** गांठलें, तेव्हां, **क्रॉम्वेल्ला**च्या ३०००० लोकांशीं सामना करण्याला त्याच्याजवळ अवघे १६००० लोक होते. नंतर सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस, म्हणजे **डनूबा-र**च्या लढाईपासून बरोबर एक वर्ष भरण्याच्याच दिवशीं, **वूर्स्टर**ची प्रख्यात लढाई झाली. त्या लढाईत राजपक्षीय लोकांचा पूर्ण पराजय झाला, **जनरल (सेनापति) लेस्ली** ह्याला धरून

वूर्स्टरची लढाई, ता. ३ सेप्टेंबर १६५१.

कैदकेलें, आणि **चार्लस** कपटवेष घेऊन पळाला. तो इतक्या पराकाष्ठेच्या पेंचाटींत सांपडला कीं, त्याला एक सगळा दिवस **ऑपशायरां**तील **बास्कोबेल वूड** नांवाच्या जंगलांत, खालून **पार्लमेंट** तरफेचे शिपाई इकडूनतिकडे जातयेत असतां, एका ओक नांवाच्या वृक्षाच्या ढोलींत लपून राहवें लागलें. **हम्फ्री पेन्डरेल्ल** नांवाचा एक पीठ दळण्याच्या कारखान्याचा मालक, आणि त्याचे चौघे बंधु, ह्यांनीं त्याला लपवून ठेवून त्याचा प्राण वांचविला, ह्या गोष्टीबद्दल त्यांचें नेहमी स्मरण राहील; आणि अनेक असलीं दैवावर हवाला ठेवून साहसें करून तो **चार्लस ब्राइटन** एथें पोहोंचला. तें त्या काळीं एक लहानसें मासे मारणाऱ्या कोळीलोकांचें खेडें होतें. तेथून तो एका दगडीकोळसे वाहणाऱ्या जहाजावरून समुद्र ओलांडून **नार्मंडीस** गेला.

दुसरा चार्लस पळून जातो, १६५१.

ह्या काळापासून **इंग्लंडां**तील **कामन्‌वेल्थ**ला परदेशीय राष्ट्रें मान देऊं लागलीं, आणि तें त्या देशांतील सर्वमान्य **सरकार** अशा समजानें तीं राष्ट्रें त्याच्याशीं वर्तूं लागलीं. **आड्मिरल ब्लेक** ह्यानें ह्यापूर्वींच **प्रिन्स रूपर्ट**चा समुद्रावर पराभव केलेला होता; आणि **डच्च** लोकांनीं **चार्लसा**ला आश्रय दिलेला होता म्हणून त्यांना दणका द्यावा, आणि त्याच वेळीं **इंग्लिश** अरमार वाढवावें, असा आतां **व्हेन** ह्यानें निश्चय केला. १६५१ च्या आक्टोबरांत, **"नाव्हिगेशन् आक्ट"** (जहाजांनीं चालणाऱ्या व्यापाराच्या बंदोबस्ताविषयीं कायदा) ह्या नांवाचा एक कायदा पसार केला. त्या कायद्यानें, **इंग्लंडां**त येणारा परदेशीय माल **इंग्लिश** जहाजें, किंवा ज्या देशांतून तो माल येई त्या दे-

नाव्हिगेशन आक्ट, आणि डच्च लोकांशीं युद्ध, १६५१–१६५३.

शाचीं जहाजें, ह्यांनींच आणावा, त्यांखेरीज इतर देशच्या जहाजांनीं आणतां कामा नये अशी मनाई केली. आतां परदेशांतून **इंग्लंडांत** माल वाहून आणणारे मुख्यत्वेंकरून **डच** लोक असत. म्हणून त्या कायद्यानें तो व्यापार त्यांच्या हातून जाऊन **इंग्लिश** जहाजांना मिळाला. ह्या व्यापाराच्या संबंधानें **हालंड** देशाशीं वाटाघाट चालली असतां, **डच** लोकांचें अरमार **आड्मिरल ट्राम्प** नांवाच्या नाविक अधिपतीच्या हुकमतीखालीं असून त्याची, **ब्लेक** ह्याच्या हुकमतीखालीं असलेल्या **इंग्लिश** अरमाराशीं **इंग्लिश चानल**मध्यें गांठ पडली, तेव्हां त्या अरमारांची लढाई झाली, तींत **डच** लोकांचा पराभव झाला, आणि त्या वेळेपासून त्या दोन्ही देशांच्या दरम्यान अरमारी किंवा समुद्रावरील युद्ध जुंपलें, तें दोन वर्षेंपर्यंत चाललें. पुढें १६५२ च्या नोव्हेंबरांत, एका लढाईत **ट्राम्प** ह्यानें जय मिळविला, आणि त्यानें आपल्या जहाजाच्या डोलकाठीच्या टोंकाला एक केरसुणी बांधली, आणि "मीं **इंग्लिशांना** समुद्रावरून केरासारखें झाडून "टाकलें," असें दाखविण्याकरितां तो आपलें जहाज **इंग्लिश चानल**वरून हकारून गेला. परंतु त्यानें अतिशय लवकर बढाई मारण्यास आरंभ केला, कारण पुढें पुष्कळ लढाया झाल्या त्यांत **डच्चांचें** मनस्वी नुकसान झालें. नंतर शेवटीं एका लढाईत त्यांचा पूर्ण पराभव झाला, आणि **ट्राम्प** हा ठार मारला गेला. त्या काळापासून हा वेळपर्यंत, **इंग्लंड** ही समुद्रांची स्वामिनी होऊन राहिली आहे, आणि ज्या आमच्या अर्वाचीनकालिक अरमाराची **एलिझाबेथ**च्या कारकीर्दीत प्रथम सुरवात झालेली

डच्चांचा पूर्ण पराभव होतो, फेब्रुअरी १६५३.

होती, त्या आरमाराच्या अभ्युदयाकरितां, आम्ही **व्हेन** आणि **ब्लेक** ह्या उभयतांचे ऋणी आहों.

ह्या प्रकारें **कामन्वेल्थ**ला परदेशीं मान मिळत असतां, स्वदेशीं त्याला संकटें उद्भवूं लागलीं होतीं. आम्हांला ही गोष्ट स्मरणांत ठेवली पाहिजे कीं, ज्या ऐशीं सभासदांचें **पार्लमेंट** म्हणून होतें, त्यांनीं, राजाच्या मृत्यूनंतर, नवीन सभासदांच्या निवडणुका करून नेमणुका करण्याविषयीं, किंवा आपणांलाच पुनः निवडून नेमण्याविषयीं, राष्ट्रांतील लोकांना कधींही अर्ज केला नव्हता. ह्यास्तव ते सभासद साऱ्या राष्ट्राचे खरे प्रतिनिधि होते असें त्यांना म्हणतां येत नव्हतें. त्यांपैकीं पुष्कळ जण, **फेरफाक्स, व्हेन,** आणि **ब्राड्शॉ** ह्यांइतके नेकीचे आणि प्रामाणिक नव्हते, आणि त्यांवर दडपण नव्हतें त्यामुळें त्यांकडून पुष्कळ अन्यायाच्या गोष्टी घडल्या. त्या सभासदांनी आपल्या सग्यासोयऱ्यांना सरकारी हुद्दे दिले, धर्मसंबंधांत ज्यांचा त्यांच्याशीं ऐक्यभाव नव्हता, त्यांवर, आणि ज्या राजपक्षीय लोकांनीं त्यांना लांच दिले नाहींत, त्यांवर, त्यांनीं जुलूम केला, आणि त्यांनीं केव्हां केव्हां आपल्या हिताकरितां कायद्यांचा विपर्यास केला. जेव्हां **क्रॉम्वेल वूर्स्टर** एथून परत आला, तेव्हां फार अनीतीचा राज्यकारभार त्यानें पाहिला, आणि तो मोडण्याची त्याला इच्छा झाली. आतां त्याच्या हाताखालीं जी फौज होती तिची त्यावर दृढ भक्ति होती. त्यानें, आणि त्या फौजेंतील अमलदार ह्यांनीं, **पार्लमेंटाचें** विसर्जन करून, योग्य असें नवें **पार्लमेंट** निवडणुका करवून जमवावें हें तुमचें कर्तव्य आहे तसें त्या सभासदांना सांगितलें. परंतु **व्हेन** देखील तसें करण्यास भीत होता. तसें केलें तर फौजेची मात्रा वर

सरकारी कारभारांत गैर प्रकार.

चढेल आणि **लोकसत्ताक राज्य** नष्ट होईल, असें त्याला भय वाटलें. म्हणून त्या सभासदांनीं आपल्याबरोबर सभेंत बसण्याकरितां दुसरे सभासद निवडावे, एवढीच गोष्ट दाखल करून त्यांनीं एका **आक्टा**चा मसूदा तयार केला.

सभासद नवीन पार्लमेंट जमवूं देण्याला नाकारितात.

क्रॉम्वेल्लानें, अशानें साऱ्या राष्ट्राला अर्ज केल्यासारखें होत नाहीं, म्हणून त्या मसूद्याला हरकत काढली, तेव्हां प्रयत्न करून उभय पक्षांची गोडीगुलाबी राहून कांहीं तरी एक समजूत निघावी म्हणून बोलणें चालणें करण्यासाठीं लष्करचे अमलदार, व त्या सभासदांपैकीं कांहीं, ह्यांच्या मिळून बैठका होऊं लागल्या.

एके दिवशीं, म्हणजे १६५३ त एप्रिलच्या २० व्या तारिखेस, जेव्हां **व्हाइटहाल** एथें असली एक बैठक चाललेली होती, तेव्हां बाकीचे सभासद **वेस्टमिन्स्टर** एथें जमून आपला मसूदा पसार करीत आहेत, अशी **क्रॉम्वेल्ला**ला खबर कळली. कोणतेंही काम करण्याला त्याकडून विलंब म्हणून कसला तो व्हावयाचाच नाहीं असा तो होता. तो, तत्काल संगतीं एक बंदुकवाल्या शिपायांची पलटण घेऊन, त्वरेनें **पार्लमेंट**च्या सभागृहाला गेला, आणि त्या शिपायांना बाहेर ठेवून, आपण आंत जाऊन, तेथें चाललेली भवति न भवति कान देऊन ऐकत राहिला. इतक्यांत जेव्हां सर्व सभाजनांचें मत घेण्यासाठीं, "आतां हा मसूदा पसार करावा ना?" हा प्रश्न विचारला, तेव्हां तो उठला आणि पावलें टाकीत त्या दिवाणखान्याच्या जमिनीवर फिरत राहून त्यानें, त्या सभासदांनीं ज्या चांगल्या गोष्टी केल्या होत्या, त्यांबद्दल त्यांची प्रथम तारीफ केली, आणि नंतर त्यांचा अन्याय किंवा अनीति, आणि स्वार्थपरता, ह्यांबद्दल त्यांना त्यानें दूषण ठेवलें. मग तो म्हणाला, "या

" या, मी तुमच्या ह्या वर्तनाची समाप्ति करतों. तुम्हीं ह्यापुढें ह्या " ठिकाणीं बसावें हें योग्य नाहीं. तुमची ही सभा पार्लमेंट " नव्हे." मग त्यानें आपल्या शिपायांना आंत बोलावून हें गृह ह्यांना घालवून देऊन रिकामें करा असा त्यांना हुकूम केला. नंतर स्पीकर, म्हणजे अध्यक्ष, ह्याची काठी किंवा दंड, त्याच्या अधिकाराची निशाणी म्हणून मेजावर ठेवलेला असतो तो उचलून, तो मोठ्यानें म्हणाला,

क्रॉम्वेल त्या सभासदांना पार्लमेंट सभेच्या जागेंतून घालवून देतो, तारीख २० एप्रिल १६५३.

"ह्या पुरणाच्या डागिन्याचें (भूसके लड्डूचें, निरुपयोगी वस्तूचें) काय "करावें? हा घेऊन जा." ते सभासद आपणांला हा अकस्मात् फांटा मिळाला म्हणून इतके थक्क होऊन गेले कीं, त्यांपैकीं एकटा एक सर हारी व्हेन ह्याला मात्र स्फूर्ति होऊन कानउघडणी करण्याला शब्द सुचले. तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, "हें भलाईचें काम नव्हे, "होय, खचीत नीति आणि सामान्य भलाई ह्यांना हें विरुद्ध आहे." तथापि क्रॉम्वेलानें त्या सर्वांना बाहेर घालवून देऊन दरवाज्याला कुलूप घालून, किल्ली त्यानें आपल्या खिशांत ठेवली, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोणी राजपक्षीय मस्कऱ्यानें त्या सभागृहाच्या दरवाज्यावर "हें घर भाड्यानें द्यावयाचें आहे, ह्यांत आतां सरंजाम "नाहीं (रिकामें आहे)" अशी लेखी जाहिरात डकवली.

ह्या प्रकारें त्या दीर्घकालिक पार्लमेंटाला, १६४० पासून एथवर सतत टिकून, शेवटीं हाकवून दिलें. परंतु कायदेशीर रीतीनें म्हटलें म्हणजे, खुद्द त्याच्या संमतीवांचून त्याचें विसर्जन करतां येत नव्हतें, म्हणून, त्याच्याविषयीं हकीकत पुनः ऐकण्यांत येईल. क्रॉम्वेल आणि लष्करी

फौजेचा अमल.

अमलदार ह्यांनीं, आतां लोकांनीं आपल्या धर्मोपाध्यायांच्या सल्ल्यानें निवडलेली, अशी सभा पाचारिली. तें **"धर्मनिष्ठ पार्लमेंट"** व्हावें असा बेत होता, आणि त्यांत **प्रेझ-गॉड-बेरबोन** नांवाचा एक सभासद होता, त्यावरून त्याला **"लिट्टल** (लहान) ऊर्फ **बेरबोनचें पार्लमेंट"** असें नांव पडलें. **स्कॉट्लंड, आयर्लंड** आणि **वेल्स** ह्यांनीं प्रत्येकीं सहा सभासद त्या **पार्लमेंटाला** पाठवले. त्या **पार्लमेंटानें** कांहीं चांगले कायदे पसार केले; त्यांपैकीं एक कर्जदार लोकांच्या सोडवणुकीकरितां होता, आणि दुसरा, जन्म, मृत्यु, आणि लग्नें, ह्यांची नोंद ठेवण्याविषयीं होता. परंतु त्या **पार्लमेंटांतील** सभासदांना इतक्या पुष्कळ सुधारणा करण्याची इच्छा झाली कीं, त्यांनीं साऱ्या राज्यकारभारांत घप्पाघोळ करून टाकला; आणि पांच महिनेपर्यंत बसून काम करून, नंतर त्यांनीं आपला अधिकार **क्रॉम्वेलाला** माघारा दिला. तेव्हां **कौन्सिलानें** एक **"इन्स्ट्रुमेन्ट आफ् गव्हर्नमेन्ट,"** म्हणजे राज्य चालविण्याच्या पद्धतीविषयीं लेख, तयार केला. त्यांत राज्यव्यवस्था नवीन घाटाची केली, आणि **क्रॉम्वेलाला, लार्ड प्रोटेक्टर** (अधिप किंवा संरक्षक) हा किताब देऊन राज्याचा मुख्य अधिकारी केलें.

लिट्टल उर्फ बेरबोनचें पार्लमेंट, जूलईच्या ४ थ्या तारिखेपासून डिसेंबरच्या १६ व्या तारिखेपर्यंत.

ह्या प्रकारें राजाच्या मृत्यूपासून पांचां वर्षांच्या आंत, पुनः एकच पुरुष सर्व राष्ट्रावर अमल करूं लागला. इतकेंच मात्र कीं त्याची सत्ता पहिल्यानें फारच समर्याद होती; कारण त्याच्या कौन्सिलांतील गृहस्थांनीं जन्मभर कौन्सिलांत असावें अशा करारानें त्यांना निवडलेलें होतें, आणि कायदे कर-

क्रॉम्वेल हा प्रोटेक्टर (अधिप किंवा संरक्षक) होतो, तारीख १६ डिसेंबर १६५३.

ण्यांत त्याला हो किंवा ना म्हणण्याचा अधिकार ठेवलेला नव्हता. शिवाय त्याला बहुत शत्रु होते. **रायलिस्ट्स** (राजपक्षीय लोक), **प्रेस्बिटीरियन्स** (एका विशिष्ट प्राटेस्टंट धर्मपंथाचे लोक), **रिपब्लिकन्स** (लोकसत्ताकराज्येच्छु, व्हेन आणि ब्राड्शॉ ह्यांसारखे), **लेव्हलर्स** (लहान मोठे हा भेद राखूं न इच्छिणारे) ऊर्फ **एक्स्ट्रीम् राडिकल्स** (मूळापासून परमावधीची सुधारणा किंवा उलथापालथ करूं इच्छिणारे), हे सारे लोक, वेगवेगळ्या कारणांनीं त्याच्याविरुद्ध होते, आणि त्याला दग्यानें मारण्याकरितां, व बंडें करण्याकरितां, गुप्त मसलती व फंदफितूर सतत उत्पन्न होत होते. तथापि नवीन **पार्लमेंट** भरण्यापूर्वी दहा महिनेपर्यंत त्यानें चांगल्या प्रकारें आणि न्यायानें अमल केला. त्यानें **हालंडा**शी वाजवी किंवा योग्य प्रकारचा सल्ला केला, आणि **इंग्लंड**च्या व्यापाराला अनुकूल अशा प्रकारचे **डेन्मार्क, स्वीडन,** आणि **पोर्टुगल,** ह्या देशांशीं तह केले. त्यानें लोकशिक्षणाविषयीं चौकशी केली, आणि **आक्सफर्ड** एथील **बाड्लियन** नांवाच्या ग्रंथालयाला हस्तलिखित आणि छापलेलीं पुस्तकें दिलीं. त्यानें **ऑर्डिनन्सिझ,** म्हणजे धर्मसंबंधी कानू केले, ते सर्व धर्मपंथांना सारख्या न्यायाचे होते.

त्याचे ऑर्डिनन्सिझ म्हणजे कानू.

त्यांत इतकेंच गैर होतें कीं, त्यानें **धि बुक आफ् कामन प्रेअर** (सर्वसामान्य प्रार्थनेचें पुस्तक), ह्या नांवाचें प्रार्थनापुस्तक प्रचारांतून अजीं बंद केलें, आणि राजपक्षीय धर्मोपदेशकांना प्रसिद्ध रीतीनें चौघांत उपदेश करण्याची मनाई केली. तथापि त्यांना देखील उपदेश करण्याला त्यांचे खासगी समाज होतेच. सर्व लोकांना न्याय मिळावा म्हणून त्यानें न्यायाच्या कोडतांत फिर्यादी करण्यास लागणारा खर्च कमी केला, आणि, जमिनीवरील

करांचें ओझें भारी असे, तें नाहींसें केलें, त्यायोगें लहान लहान धारेकरी आणि खातेपिते जमीनदार गृहस्थ, ह्यांना फायदे झाले. त्यानें नवीन कानू करून स्कॉट्लंडचें राज्य इंग्लंडास जोडलें, आणि स्कॉट लोक त्याच्या अमलाचीं तीं आठ वर्षें "शांति सुखाचीं आणि समृद्धीचीं वर्षें" अशीं लेखीत. दीन आयर्लंड मात्र कमी सुखी होतें. त्या देशांतल्या लोकांपैकीं ज्यांना युद्धांत धरून कैदकेलेलें होतें, त्यांना देहांतशासनें किंवा देशपार करण्याच्या सजा भोगाव्या लागल्या, आणि ज्यांनीं हत्यारें उचललीं होतीं त्यांना आपआपल्या प्रांतांतून घालवून देऊन कॅानाट नांवाच्या भयाण प्रांतांत नवीं घरेंदारें करून वस्ती करून राहण्यास पाठविलें.

नवें पाचारिलेलें पार्लमेंट १६५४ त सेप्टेंबरच्या ३ न्या तारिखेस भरलें. त्याची निवडणूक बरीच शिस्तवार झालेली होती.

त्याचें पहिलें पार्लमेंट.

तींत इतकेंच न्यून होतें कीं, क्याथलिक्स आणि रायलिस्ट्स (राजपक्षीय) लोकांना सभासद नेमण्याची मनाई केलेली होती. तें पार्लमेंट फक्त पांच महिने टिकलें.

लोकसत्ताकराज्येच्छु सभासद होते, ते निचळे नव्हते. आपण आरंभिलेलें काम पार्लमेंट फक्त पुढें चालवील असा क्रॉम्वेल्लाचा अजमास होता. परंतु त्या पार्लमेंटाचे सभासद मागें जाऊन त्यानें केलेल्या कानूंविषयीं शंका काढावयास लागले, आणि व्हेन ह्यानें तर, "कोणी एकटाच माणूस" राज्याचा मुख्य अधिकारी असणें ह्या गोष्टीविरुद्ध वाद काढला.

ही वेळ येई तों, देवानें त्या राष्ट्रावर अमल करण्याला आप-

त्याला हाक मारून सांगितलें असा क्रॉम्वेल्लाच्या मनाचा दृढ ग्रह होत आलेला होता, आणि आपण जर खंबीरपणानें तो अमल केला नाहीं, तर राजपक्षीय लोक बंड करून उठतील अशी त्याला भीति वाटत होती. म्हणून त्यानें १६५५ त जान्युअरीच्या २२ व्या तारिखेस, त्या पार्लमेंटाचें विसर्जन केलें, आणि पुढें कांहीं महिन्यांनीं त्यानें इंग्लंडचे दहा प्रांत करून त्यांवर लष्करी अमलदार अधिकारी नेमले, त्यांला मेजर–जनरलूस (एक लष्करी हुद्दा) म्हणत. खरोखर पाहतां, तो आतां लष्करी अमलाच्या धर्तीवर अनिर्बंध प्रकारानें किंवा आपल्या इच्छेप्रमाणें राज्य करूं लागला, आणि व्हेन आणि ब्राड्शॉ ह्या आपल्या जुन्या दोस्तांना देखील त्यानें थोडा वेळपर्यंत कैदेंत टाकलें; कारण त्यांच्या वजनदारीची त्याला भीति वाटूं लागली. दुसऱ्या पक्षीं, त्यानें न्यायाधीशांना मोकळे किंवा स्वतंत्र ठेवलें; ज्यूंना, म्हणजे इस्राएल लोकांना, इंग्लंडांत पुनः वस्ती करून राहण्याविषयीं त्यानें परवानगी दिली; आणि जार्ज फॉक्स नांवाच्या एका कोष्ट्यानें एक क्केकर नांवाचा नवीन धर्मपंथ ह्या काळींच स्थापलेला होता, त्या पंथांतील लोकांना त्यानें आश्वासन देऊन त्यांचें रक्षण केलें. आपल्याला ठार मारण्याविषयीं यत्न करणारांना शासन करण्याला तो नेहमीं नाराजी असे, आणि तो आतां मोठ्या डामडौलानें व्हाइटहाल एथें राहत असे, तथापि त्यानें द्रव्य मिळवून सधन होण्याविषयीं बिलकूल यत्न केला नाहीं.

मेजर–जनरलूस प्रांतांचे अधिकारी नेमले, १६५५.

आपण अनिर्बंध सत्ताधीश व्हावें अशी त्याची वस्तुतः इच्छा नव्हती, आणि जेव्हां १६५६ त त्यानें साव्हॉयच्या ड्यूकाला व्होड्वा प्रांतांतील आपल्या प्राटेस्टंटपंथी प्रजाजनांची छळणूक

करण्याबद्दल धमकी दिली, आणि त्यामुळें स्पेन देशाशीं युद्ध करण्याचा प्रसंग ओढवला, तेव्हां त्यानें पुनः पार्लमेंट बोलावलें. परंतु त्यांत त्यानें पुष्कळ सभासदांना येण्याची मनाई केली, आणि जे सर्व सभासद निवडले गेले होते त्यांना कौन्सिलापासून सर्टिफिकिट (दाखला) घ्यावयास लावलें. ह्या पार्लमेंटानें आरंभ तर सलूख्यानें केला. त्यांतील सभासदांनीं एक "पिटिशन आंड आड्व्हाइस" (अर्ज आणि बुद्धिवाद) नांवाचा एक अर्ज तयार केला, त्यांत, मेजर–जनरलस् म्हणून प्रांतांचे अधिकारी नेमलेले होते त्यांना त्या अधिकारांवरून काढावें असें मागणें होतें, आणि त्यांनीं एक "अदर हौस," ऊर्फ हौस आफ् लार्ड्स (लार्डांची सभा), बनविलें, त्यांत क्रॉम्वेल्लानें, बडे लोक करून नेमावे, अशी योजना केलेली होती. नंतर आपण राजा हा किताब स्वीकारावा असें त्यांनीं क्रॉम्वेल्लाला सांगितलें. त्या किताबानें त्याचा मरतबा किंवा दर्जा खरोखर वाढला असता, परंतु त्याच्या अखत्याराला पूर्वींहून विशेष अटक झाली असती, कारण राजाच्या अधिकाराच्या मर्यादा कायद्यानें ठरविलेल्या होत्या. जेव्हां, फौजेला रोष येईल ह्या भीतीनें, त्यानें तो किताब आपणाला नको म्हणून सांगितलें, तेव्हां त्या पार्लमेंटांतील सभासदांनीं त्याला, एक राजकीय डौलाची ओढणी, आणि न्यायाची निशाणी म्हणून एक राजदंड व तरवार, आणि आपल्या पश्चात् राज्याधिकारी नेमण्याचा अधिकार, इतक्या गोष्टी दिल्या. त्या पार्लमेंटाच्या पहिल्या कार्यकालांत किंवा बैठकींत, सर्व गोष्टी सुयंत्र चालल्या; परंतु पुढें जेव्हां पार्लमेंट पुनः जमलें तेव्हां,

क्रॉम्वेल्लाचें दुसरें पार्लमेंट, ता. १७ सेप्टेंबर १६५६.

क्रॉम्वेल्ल राजा हा किताब नाकारतो.

त्यांतल्या ज्या सभासदांना **पीयर्स** (बडे लोक) केलेलें होतें, त्यांच्या जागा जुन्या लोकसत्ताकराज्येच्छु लोकांपैकीं कांहींनीं मिळविल्या होत्या. त्यामुळें ते नवे झालेले सभासद त्या नव्या **लार्डांच्या सभे**बरोबर काम करीनात, आणि ते खुद्द **क्रॉम्वेला**वरच हल्ला करूं लागले. म्हणून त्यानें त्या **पार्लमेंटा**चें १६५८ त फेब्रुअरीच्या ४ थ्या तारिखेस विसर्जन केलें, आणि तेव्हांपासून बाकी राहिलेल्या आयुष्यभर त्यानें एकट्यानेंच अमल केला.

तो अमल पुष्कळसे महिने देखील केला नाहीं. आतां तो आपल्या सत्तेच्या कळसाला पावला होता. त्याच्या अरमारानें **सान् डोमिंगो**वर हल्ला केला त्यांत त्याला यश आलें नाहीं, तथापि १६५५ त त्या अरमारानें, **स्पेन** देशच्या अमलाखालचें **जमेका** नांवाचें बेट जिंकून घेतलें होतें. त्यांत **क्रॉम्वेला**नें, पुढें भरभराटीस येणारी अशी वसाहत केली; आणि तोच **वेस्ट इंडिझ** नांवाच्या बेटांच्या समुदायांतील आमच्या राज्याचा मूळ पाया झाला.

जमेका बेट जिंकून हस्तगत केले, १६५५.

त्याची फौज दोस्तीनें **फ्रेंच** फौजेला मिळून, तिनें १६५८ त **डून्स** एथील लढाईत **स्पानियर्ड्स** लोकांचा पराभव केला, तेव्हां **इंग्लिशांनीं डनकिर्क** हें बंदर मिळविलें. सर्व राष्ट्रांनीं, राजाकडे पाठवितात त्याप्रमाणें, त्याच्याकडे आपआपले वकील पाठविले, आणि त्याची दोस्ती साधण्याकरितां तीं उत्कंठेनें प्रयास करूं लागलीं.

त्यानें देशांत स्वस्थता आणि बंदोबस्त केला, आणि व्यापार व शेतकी हीं भरभराटीस आलीं. त्याचा एकतंत्री खंबीर अमल उलथून टाकण्याची राजपक्षीय लोकांना देखील आशा उरली नाहीं. तथापि लोक अंतरंगीं सुखी नव्हते. त्यांना तो **प्यूरिटन** (प्यूरिटनपंथी अति सोंवळेपणाचा) करडा अमल जाचूं लागला. **मे-पोल,** म्हणजे

मे महिन्यांतील उत्सवाची उभारलेली गुढी, ती भोंवतालचे नाच, पैजेच्या दवडी, कोंबड्यांचीं झुजें, नाटकगृहांतून होणारीं नाटकें, **क्रिस्टमस**, म्हणजे **ख्रिस्ताची** जयंती, तिच्या संबंधानें उत्सवाचे जे दिवस, त्या दिवसांतील मुखवटे घालून सोंगें घेणाऱ्या सोंगाड्यांचे तमाशे, आणि खाण्यापिण्याची चंगळ, ह्या सर्व गोष्टींना ते अंतरले. शिवाय ज्या जुन्या दिवसांत, राजा, स्वतंत्र **पार्लमेंट**, उदारहस्त (हाताचे सढळ) खेड्यापाड्यांतले **स्क्वायर** पदवीचे गृहस्थ, आणि चयनी दरबार, होतें, ते जुने दिवस पुनः येतील काय म्हणून पुष्कळ लोक आशा करीत होते. लोकसत्ताकराज्येच्छु लोक, लोकसत्ताकराज्याचा चुराडा झाला म्हणून असंतुष्ट होते, आणि राजपक्षीय लोक, राजाच्या स्थानीं एक उपट्या राज्यापहारी पुरुष झाला, म्हणून असंतुष्ट होते. **क्रॉम्वेल्लानें**, जी गोष्ट अशक्य, ती करण्याविषयीं प्रयत्न केला. **इंग्लंडाला**, पोटार्गानें आपलें राज्य आपण करणारा असा देश, बनविण्याच्या कामीं लोकांनीं आपणाला साहाय्य करावें, असें **क्रॉम्वेल्लाच्या** मनांत होतें; परतु त्यानें जो कित्ता किंवा नमुना उतरण्याचें आपल्या मनांत योजिलेलें होतें, तो नमुना, त्याच्या काळाकडे दृष्टि देऊन पाहतां, अति दुःसाध्य होता, आणि तो नमुना आपल्या हातून उतरवला नाहीं, आणि आपल्या मृत्यूनंतर आपण उभारलेलें काम सुद्धां मोडून नाहीसें होईल, हें त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें. सुदृढ अशी राज्यपद्धति स्थापन करण्याविषयीं त्यानें केलेला यत्न सिद्धीस न गेल्यानें त्याचें निशाण चुकलें. त्याची राज्यपद्धति स्वेच्छ अनिर्बंधक तर खरीच, परंतु ती उन्नत प्रकारची होती, तिनें **इंग्लिशांचीं** पुष्कळ हितें झालीं, परंतु **देशांतील कायद्यांचें निरुपद्रव प्राधान्य**, ह्या

देशाची स्थिति.

एका सुखाची ते लोक फार आशा करून होते. तें सुख त्याच्या राज्यपद्धतीपासून त्यांना मिळालें नाहीं.

त्याचें वय फक्त एकुणसाठ वर्षांचें होतें, तरी त्याची शरीरप्रकृति ढांसळत होती, आणि "किलिंग नो मर्डर" (ठारमारणें हा खुनाचा गुन्हा नाहीं) ह्या नांवाचा त्याला दग्यानें मारण्याविषयीं प्रोत्साहक असा एक निबंध छापला गेला, त्यानें त्याचें चित्त इतकें अस्वस्थ झालें कीं, तो वारंवार आंगीं चिलखत चढवून फिरे. त्याची आवडती मुलगी, लेडी क्लेपोल ही, १६५८ त आगस्टच्या १६ व्या तारिखेस मृत्यु पावली, त्या योगें तर त्याला मृत्यु आणणारा शेवटचा धका बसला. त्याला भयंकर हिंवताप जडला, आणि उतार पडून तो बरा व्हावा म्हणून लोक सर्वत्र देवापाशीं प्रार्थना करीत होते, तथापि आपण खचीत मरणार हें त्यानें पक्कें ओळखिलें. आगस्टचा ३० व्या तारिखेस त्यानें साऱ्या लोकांकरितां देवाची हृदयवेधक प्रार्थना केली, तींत, "देवा! तूं ह्या लोकांना मागल्या "पुढल्याशीं अविरोध ठेवून निर्णय करण्याची बुद्धि, एक अंतःकरण, "आणि परस्परांविषयीं प्रेम, हीं दे," असें मागणें होतें; आणि पुढें चार दिवसांनीं, सेप्टेंबरच्या ३ च्या तारिखेस, म्हणजे डन्बार आणि वूर्स्टर एथील जयांच्या दिवशीं, तो प्रतापी प्रोटेक्टर (राज्यसंरक्षक) ही दुनिया सोडून गेला. त्याचा विलक्षण, आणि अनेक गुणदोषमय, स्वभाव होता; आणि त्याचें वर्तन कोठपर्यंत महत्वाकांक्षेच्या प्रेरणेनें, आणि कोठपर्यंत धर्मश्रद्धा आणि स्वदेशभक्ति ह्यांच्या प्रेरणेनें झालें, हें कधीं कळणार नाहीं. तथापि त्यानें आपल्या देशाच्या सेवेंत कधीं आंग चोरलें नाहीं, किंवा कसर केली नाहीं, ह्या एका गोष्टीबद्दल त्याला मान अवश्य दिला पा-

क्रॉम्वेलाचा मृत्यु, तारीख ३ सेप्टेंबर १६५८.

हिजे. ज्या काळीं **इंग्लंड**ची अवस्था अति निकृष्ट झालेली होती, त्या काळीं यानें त्या देशीं, आणि परदेशीं, त्याला प्रतिष्ठेस चढविलें, आणि त्या देशाचें नुकसान करून आपण सधन न होतां तो मरण पावला. त्याचें शव राजास योग्य अशा सन्मानानें **वेस्टमिन्स्टर आर्बी**त पुरलें.

रिचर्ड प्रोटेक्टर होतो, १६५८ च्या सेप्टेंबरपासून १६५९ च्या जूलईपर्यंत.

त्या **प्रोटेक्टर**ची वजनदारी इतकी भारी होती कीं, त्याचा सर्वांत वडील पुत्र **रिचर्ड** ह्याला त्याच्यामागें त्याच्या अधिकारावर तत्काल नेमलें. १६५९ त जान्युअरीच्या २७ व्या तारिखेस एक नवें **पार्लमेंट** जमलें, आणि वकील लोकांची त्या नव्या **प्रोटेक्टरा**भोंवतीं गर्दी जमली. परंतु **रिचर्ड** हा आपल्या बापाहून वेगळ्या प्रकारचा पुरुष होता. तो शांत किंवा थंड आणि सुस्त होता. मुलकी कामदारानें आपणांवर हुकमत करावी, ही गोष्ट फौजेला न आवडून ती तृप्त नव्हती, आणि **व्हेन** ह्यानें **कामन्सां**च्या सभेमध्यें, असला नबळा राज्य करणारा पुरुष काय कामाचा म्हणून उघडपणें बोलून दाखविलें. नंतर जे कलह उत्पन्न झाले त्यांत **रिचर्डा**ला कांहीं कळकळ वाटेना, आणि त्यांनीं त्याची ओढाताण होऊन, त्यानें फौजेचें म्हणणें ऐकून, एप्रिलच्या २२ व्या तारिखेस **पार्लमेंटा**चें विसर्जन केलें. नंतर फौजेकडील अमलदारांनीं, ज्या **लांग पार्लमेंटा**च्या (दीर्घकालिक पार्लमेंटाच्या) अवशिष्ट राहिलेल्या तुकडीला **क्राम्वेल्ला**नें फांटा दिलेला होता, त्या तुकडीला पुनः पाचारण केलें. तिला असभ्यपणें **"रंप"** (टीर किंवा तिढें) किंवा **पार्लमेंटची** पिछाडी असें नांव पडलें. त्या **रंप**ला रि-

धि रंप नांवाचें पार्लमेंटचें अवशेष, ता.७ मे १६५९.

चर्ड नको होता, त्यामुळें त्यानें समाधानानें राजीनामा दिला, आणि दहा महिने इतका अल्पकाल **प्रोटेक्टर** ही पदवी भोगून, जुलईत तो सुखवस्तु सारखा राहण्यास गेला. परंतु आतां दोघांनून कोणाची मात्रा वर असावी, ह्या संबंधानें त्या **रंपाचा** आणि फौजेचा बेबनाव झाला. इतक्यांत एक राजपक्षीय बंड उत्पन्न झालें. तेव्हां त्या फौजेंतील शिपायांनीं **चेशायरां**तील **वुइनिंग्टन ब्रिज्ज** नांवाच्या ठिकाणीं त्या बंडाचा मोड करून, ते, **जनरल** (सेनापति) **लांबर्ट** ह्याच्या हुकमतीखालीं माघारे आले, आणि **वेस्टमिन्स्टर** एथील सभागृहाच्या दरवाज्यांवर आक्टोबरच्या १३ व्या तारिखेस पाहरा ठेवून, त्यांनीं त्या **रंपाच्या** सभासदांना आंत जाऊन बसूं दिलें नाहीं. त्या शिपायांनीं, सर्व राज्याधिकार आपल्या हातीं घेऊन, आपल्या अमलदारांमधून एक **कमिटी आफ् सेफ्टी,** म्हणजे सुरक्षिततेसाठीं मंडळी, निवडून नेमली.

अराजक किंवा झोटिंगपादशाही.

ही व्यवस्था फक्त दोन महिने टिकली. त्या समयीं **स्काट्लंड**मध्यें दुसरी एक फौज होती. ती **जनरल** (सेनापति) **मंक** ह्याच्या हुकमतीखालीं होती. त्यानें पूर्वी एका वेळीं **पहिला चार्लस** ह्याच्या पदरीं नौकरी केलेली होती, परंतु पुढें यादवी झाली तींत तो **पार्लमेंटा**च्या पक्षाला मिळाला होता. तो **मंक** शांत असून कामकाजाला हुषार पुरुष होता. तो **क्रॉम्वेल्ला**खातर **रिचर्डा**शीं इमानीपणानें वागला असता. परंतु आतां जिकडे तिकडे झोटिंगपादशाही मातलेली पाहून त्यानें **दुसऱ्या चार्लसा**ला निमूटपणें माघारें आणण्याचा निश्चय केला. १६६० त जान्युअरीच्या १ ल्या तारिखेस, स्वतंत्र **पार्लमेंट** स्थापलें जावें ह्या तजविजीकरितां मी येत आहें असा डांगोरा पिटवून, तो कूच

करून **इंग्लंडांत** आला. **यार्क** एथें **फेरफाक्स** सुखवस्तु राहत होता, त्याला **मंक** तेथें भेटला, आणि त्या दोघांचें दक्षिणेकडे चाल करून येणें बंद करण्यासाठीं **जनरल लांबर्ट** ह्यानें सैन्य आणलें, परंतु त्यांतील शिपायांनीं आपल्या जुन्या सेनापतीला पाहतांच, ते, निरोप न घेतां पळून जाऊन, **फेरफाक्सा**ला मिळाले. तेव्हां सर्व प्रतिकार करण्याचा उपाय खुंटला. नंतर **मंक** हा फेब्रुअरीच्या ३ ऱ्या तारिखेस **लंडनां**त शिरला, आणि पुढें एका महिन्यानें **रंप**चें विसर्जन झालें, आणि त्या **लांग पार्लमेंटा**ची शेवटीं समाप्ति झाली. नंतर एप्रिलच्या २५ व्या तारिखेस एक नवें सुरळीतपणानें निवडलेलें **पार्लमेंट** भरलें, त्याला **"कॉन्व्हेन्शन"** (सोहलतीचेंमंडल) असें नांव दिलें होतें, कारण राजाच्या लेखी आज्ञापत्रानें त्याला बोलावलेलें नव्हतें. त्या **पार्लमेंटांत रायलिस्ट्स** (राजपक्षीय) व **प्रेस्बिटीरियन**पंथी लोक इतके पुष्कळ होते कीं, त्यांनीं, **राजा, लार्ड्स,** आणि **कामन्स,** हे तिघे मिळून एक सरकार, ही जी प्राचीन राज्यव्यवस्था होती, ती पुनः पूर्ववत् चालू करावी, आणि **दुसऱ्या चार्लसा**ला आपण येऊन राजपद स्वीकारून आम्हांवर अमल करावा असें बोलावणें करावें, असा एकदम ठराव केला.

मंक हा लंडनांत प्रवेश करतो.

लांग पार्लमेंटाची समाप्ति होते, ता. १६ मार्च १६६०.

चार्लसाचा **मंका**बरोबर गुप्त पत्रव्यवहार ह्यापूर्वींच चालू होता, आणि त्यानें **हालंड** देशांतील **ब्रेडा** नांवाच्या गांवीं एक जाहीरनामा छापून प्रसिद्ध केलेला होता; त्यांत, सर्व प्रजेला क्षमा करूं, धर्मसंबंधी स्वातंत्र्य देऊं, आणि सेनेचा संतोष करूं, असें वचन

दिलेलें होतें. आतां मेच्या २५ व्या तारिखेस, समुद्रावरून येऊन डोव्हर एथें आनंदसूचक जयघोष चालला होता त्यामध्यें, तो जमिनीवर उतरला. मेची २९ वी तारीख हा त्याचा जन्मदिवस होता, त्या दिवशीं त्यानें लंडनांत प्रवेश केला.

दुसरा चार्लस माघारा येतो, माहे मे १६६०.

तेव्हां सर्व रस्त्यांतून फुलें विखरलेलीं होतीं, त्यांच्या दोहों बाजूंनीं पताका, निशाणें, आणि फुलांच्या माळा लोंबत होत्या, आणि कारंज्यांतून द्राक्षासवाचे फवारे उडत होते. फक्त फौज दुर्मुखलेली एकटी फटकून अलग राहिलेली होती. परंतु सगळ्या राष्ट्रांतील लोक आनंदानें वेडे झालेले होते, त्यांच्यापुढें तींतील शिपायांचें कांहीं चालावयाजोगें नव्हतें. तशांत ते शिपाई इतके अतिशय आस्थेवाईक आणि गंभीर स्वभावाचे होते कीं, निरर्थक आणि बेकैद रक्तस्राव खिजवून उत्पन्न करणें त्यांच्या हातून झालें नाहीं. पुढें कांहीं महिन्यांनीं त्या फौजेला फांटा दिला, आणि तींतील माणसें निमूटपणें आपआपल्या दुकानांत, शेतांत, किंवा कारकुनीच्या उद्योगावर, माघारीं गेलीं. तो राजा एका वेळीं धूर्तपणानें म्हणाला, "मी "ह्याहून लवकर माघारा आलों नाहीं, हा माझाच अपराधसा दिसतो, "कारण, आपल्या परत येण्याकडे माझे डोळे लागलेले होते असें "मला न सांगणारा, असा माणूस मला कोणीच आढळत नाहीं." तथापि, जर त्या प्यूरिटनपंथी फौजेनें साऱ्या राष्ट्राचा सोशिकपणा त्रासवून आटवून टाकला नसता, तर तो चार्लस माघारा येताच कीं काय ह्या गोष्टीचा फारच संशय आहे.

प्रकरण १९.

धि रेस्टोरेशन (राजसत्ताक राज्याची पुनः स्थापना)

दुसरा चार्लस, १६६०–१६८५.

दुसरा चार्लस हा जेव्हां "आपल्याच राज्याचा पुनः उपभोग घेण्याकरितां" माघारा आला, तेव्हां त्याचें जितकें अंतःकरणापासून आगत स्वागत झालें, तितक्याहून विशेष अंतःकरणापासून आगत स्वागत कोणाही राजाचें कधींही झालें नाहीं. ज्या बहुत उलथापालथी झाल्या त्यांनीं सारें राष्ट्र जर्जर होऊन कंटाळलें होतें, आणि कोणती तरी एक काईम राज्यव्यवस्था स्थापित व्हावी म्हणून इच्छा करीत होतें. जर, आपल्या प्रजेचें कल्याण करावें, एवढी एकच गोष्ट **चार्लसाच्या** अंतःकरणांत वागत असती, तर तो महाप्रतापी राजा झाला असता. परंतु, जरी तो, कुशल आणि तीक्ष्णबुद्धि, सात्विक आणि सौम्य स्वभावाचा असून, त्याच्या आंगीं चांगला समज, आणि तर्क विवेक हीं विपुल होतीं तरी, तो एकंदरीनें सुजन नव्हता. तो स्वार्थी आणि आळशी होता, आणि त्यानें आपलें बहुतेक आयुष्य एकाद्या साहसी पुरुषासारखें परदेशीं घालविलेलें होतें, म्हणून, स्वदेशाविषयीं आपल्या कर्तव्याचें त्याला खरें परिज्ञान नव्हतें. आपल्या साऱ्या कारकीर्दीभर त्याचें लक्ष्य दोन गोष्टींकडे होतें त्या ह्या; (१) आपल्या मनास येईल त्याप्रमाणे वर्तणें, आणि **पार्लमेंटाला** हिशेब न देतां, आपल्या बदफैली खालीखुशालीकरितां विपुल पैसा उकळणें; (२) **क्याथलिक** धर्माचा पुरस्कार करून त्याची अभिवृद्धि करणें; हेंही तो परम

चार्लसाचे गुणदोष आणि उद्देश.

धर्मपरायण असून त्या कारणामुळें नव्हे, परंतु त्याचा मित्र **फ्रान्स** देशचा राजा तरुण **चौदावा लूइ** ह्याच्याप्रमाणें आपण अनिर्बंध मुकत्यार राजा व्हावें अशा हेतूनें, आणि **प्राटेस्टंट** धर्माच्या योगें लोक अतिस्वतंत्र होतात असा त्याचा ग्रह होता त्यामुळें. तो आणि त्याचा भाऊ, **यार्कचा ड्यूक, जेम्स,** हे उभयतां बाह्यात्कारें **इंग्लंडां**तील स्थापित धर्मांतले म्हणून मोडत असत, तथापि ते **क्याथलिक्स** व्हावयाचे अशा समजानें त्यांचें अध्यापन आणि शिक्षण झालेलें होतें. ज्यापक्षीं शतकांचीं शतकें राजाच्या प्रधानांना **पार्लमेंटा**ला जबाबदार करण्यासाठीं, आणि **पोपा**चा आपणांवरील अमल दवडण्यासाठीं, **इंग्लिश** लोक झगडत आलेले होते, त्यापक्षीं तो राजा आणि ते लोक ह्यांचे उद्देश उजू एकमेकांच्या विरुद्ध होते, हें स्पष्ट आहे.

परंतु **चार्लस** हा फार शाहणा होता, म्हणून त्यानें आपल्या बापाप्रमाणें लोकांशीं उघड रीतीनें कलह केला नाहीं. त्यानें एकदा **जेम्सा**ला सांगितलें होतें त्याप्रमाणें, "पुनः प्रवासाला जावयाचें नाहीं" असा त्यानें निश्चय केलेला होता. ह्यास्तव त्याची कारकीर्द म्हटली म्हणजे, कांहीं दिवस सत्ता राजाच्या हातीं, कांहीं दिवस **पार्लमेंटा**च्या हातीं, अशी गोंधळ उत्पन्न करणारी सत्तेची घडामोड होती. एका वेळीं राजानें आपल्या इच्छेप्रमाणें सर्व झालें पाहिजे म्हणून आग्रह धरून तसें करण्याविषयीं प्रयत्न करावा, दुसऱ्या वेळीं त्यानें **पार्लमेंटा**ला वश व्हावें; आणि साऱ्या कारकीर्दीभर, आपल्या निष्काळजी सुस्वभावानें, आणि आपल्या सोईस आलें म्हणजे आपल्या प्रधानांची आहुति देऊन, त्यानें युक्तीनें आपली गादी संभाळली आणि चयन मारली. जसें एका कवीनें म्हटलें आहे, "एका चयनी राजानें, कधींही तोंडानें वेड-

"गळ गोष्ट काढली नाहीं, आणि कधींही हातानें शाहणपणाची "गोष्ट केली नाहीं." तसें त्याचें एकंदरीनें वर्तन होतें.

त्याचा पहिला मुख्य उपदेष्टा किंवा मंत्री **सर एड्वर्ड हाइड** हा होता, तो सरल, प्रामाणिक, राजपक्षाभिमानी होता. तो **लांग पार्लमेंटांत** सभासद असून (३९८ वें पृष्ठ पहा), पुढें **चार्लस** देशबहिष्कृत होऊन परदेशीं राहत होता, तेव्हां तो त्याचा शिक्षक होता. आतां त्याला **लार्ड क्लारेंडन** ही पदवी देऊन **चान्सेलर** (पंडितराव) केलें, आणि त्यानें सात वर्षे राज्याचा कारभार केला, तीं सात वर्षे, **चार्लसाच्या** कारकीर्दीपैकीं सर्वोत्तम वर्षे होतीं. धि **"कान्व्हेन्शन"** ह्या नांवाचें **पार्लमेंट**, राजसत्ताक राज्याची पुनः स्थापना झाली तेव्हां जारी होतेंच. त्या **पार्लमेंटानें**, **पहिल्या चार्लसाला** दोषी ठरवून सजा देणाऱ्या लोकांपैकीं तेरांना देहांतशासन केलें, आणि इतरांना कैदेंत टाकलें; आणि **क्रॉम्वेल**, **आयर्टन**, आणि **ब्राड्शॉ** ह्यांचीं प्रेतें **वेस्टमिन्स्टर आबींतून** उकरून काढवून **टैबर्न** एथें फांशीं देण्याच्या खांबावर टांगून लटकत ठेविवलीं. नंतर त्या **पार्लमेंटानें "आक्ट आफ् इंडेम्निटी"** (शिक्षा न होण्याची हामी, किंवा अभय, देणारा कायदा) नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यानें, **व्हेन** आणि **लांबर्ट** ह्या दोघांखेरीज, जे इतर लोक यादवींत किंवा आपआपसांतील युद्धांत लढले होते, त्या सर्वांना क्षमा केली. नंतर त्या **पार्लमेंटानें** राजाच्या **एकंदर जमेचा** (उत्पन्नाचा) विचार हातीं घेतला. त्या काळीं, दरबार, आणि अरमार, ह्यांचे खर्च, परराष्ट्रांत ठेवलेले वकील,

क्लारेंडनाचा राज्यकारभार, १६६०–१६६७.

इंडेम्निटीचा आक्ट, १६६०.

आणि न्यायाधीश, ह्यांचीं वेतनें, हीं सर्व राजाच्या एकंदर उत्पन्नांतून दिलीं जात असत. **मिलिटरि टेन्युर्स** (लष्करी नौकरीच्या संबंधानें जमिनीच्या उपभोगाबद्दल राजाचीं देणीं), **फ्यूडल ड्यूझ** (जहागीरसंबंधाचे राजाचे हक्कटक), आणि **पर्व्हेयन्स** (अन्नसामग्री वगैरे आवश्यक जिन्नस एका नियमित दरानें मालकाच्या कबुलीवांचून सुद्धां खरीद करून राजाला पुरविले पाहिजेत असा एक राजाचा हक्क), ह्या नांवांचे राजाचे कांहीं हक्क होते, त्यांनीं लोकांवर फारा दिवसांपासून जुलूम होत होता. ते हक्क राजानें सोडून दिले पाहिजेत, अशा अटीनें, त्या **पार्लमेंटानें**, राजाला जन्मभर १२००००० पौंडांची काईम नेमणूक करून दिली. हें कृत्य झाल्यावर त्या **पार्लमेंटानें** फौजेला फांटा दिला, आणि नंतर नवीन **पार्लमेंटाला** मार्ग करून देण्यासाठीं, त्या **पार्लमेंटानें** आपलें आपण विसर्जन केलें. तेव्हां आपल्या संरक्षणाकरितां फक्त शिबंदीच्या कवाईत शिकविलेल्या टोळ्या मात्र उरल्या, त्यांनीं आपण सुरक्षित राहूं असें **चार्लसाला** वाटेना, म्हणून त्यानें गवगवा न करतां घोडेस्वार व पायदळ मिळून ५००० शिपाई चाकरीस ठेवले. त्यांतच **"कोल्ड्स्ट्रीम गार्ड्स"** (कोल्ड्स्ट्रीम एथील गाडदी लोक) ह्या नांवाची विख्यात गाडदी लोकांची पलटण होती. ही पलटण **जनरल मंक ह्यानें** कित्येक वर्षांपूर्वीं **ट्वुईड** नांवाच्या नदीच्या कांठच्या **कोल्ड्स्ट्रीम** नांवच्या गांवीं प्रथम भरलेली होती. त्या साऱ्या फौजेचा पगार **चार्लस** आपल्या पदरचा देई, आणि ह्या प्रकारें, त्यानें खड्या

फ्यूडल टेन्युर्स बंद होतात, १६६०.

पहिली खडी किंवा काईम फौज ठेवण्यांत येते, १६६०.

किंवा **काईम फौजेची** प्रथम सुरवात केली. इतकेंच मात्र कीं कायद्यानें ती फौज ठेवणें मंजूर झालेलें नव्हतें.

नंतर कांहीं काळपर्यंत सर्वच आनंदीआनंद होता. राजा माघारा आला म्हणून लोक इतके खुश झाले होतें कीं, नव्या **पार्लमेंटांत** बसण्याकरितां मुख्यत्वेंकरून **काव्हलीयर्स** (राजपक्षीय शिलेदार) लोकच त्यांनीं आपले प्रतिनिधि निवडले. राजाच्या दरबारांत थाटमाटाचा एकच भपका उडाला. **कामन्वेल्थच्या** (लोकसत्ताक राज्याच्या) गंभीर, आणि विचारी, अमलाचें लोकांना स्मरण देखील राहिलें नाहीं, नाटकगृहें उघडलीं, आणि सर्व प्रकारची चयनबाजी किंवा धुमश्चक्री मातली. **व्हॉक्सहॉल** नांवाचें क्रीडाभवन ह्याच काळीं प्रथम उघडलें. तेथील दारूबाज लोकांच्या धुमाळ्या, ह्यांचें, धर्मोपदेश आणि प्रार्थना उपासना ह्यांसाठीं पूर्वी मंडळ्या जमत त्या मोडून त्यांच्या जागीं, माहात्म्य वाढलें. ह्या ऐषआरामाच्या शौकापायीं पुष्कळ दुर्व्यसनें आलीं. जुगार, मद्यपान, द्वंद्वयुद्ध, आणि विसनीपणा किंवा बाहेरख्याल, हीं दरबारांत सर्वत्र दृष्टीस पडूं लागलीं. सर्व प्रकारच्या वेडेचारांना मुभा होती, आणि पुढल्या पन्नास वर्षांत, काळोख पडल्यावर, रक्षणाचें साधन बरोबर असल्यावांचून बाहेर जाणें बिनधोक नव्हतें, कारण, रस्त्यांत त्या काळीं गडद अंधार असे, त्यांत, बडे लोक देखील मनास येतील तसले वेडेवेडेचार करून आपणांस रमवीत असत. चार्लसाच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या जवळजवळपर्यंत रस्त्यांतून दिवे लावलेले नसत.

काव्हलीयर पार्लमेंट, १६६१–१६७८.

धुमश्चक्रीचें दरबार.

खेड्यापाड्यांत सर्व गोष्टी ह्याहून चांगल्या असत. राजपक्षीय

लोकांपैकीं पुष्कळ हळू हळू आपआपल्या प्राचीन घरांतून थिरावून राहूं लागले, आणि, ज्या लोकांमध्यें पूर्वी **काव्हलीयर्स** (शिलेदार) आणि **रौंडहेड्स** (गरगरीत डोक्यांचे) ह्या ठेंगमताच्या नांवांच्या दोन फळ्या झालेल्या होत्या, तेच लोक एकमेकांशीं स्नेहभावानें हात हालवूं लागले (सलाम करूं लागले), आणि पूर्वीचे आपले कलह विसरले. खेड्यांतील नाच आणि सणांसंबंधी मेजवान्या, ह्या करण्याला पुनः मोकळीक मिळाल्यामुळें, खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांना आनंद झाला, आणि फांटा मिळालेले शिपाई आपआपल्या शेतांवर आणि उद्योगधंद्यांवर परत आले. तेव्हां त्यांनीं त्या **प्यूरिटन** फौजेमधील उत्साहयुक्त, आणि गंभीरपणाची हिम्मत, आपल्याबरोबर आणली. आतां मुख्य मुख्य शहरांपासून प्रवासी लोकांना घेऊन जाण्यासाठीं अनेक गाड्या निघत, आणि टप्पालची गाडी अंतराला अनुसरून एक दिवस आड करून, अथवा आठवड्यांतून एकदा निघे (म्हणजे शेंपन्नास कोस लांबीवर एक दिवसाआड, आणि त्याहून दूरच्या पल्ल्यावर आठवड्यांतून एकदा), तथापि, **लंडन**, आणि दूरदूरचीं खेडींपाडीं, ह्यांच्या दरम्यान दळणवळण खरोखर फार थोडें असे. म्हणून ह्या कारकीर्दीतील राज्यसंबंधी बखेड्यांनीं **इंग्लंड**ची एकसारखी निश्चित आबादी होत जाण्याला हरकत झाली नाहीं. सर्वांत कमी आबाद असा म्हटला म्हणजे उत्तरेकडील मुलूख होता. तो मुलूख **मॉस्स-ट्रूपर्स** (दलदलीच्या प्रांतांत लुटालूट करणारे पुंड स्वार) अद्यापि लुटून सप्पा करीत असत. त्या मुलुखांत, बरोबर मजबूत पाहरा घेतल्यावांचून, फिरत्या न्यायाधीशांच्यानें प्रवास करवत नसे, आणि त्या लुटारूंचा माग काढण्यासाठीं, **ब्लडहौन्डस** म्हणून एक रकानें

जनस्थिति.

किंवा वासानें माग काढणाऱ्या शिकारी कुत्र्यांची जात आहे, त्या जातीचे कुत्रे लोक बाळगीत. वस्तुतः आतांच्या ह्या दिवसांत, त्या काळीं जीवित आणि धन किती अतिशय असुरक्षित होतें ह्याचें हुबहू स्वरूप आमच्या मनापुढें उभें राहणें कठीण आहे.

मुख्यत्वेंकरून **स्काट्लंड** आणि **इंग्लंड** ह्यांच्या दरम्यानच्या सरहद्दीवरील मुलुखांत दंगा असे, कारण **चार्लसाच्या पार्लमेंटानें क्रॉम्वेल्लाचा "आक्ट आफ् यूनियन"** (त्या दोन्ही राज्यांचा संयोग करण्याविषयींचा कायदा, ४२८ वें पृष्ठ पहा) मान्य केलेला नव्हता. **स्काट्लंडाच्या** संबंधानें प्राचीन राज्यव्यवस्था पुनः पूर्ववत् स्थापित झालेली होती. **स्काट्लंडांत** पुनः पूर्वीसारखें वेगळें **पार्लमेंट** भरूं लागलें, तेथील लोकांवर, बिशप्स नांवाचे धर्माधिकारी जुलुमानें लादले, आणि जे लोक **"कॉव्हेनान्ट"** (करारनामा) धरून राहिले, त्यांची फार निर्दयपणानें छळणूक मांडली.

स्काट्लंड आणि आयर्लंड ह्यांचीं दुःखें.

आयर्लंडांतील लोकांना दुसऱ्या एका कारणानें क्लेश भोगावे लागले. ज्यांनीं तेथील युद्धांत राजाची नौकरी केलेली होती, ते, **क्रॉम्वेल्लाच्या** अनुयायांनीं बहुतेक जमीन बळकावली, असा गिल्ला सांगूं लागले; आणि शेवटीं जरी, **"सेटलमेंटच्या आक्टानें"** (बंदोबस्ताच्या कायद्यानें) **क्रॉम्वेल्लाच्या** पक्षाच्या लोकांनीं आपण मिळविलेल्या जमिनींच्या तृतीयांशाइतकी जमीन सोडून दिली, तरी त्या तृतीयांशापैकीं जमिनी सरकारानें खुशीस आलें त्या लोकांना दिल्या त्यामुळें, **आयर्लंडांतील** मूळच्या राहणाऱ्या लोकांना थोड्याच जमिनी मिळाल्या.

इंग्लंडांत काव्हलीयर पार्लमेंटानें (शिलेदार पार्लमेंटानें) **लॉडच्या काळांत जसा धर्म होता, तसा एकदम पुनः पूर्ववत्**

चालू केला. बिशप्स लोक पुनः पूर्ववत् लार्डांच्या सभेंत बसूं लागले. देवळांतील उपासना, कांहीं फेरफार करून, पुनः पूर्ववत् चालू केली, आणि त्या वेळेपासून, ह्या सांप्रतच्या काळापर्यंत ती तशीच राहिली आहे. एथवर हें सारें रास्त होतें. परंतु चार्लसानें प्रजाजनमात्राला धर्मसंबंधांत अंतःकरणस्वातंत्र्य मिळेल म्हणून वचन दिलेलें होतें, तरी "कॉर्पोरेशन आक्ट" (एक होऊन काम करणाऱ्या सनदी मंडळ्यांविषयीं कायदा) नांवाचा एक कायदा पसार करण्यापासून त्याच्यानें पार्लमेंटाला मना करवलें नाहीं. त्या कायद्यानें सर्व कार्पोरेशनांच्या कामदारांना, "कॉव्हेनान्टचा" त्याग करून स्थापित इंग्लिश धर्माला अनुसरून प्रभुभोजन नांवाचा संस्कार करून घेणें भाग केलें. शिवाय १६६२ त मेच्या १९ व्या तारिखेस एक "युनिफॉर्मिटीचा आक्ट" (धर्मसंबंधी एकरूपतेचा किंवा सारूप्याचा कायदा) ह्या नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यानें, कोणाही माणसाची धर्माधिकारदीक्षा बिशपाकडून झालेली नसेल, आणि तो माणूस प्रेअरबुक (प्रार्थनापुस्तक) स्वीकारणार नाहीं, तर त्या माणसाला धर्माधिकारसंबंधी वृत्तीचा उपभोग मना केला. तेव्हां त्या कायद्याला अनुसरणारे धर्माधिकारी मात्र आपआपल्या वृत्तींवर काईम राहिले, आणि इतर सर्वांना सेंन्ट बर्थोलोम्यूच्या जयंतीच्या दिवशीं म्हणजे १६६२ त आगस्टच्या ४ थ्या तारिखेस, त्यांच्या वृत्तींवरून काढून टाकलें; आणि दोन हजारांहूनही ज्यास्तीच समर्थ शाहण्या लेकांनीं आपआपल्या खासगी देवळांतून धर्मसमाज स्थापन केले, आणि त्यांनीं आपणांला, सरकारानें स्थापलेल्या धर्मापासून पृथक झाल्यामुळें, किंवा तो धर्म अमान्य असल्यामुळें, "डिसेंटर्स"

कॉर्पोरेशन आक्ट, १६६१.

(सरकारानें स्थापलेल्या धर्मास अमान्य) असें नांव पहिल्यानेंच घेतलें.

हें खासगी देवळांतून समाज जमविणें देखील मना केलें. १६६४ त **"कान्व्हेंटिकल आक्ट"** (सरकारानें स्थापलेल्या धर्माला अमान्य अशा लोकांनीं उपासनेसाठीं जमविलेल्या मंडळ्या किंवा समाज ह्यांविषयीं कायदा) नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यानें **कान्व्हेंटिकल्स** (उपासनेकरतां समाज) किंवा खासगी देवळें ह्यांत उपासना करण्याची लोकांना मनाई केली; आणि १६६५ त **"फाइव्ह माइल आक्ट"** नांवाचा कायदा केला, त्यानें स्थापित धर्मास अमान्य असणाऱ्या धर्माधिकाऱ्यांस शाळांत शिकविण्याची, किंवा कोणत्याही शहरापासून पांच मैलांच्या आंत येण्याची मनाई केली. ज्या धर्माधिकारी लोकांना वृत्तींवरून काढून टाकलें व शहरांबाहेर पिटाळून दिलें, त्यांमध्यें **रिचर्ड बाक्स्टर** नांवाचा एक प्रख्यात परमार्थज्ञानांत प्रवीण पुरुष होता. त्यानें **"सेन्ट्स एव्हर्लास्टिंग रेस्ट"** (साधूचें अनंतकाल टिकणारें विश्रांतिसुख) ह्या नांवाचा ग्रंथ लिहिला; आणि तो आपल्या एका ग्रंथांत सांगतो कीं, वृत्तींवरून काढल्यामुळें शेंकडों धर्मोपदेशकांना व त्यांच्या कुटुंबांना राहण्यास घर, किंवा खाण्यास अन्न नाहींसें झालें, आणि शतावधि धर्मोपदेशक कैदेंत पडले. वर सांगितल्या प्रकारच्या धर्मसमाजांत धर्मोपदेश केल्यामुळेंच, एक **जान बन्यन** नांवाचा जुनीं भांडीं नीट करणारा तांबट **बेड्फर्ड** एथील तुरुंगांत बारा वर्षेंपर्यंत पडलेला होता. तेथें फितींकरितां धातूच्या बोंथ्या, अण्या किंवा गुलमेखा करून तो आ-

डिसेन्टर्स लोकांविरुद्ध कायदे, १६६२, १६६४, १६६५.

बन्यन आणि मिल्टन.

पल्या बायकोचा आणि कुटुंबाचा निर्वाह चालवीत असे, आणि फुरसतीच्या वेळांत त्यानें आपला **पिल्प्रिम्स प्रॉग्रेस** (यात्रेकरूचा वृत्तांत) नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ, आणि आंधळा, आणि गरीबींत असलेला, **मिल्टन** नांवाचा कवि ह्यानें ह्याच काळाच्या सुमारास रचलेले **पाराडाइझ लॉस्ट** (स्वर्गच्युति) आणि **पाराडाइझ रिगेन्ड** (पुनः स्वर्गप्राप्ति) ह्या नांवांचे काव्यग्रंथ, ह्या तीन ग्रंथांत त्या काळच्या त्या कडक **प्यूरिटन** (सोंवळ्या) धर्माचें हुबहू चित्र वठविलेलें आहे.

ह्या, आणि ह्याच्या पुढल्या, कारकीर्दींत हजारों **नान्‌कॉन्फॉर्मिस्ट्स,** म्हणजे देशांतल्या स्थापित धर्माला न अनुसरणारे असे लोक, स्वदेश त्याग करून **अमेरिकेंत** निरंतर राहवयास गेले; आणि **चार्लसानें** वेगवेगळ्या लोकांना त्यांचीं जुनीं कर्जें देणें होतीं त्यांच्या फेडींत, किंवा ज्यास्ती द्रव्य मिळविण्यासाठीं, म्हणून **अमेरिकेंत** मोठमोठ्या जमिनी इनाम दिल्या.

पेन्सिल्व्हानिया नांवाचें अमेरिकेंत एक संस्थान स्थापित होतें, १६८२.

ह्या प्रकारानेंच, **पेन्न** नांवाचा एक विख्यात **क्केकर**पंथी पुरुष होता त्याला, त्याचें सरकाराकडे भारी कर्ज येणें होतें त्याच्या फेडीसाठीं मोबदला म्हणून, **अमेरिकेंत** बराच मोठा मुलूख मिळाला, आणि १६८२ त आपल्या देशाचा त्याग करून जाणाऱ्या **क्केकर**पंथी लोकांचा समुदाय त्यानें **न्यू वर्ल्डांत** (नव्या पृथ्वींत), म्हणजे **अमेरिकेंत**, आपल्याबरोबर नेला. **पेन्सिल्व्हानिया** नांवाच्या संस्थानाची त्यानें स्थापना केली; आणि **अमेरिकेंतील रेड इन्डियन्स** (ताम्रवर्ण इन्डियन) नांवाच्या मूळच्या लोकांना, ज्या संस्थानांतील वसाहत करणारे **इंग्लिश** लोक आपल्या बराबरचे असे वागवूं लागले, तें पहिलें संस्थान **पेन्सिल्व्हानिया** हें होय.

परंतु **चार्लस** सर्वथा द्रव्य घेऊनच काम करणारा होता असें नाहीं. त्यानें दुसरी एक सनद दिली, ती त्याला फार सन्मानदायक होती. **इंग्लंडांत** यादवी, म्हणजे आपआपसांतील युद्ध, चाललें असतां, १६४५ सां इतक्या मागल्या काळीं, कांहीं पुरुषांच्या एका लहानशा समुदायानें, पोकळ **मतें** किंवा तर्क ह्यांविषयीं कलहांना कंटाळून, सृष्टींतील **घटितप्रत्यक्षांचा** अभ्यास करण्याचा निश्चय केला. त्या समुदायांतील पुरुषांनीं अनुभवमूलकशास्त्रसंबंधी विषयांची वाटाघाट करण्यासाठीं पहिल्यानें **लंडनांत**, आणि नंतर **आक्सफर्ड** एथें, सभा जमविल्या, आणि त्या सभांत, एर पंप, म्हणजे वाताकर्षकयंत्र, ज्यानें सुधरलें तो **बॉइल**, माइक्रॉस्कोप, म्हणजे सूक्ष्मदर्शक यंत्र, ह्याचा उपयोग ज्यानें वहिवाटींत आणला तो **हूक**, आणि ज्योतिषशास्त्रज्ञ **हाली**, आणि इतर लोक, ह्यांनीं आपापले प्रयोग करून दाखवून, त्यांची उपपत्ति, आणि आपण लाविलेले शोध, समजून सांगितले. राजसत्ताक राज्याची पुनः स्थापना झाल्यावर **दुसरा चार्लस** (ह्याला अनुभवमूलकशास्त्राविषयीं फार अभिरुचि असे, आणि ह्यानेंच पुढें कांहीं वर्षांनीं **ग्रीनिच** एथील **आब्झर्व्हेटरी** म्हणजे वेधशाला स्थापली) हा, त्या सभांपैकीं कांहीं सभांना गेला, आणि त्यांतील सभासदांना त्यानें एक सनद दिली, त्या सनदेनें त्या सभासदांची मिळून **"धि रॉयल सोसायेटी आफ् लंडन"** (लंडन एथील राजकीय किंवा राजाधिकृत मंडळी) ह्या नांवाची मंडळी स्थापित झाली. ह्याच मंडळीपुढें १६८२ त, **सर ऐझाक न्यूटन** ह्यानें, आपण गुरुत्वाकर्षणाचा शोध लावलेला होता, तो समजून सांगितला, आणि साऱ्या

रॉयल सोसायेटीची स्थापना, १६६२.

पृथ्वींत ज्या अति नामांकित शास्त्रीय मंडळ्या आहेत, त्यांतली आतां ती एक मंडळी आहे.

१६६२ त **चार्लसानें** ज्या ज्या गोष्टी केल्या, त्या सर्व, अनुभवमूलकशास्त्राला दिलेल्या आश्रयाप्रमाणें, शाहणपणाच्या असत्या तर फार चांगलें झालें असतें. दुर्दैवानें त्यानें त्या वर्षी तीन गोष्टी केल्या त्या न केल्या असत्या तर फार बरें झालें असतें. मे महिन्यांत त्यानें **पोर्टुगलची काथरिन** हिच्याशीं विवाह केला. ती **मुंबई** बेट आणि **टांजीरचा** किल्ला, हीं आंदण म्हणून बराबर घेऊन आली. परंतु ती **रोमन क्याथलिक** होती, आणि तें लग्न लोकांना फार अप्रिय झालें. ह्याचें मुख्यत्वेंकरून कारण, तिला मुलें झालीं नाहींत, त्यामुळें **चार्लसाचा** भाऊ, **यॉर्कचा ड्यूक,** हा **काथलिक** असून गादीचा वारस होऊन बसला. जून महिन्यांत **चार्लसानें** त्या पराक्रमी **सर हारी व्हेनला टौअर हिल्ल** नांवाच्या टेंकडीवर देहांतशासन करविलें. तो **व्हेन** साऱ्या प्रजासत्ताकराज्येच्छु प्रमुख पुरुषांपैकीं अति नेमस्त, आणि निर्लोभ, होता. त्याला देहांतशासन करविलें तेंही, त्याच्या विरुद्ध कांहीं गुन्हा, दोष, किंवा अपराध, आणतां आला म्हणून नव्हे, परंतु, जसें **चार्लसानें** एका वेळीं **क्लारेंडनाला** लिहिलें होतें त्याप्रमाणें, **चार्लसाच्या** मतें, "तो वांचतां कामा नये इतका पराकाष्ठेचा तो भयंकर माणूस होता," म्हणून. नोव्हेंबर महिन्यांत, **स्पेन** देशापासून **क्रॉम्वेलानें** जिंकून घेतलेलें **डन्किर्क** शहर, **फ्रान्स** देशाला विकलें, आणि त्या

चार्लसाचें लग्न, माहे मे १६६२.

व्हेन ह्याला देहांतशासन होतें, तारिख १४ जून १६६२.

डन्किर्क शहराची विक्री होते, माहे नोव्हेंबर १६६२.

गोष्टीनें सारे **इंग्लिश** लोक **क्लारेंडना**वर फार संतप्त झाले. ह्याचें मुख्य कारण, तें शहर विकून आलेला पैसा राजानें आपल्या ख्याली-खुशालीकडे खर्च केला असा त्या लोकांना संशय आला.

ह्यानंतर पुढें लवकरच **हालंड** देशाशीं युद्ध पुनः सुरू झालें. **डच** आणि **इंग्लिश** हे समुद्रावरील आधिपत्याविषयीं नेहमीं भांडतच होते, तशांत **अमेरिकें**तील **न्यू आम्स्टर्डम** हें नुकतेंच **इंग्लिशांनीं** घेऊन त्याला **यॉर्क**च्या ड्यूकावरून **"न्यू यॉर्क"** असें नांव ठेवलें होतें. **डच** लोकांमधला **जीन डि वुइट्ट** नांवाचा प्रमुख मुतसद्दी, **मुंबई इंग्लंड**च्या हातीं गेली म्हणून मनांत फार दुखवलेलाही होता, आणि **चार्लस** तर, हद्दपार होऊन **हालंडां**त राहिला असतां, त्याच्याशीं तो देश दुष्मनीनें वर्तूं लागल्या दिवसापासून तो एकसारखा त्या देशाचा द्वेष करीत होता. शेवटीं **आफ्रिके**च्या किनाऱ्यावर, **इंग्लिशां**च्या आणि **डच्चां**च्या जहाजांच्या दरम्यान कांहीं तंटा झाला त्यामुळें तर सर्व गोष्टी अगदीं आणीबाणीवर आल्या, आणि १६६५ त मार्चच्या १४ व्या तारिखेस **इंग्लंड** आणि **हालंड** ह्यांच्या दरम्यान युद्ध सुरू झालें म्हणून प्रसिद्ध केलें, आणि पुढल्या वर्षीं **चौदावा लूइ** (फ्रान्स देशाचा राजा) ह्यानें **डच्चां**चा पक्ष धरला. लढाया सर्व समुद्रावर झाल्या आणि **यॉर्क**चा **ड्यूक** हा अरमाराचा **आड्मिरल** (अधिपति) होता, त्यानें १६६५ त जूनच्या ३ ऱ्या तारिखेस, **सफक** नांवाच्या कौंटींतील **लोएस्टआफ्ट** नांवाच्या बंदराबाहेर जय मिळविला, परंतु दुर्दैवानें त्यानें त्या सरशीचा, शत्रूंचा पाठलाग करून, उपयोग करून घेतला नाहीं. राजाला तें युद्ध चालविण्यासाठीं, **पार्लमेंटा**कडे मोठी रकम मागणें भाग आलें, तेव्हां **पार्लमेंटानें** फक्त त्या यु-

डच लोकांशीं युद्ध, माहे मार्च १६६५.

द्याकरितां १२५०००० पौंड दिले, कारण दरबार ती रकम कदाचित उधळून टाकील अशी पार्लमेंटाला भीति होती.

लंडन एथील सांतीचा रोग, १६६५.

इतक्यांत लंडनावर एक अतिभयंकर कोरडा उडाला. त्या काळांतल्या हेंदऱ्या ओंगळ शहरांतून सांतीचे रोग विरळा येणारे नव्हते, आणि लंडन शहरांतील रस्ते फार अरुंद असल्यामुळें दोन्ही बाजूंच्या घरांचे वरील मजले समोरासमोरच्या मजल्यांना अगदीं भिडलेले असत, आणि घरांतील जमिनी चिकणमातीच्या केलेल्या असून, त्यांवर कुजूं लागलेलें काड, अन्न, आणि केरकचरा, ह्यांचें आच्छादन झालेलें असे. उन्हाळा कडक असला म्हणजे तो नेहमी धामीचे रोग अधिक कमी आणीच. १६६५ चा उन्हाळा, पूर्वीच्या साऱ्या अनुभवापलीकडे प्रखर किंवा कडक होता. त्यावर्षी, सर्व यूरोपखंडभर सांतीच्या रोगानें कहर मांडला होता. तोच रोग मे महिन्यांत लंडनांत उद्भवला, आणि साऱ्या उन्हाळ्याभर इतका वाढत गेला कीं, सेप्टेंबरांत त्यानें एका दिवसांत १५०० माणसें मेलीं, आणि तीन आठवड्यांत एकंदर २४००० मेलीं. दारोदार आंत मारी आहे, हें दाखविण्यासाठीं खूण म्हणून तांबड्या रंगाचा क्रुस काढलेला दृष्टीस पडे, आणि फडक्यानें गुरगुटलेल्या घांटीसहवर्तमान प्रेतें वाहणारा गाडा, रस्त्यांतून रात्रीचा जाई, आणि "आपल्याएथील मेलेल्यांचीं प्रेतें बाहेर आणाहो, आणा" ही आरोळी, रहदारी बंद होऊन अगदीं सुन्या किंवा सामसूम झालेल्या रस्त्यांतून ऐकूं येई. राजा, दरबारी लोक, पार्लमेंटचे सभासद, आणि डॉक्टर व धर्माधिकारी देखील, त्या मारीनें व्यापलेल्या शहरांतून पळून गेले. मरणोन्मुख झालेल्या माणसांचे डोळे मरणसमयींचा उपदेश करून झांकण्याला, आणि जिवंत राहिलेल्या

माणसांचें सांत्वन करण्याला, फक्त परदु:खपरायण आणि आस्थेवाईक पुरुष, आणि मुख्यत्वेंकरून छळणूक पावत असलेले **प्यूरिटनपंथी** धर्मोपदेशक, काय ते शहरांत राहिले. पराक्रमी **जनरल मंक** (ह्याला आल्बिमारल्चा ड्यूक ही पदवी मिळालेली होती), **लंडनचा लार्ड मेयर** (कोतवाल) **लॉरेन्स**, आणि कांहीं दुसरे लोकही, बंदोबस्त राखून, त्या विपत्तिग्रस्त लोकांच्या दहशतीला, लुटालूट आणि झोटिंगपादशाही होऊन भर पडेल, ती बंद करण्यासाठीं, त्या संकटाला तोंड देऊन शहरांत राहिले.

हिंवाळा आला तेव्हां एक लक्षाहूनही ज्यास्ती माणसें मृत्युमुखीं पडल्यावर ती मारी नाहींशी झाली. परंतु व्यापारधंदा चालू होऊन आबादानी लागलीच पुन: झाली नाहीं. तशांत, **डचांशीं** तें कंटाळवाणें युद्ध चालू होतेंच. **डन्किर्क** आणि **नार्थफोरलांड** ह्या दोहों ठिकाणांच्या दरम्यान, **डाउन्स**मध्यें (समुद्रकांठीं जमलेल्या वाळूच्या टेंकाडांमध्यें), एका पक्षाकडे, **आल्बिमारल्चा ड्यूक** व **प्रिन्स** (राजपुत्र) **रूपर्ट** हे दोघे मुख्य सरदार, आणि दुसऱ्या पक्षाकडे, **डच** लोकांच्या अरमाराचा अधिपति **डि रॉयटेर** असून, मोठी प्रख्यात लढाई झाली, ती, कोणत्याही पक्षाचा जय न होतां चार दिवस चालली होती.

डाउन्समधील लढाई, १६६६.

ह्या साऱ्या विपत्तीला जणू भर घालण्यासाठींच, १६६६ त सेप्टेंबरच्या २ ऱ्या तारिखेस, **लंडन ब्रिज** (लंडनांतील पूल) नजीक **पूडिंग लेन**मध्यें (पूडिंग नांवाच्या आळींत) एका रोटीवाल्याची भट्टी फाजील तापल्यामुळें भयंकर आग उत्पन्न झाली. त्या समयीं पूर्वेकडील वारा सोसाट्यानें वाहत होता त्यामुळें, दाट वस्तीच्या रस्त्यांवरील लांकडी घरांनीं चकमकीच्या कपासारखी आग तेव्हांच

घेतली, आणि तीं सतत तीन दिवस जळत राहिलीं. मुख्यत्वें राजा आणि **यॉर्कचा ड्यूक** ह्यांच्या हिंमतीनें शेवटीं त्या आगीच्या ज्वाळा पसरावयाच्या थांबल्या. त्यांनीं, **टेम्पल बार, पाइ कॉर्नेर, स्मिथफील्ड,** आणि इतर पेठा किंवा महले, ह्यांतील दहापांच, दहापांच मिळून एक समुदाय, असे घरांचे कित्येक समुदाय सुरुंग लावून उडवून आळ्यांतून खिंडारें पाडविलीं; तीं खिंडारें ओलांडून आगीला पलीकडे जातां येईना. एकंदर नुकसान फार भयंकर, झालें. १३२०० नांदतीं घरें, आणि ८९ देवळें, राखरांगोळी होऊन जमीनदोस्त झालीं, त्याचप्रमाणें **सिटि कंपनिझ** (शहरांतल्या व्यापारी मंडळ्या) ह्यांचे दिवाणखाने किंवा हवेल्या, **एक्सचेन्ज** (उदमी व्यापारी दलाल वगैरे लोकांचा हुंड्यापांड्या वटावण्याचा फड, कट्टा, अड्डा, किंवा चौक) ह्या नांवाची इमारत, **कस्टम-हौस** (जकात वसूल करण्याची सरकारी कोठी किंवा मांडवी), आणि **सेन्ट पालचें कथीड्रल** (बिशपाची गादी असलेलें देऊळ), ह्या इमारतीही जळून खाक झाल्या. परंतु परिणामीं ती आग ईश्वराचा एक अनुग्रहच अशी झाली, कारण तिच्यायोगें तीं भिकार लांकडी घरें नाहींशीं झालीं, आणि घाणेऱ्या विहिरी आणि नळ नाले मोऱ्या वगैरे जळालेल्या घरांच्या मलम्यानें भरून गेल्या.

लंडन एथील आग, तारिख २ सेप्टेंबर १६६६.

आतां नवीं विटांचीं घरें बांधलीं, आणि पुढें शहरांत लागणारें बहुतेक पाणी **हर्टफर्डशायरां**तील **चाड्वेल** नांवाच्या झऱ्यांपासून **"न्यू रिव्हर"** (नवी नदी) नांवाच्या कालव्यांतून आणलें. तो कालवा १६१९ त **सर ह्यू मिडल्टन** ह्यानें पुरा बांधून तयार केलेला होता.

न्यू रिव्हर नांवाच्या कालव्यानें पाण्याचा पुरोठा, १६२०.

ह्यां सर्व अरिष्टांमध्यें, अरमाराला पुनः शिलेपोस करण्यासाठीं, **कामन्सां**कडे नवीन द्रव्याचा पुरोठा **क्लॅरेंडना**ला मागणें भाग आलें. परंतु त्यांना खरोखर संशय येऊं लागला कीं, आपण द्रव्य देतों तें सारें कारणीं न लागतां दरबारांतील चयनींकडे उधळलें जातें. म्हणून त्यांनी, राजाचा हिशेब तपासण्यासाठीं एक कमिटी नेमली पाहिजे, असा आग्रह धरला; आणि तपासणीच होऊं लागली तर आपल्या हिशेबांचा निभाव लागणार नाहीं, हें **चार्लस** समजून होता, म्हणून त्यानें पैसा मागण्याचें नांवच सोडून देऊन तह करण्याचा निश्चय केला. त्यानें **लूइ** (फ्रान्स देशाचा राजा) ह्याच्याकडून १६६७ च्या मे महिन्यांत **ब्रेडा** एथें तहाचें बोलणें करण्यासाठीं मंत्रिमंडल जमवावें अशी तजवीज करविली. परंतु तेथें कसलाही ठराव होण्याच्या पूर्वींच, **डि रॉयटेर** नांवाचा **डचां**च्या अरमाराचा अधिपति ह्यानें एकाएकीं साठ जहाजांनिशीं **मेड्वे** नांवाच्या नदींतून वर येऊन, **चाथम** बंदरांतील तीन **मेन आफ् वार,** म्हणजे लढाऊ गलबतें, जाळलीं, आणि **टेम्स**नदीची नाकेबंदी करून, वाट अडविली. तेव्हां, लागेल तितका सारा पैसा देत आलें असतां, **इंग्लिश** अरमाराच्यानें आपल्या नदीचें देखील संरक्षण करवलें नाहीं, हें पाहून **इंग्लंडां**तले लोक तैषानें वेडे झाले. त्यांनीं आपला सारा राग **क्लॅरेंडना**वर काढला. तो राजाला व सर्व देशाला फारां दिवसांपासून अप्रिय झालेला होता. म्हणून **डच** लोकांशीं तह होतांच, त्यावर **पार्लमेंटां**त दोषारोप केला. तेव्हां तो **फ्रान्स** देशीं पळून गेला. तेथें, **हिस्टरि आफ्**

ब्रेडाचा तह, १६६७.

डचांचें अरमार मेड्वेमधील जहाजें जाळतें.

क्लॅरेंडन हद्दपार होतो, १६६७.

धि ग्रेट रिबेलियन (मोठ्या बंडाचा इतिहास) ह्या नांवाचा आपला ग्रंथ लिहून, तो विदेशवासांतच मरण पावला. ह्याची मुलगी **आन हाइड**, हिचें १६६१ त यॉर्कचा ड्यूक ह्याच्याशीं लग्न झालेलें होतें, आणि ती आमच्या **मेरी**, आणि **आन**, ह्या दोहों राण्यांची माता होती.

जेव्हां **क्लारेंडन** पदच्युत झाला, तेव्हां **पार्लमेंटांत काव्हलियरांचा** (शिलेदारांचा) खंबीर पक्ष होता तो मोडला. पुढें **चार्लस** पूर्वींहून अधिकच आपल्या इच्छेप्रमाणें वागूं लागला, आणि आपल्या बाकी राहिलेच्या कारकीर्दींत, **पार्लमेंटाला** पाणी पाजण्याचा त्यानें होईल तेवढा इलाज केला. मागच्या कांहीं काळापासून **प्रिव्हि कौन्सिलाच्या** सभासदांपैकीं जे सभासद राजाचे अगदीं अंतरंग बुद्धिवाद सांगणारे होते, त्यांची एका तऱ्हेची विशेष किंवा असाधारण कमिटी बनलेली होती. तिला **"कबाल"** (गुप्तहेतूसाठीं जमलेलें कूट) असें म्हणत. कबाल हा शब्द, क्लब (मंडळी) ह्याअर्थी **फ्रेंच**, भाषेंतील **कबाले** शब्दावरून निघालेला आहे. हीच कमिटी आमचें हालींचें "काबिनेट", म्हणजे निवडक मंत्रिमंडल, ह्याचा आरंभ होय. असा एक विचित्र योग घडून आला कीं, ह्या वेळीं तें काबिनेट किंवा कबाल(मंत्रिमंडल)ह्या मध्यें पांच प्रधान होते, त्यांचीं नांवें **क्लिफर्ड, आर्लिंग्टन, बकिंग्हम, आश्ली,** आणि **लॉडर्डेल** अशीं होतीं, त्या पांच नांवांचे प्रथम वर्ण एकत्र जोडले म्हणजे तो कबाल शब्द जुळतो. हे पांच प्रधान पुढल्या सहा वर्षांत राजाचे मुख्य सल्लामसलत सांगणारे होते, आणि सर्व

कबाल नांवाचें प्रधानमंडल, १६६७-१६७३.

राष्ट्रांतील लोक त्यांचा इतका द्वेष करूं लागले कीं, तेव्हांपासून तो कबाल शब्द निंदासूचक झाला आहे.

वस्तुत:, **चार्लसानें** जीं गुप्त कारस्थानें चालविलीं होतीं, त्यांना ते पांच प्रधान बळी पडले, म्हणजे त्या करस्थानांचा सारा दोष त्यांवर निष्कारण आला. कांहीं काळापासून **चौदावा लूइ** (फ्रान्सचा राजा), **नेदर्लॅंड्स** हा मुलूख **स्पेन** देशाचा असतां, त्याची शींव दाबीत चालला होता. १६६८ त तो ती शींव इतकी मागें हटवीत गेला होता कीं, **हालंडाला** दहशत पडली, आणि त्या राज्यांतील प्रमुख मुतसद्दी **डि वुइट्ट** ह्यानें, **हेग** एथें **सर वुइलियम टेम्पल** नांवाचा इंग्लंडाकडील वकील होता, त्याच्या साहाय्यानें, एक **"ट्रिपल अल्लायन्स"** (तीन राज्यांच्या दरम्यानचा दोस्तीचा एकवळा किंवा कट) नांवाचा, **हालंड, स्वीडन,** आणि **इंग्लंड,** ह्या तीन **प्राटेस्टंटपंथी** राज्यांच्या दरम्यान साहाय्यसंकेती दोस्तीचा कट घडवून आणला. त्या योगें त्यानें **लूइ** ह्याला **स्पेन** देशाशीं ए-ला-शापेल्ल एथें तह करावयास लावलें. दरम्यानच्या वेळांत, **चार्लसाशीं** गुप्त मुलूख किंवा स्नेहभाव जोडून, त्या **ट्रिपल अल्लायन्सचा** किंवा त्रिकूटाचा पाया ढासळून टाकीन, अशी आपल्या तर्फे **लूइ** आशा करून होता. **चार्लस** तर, **क्याथलिक्सांवर** कृपादृष्टि करण्याला, किंवा **फ्रान्सचा** पक्ष धरण्याला, **पार्लमेंटाचें** मन वळवितां येईना म्हणून संतापलेला होता. त्यामुळें त्या दोहीं राजांच्या दरम्यान **डोव्हर** एथें गुप्त तहनामा होऊन त्यावर सह्या झाल्या.

ट्रीपल अल्लायन्स, जान्युअरी, १६६८.

डोव्हरचा गुप्त तह, १६७०.

त्या तहनाम्यांत, मी **क्याथलिक** आहें असें प्रसिद्ध करीन, आणि जर **लूइ** मोबदला म्हणून मला दरसाल ३०००००० पौंड देत जाईल, आणि **इंग्लंडां**तील लोक उपद्रव करूं लागले तर **लूइ इंग्लंडांत फ्रेंच** फौज पाठवील, तर मी **डचां**च्या विरुद्ध **फ्रें**चांना कुमक करीन, असें **चार्लसा**नें वचन दिलें होतें. वर सांगितल्या पांचां प्रधानांपैकीं **क्लिफ्फर्ड** आणि **आर्लिंग्टन** हे दोघे **क्याथलिक्स** होते, त्या दोघांना मात्र एक गुप्त तह झाला आहे इतकेंच कळलें होतें. त्यांना देखील त्यांतील सगळा मजकूर कळला नव्हता. पुढील सालीं, म्हणजे १६७१ त, **चार्लसाला** अरमाराकरितां म्हणून **पार्लमेंटा**कडून मोठी रकम मिळाली, आणि नंतर त्यानें तें **पार्लमेंट** एक वर्ष आणि नऊ महिनेपर्यंत तकूब केलें.

ह्याप्रकारें विश्वासघात करून, तो आतां अप्रामाणिकपणा करण्यास प्रवृत्त झाला, आणि त्यानें **क्लिफ्फर्डा**च्या सल्ल्यानें **एक्सचेकर** (राज्याचा खजीना किंवा जामदारखाना) बंद करविला. **लंडन** शहरांतील पेढीवाले सावकार व सोनार ह्या लोकांचा फारां दिवसांचा रिवाज असा होता कीं, त्यांच्या पेढ्यांवर जो पैसा लोक ठेवीत, तो **इंग्लिश सरकाराला** उसनवार द्यावा, आणि उसनवार दिलेलें मुद्दल व व्याज हीं दोन्ही सरकाराच्या महसुलांतून परत घेत जावीं. १६७२ त राजकीय जामदारखान्याकडे अशा-

राष्ट्रीय दिवाळें, १६७२.

प्रकारचें लोकांचें एकंदर सुमारें १३०००००० लक्ष पौंड कर्ज येणें होतें. असें असतां, तें कर्ज परत देणें बंद केलें आहे, असा **राजाचा हुकूम** प्रसिद्ध झाला तेव्हां साऱ्या **इंग्लंडाला** एकदम धडक बसली. ज्या लोकांचा पैसा पेढीवाल्या सोनारांनीं

सरकाराला उसना दिला होता, त्या सर्व लोकांवर त्या हुकमानें अर्थात् मोठी आफत गुदरली, आणि **वुइलियम** आणि **मेरी,** हीं गादीवर बसत तोंपर्यंत तो पैसा कधींच परत दिला नाहीं.

डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स, १६७२.

लोक ह्या अन्यायानें कष्टी होते तोंच, **यार्कच्या ड्यूकानें,** मी **रोमन क्याथलिक** आहें, असें प्रसिद्ध केलें, आणि **चार्लसानें, रोमन क्याथलिक्स** आणि **नान्कान्फॉर्मिस्टस्** (सरकारानें स्थापलेल्या धर्माला अमान्य लोक), ह्या लोकांच्या विरुद्ध असलेल्या सर्व कायद्यांचा अमल कांहीं काळपर्यंत तकूब केला आहे असा, **"डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स"** (मेहरबानगीच्या देणगीचा जाहीरनामा) नांवाचा एक जाहीरनामा छापून प्रसिद्ध केला. ह्या सर्व गोष्टींचा कळस करण्याला, **चार्लस लूईला** उघडपणें मिळाला, आणि **डच्च** लोकांविरुद्ध युद्ध करणार म्हणून त्यानें जाहीर केलें. तेव्हां **हालंड** जिंकलें जातें असा पहिल्यानें रंग दिसूं लागला. परंतु इतक्यांत, एका दंग्यांत **डि वुइट्ट्** ह्याचा खून झाला, आणि **एलिझाबेथच्या** कारकीर्दींत ज्या विख्यात **वुइलियमानें नेदर्लँड्स** देशाचें रक्षण केलेलें होतें, त्याचा पणतू, **आरेन्जचा** तरुण **वुइलियम,** ह्याच्या हातीं आतां तेथील मुख्य अधिकार आला. त्यानें त्या आपल्या पराक्रमी पूर्वजाच्या कित्याला अनुसरून, **डच्च** लोकांना आपले बांध फोडून समुद्राला आंत पसरूं देण्याला प्रवृत्त केलें. त्यामुळें **चार्लस** आणि **लूइ** ह्यांच्या एकत्र झालेल्या फौजांना त्या देशांतून माघारें जावें लागलें.

हालंडाशीं दुसरें युद्ध, १६७२.

शेवटीं **चार्लसाच्या** जवळचें द्रव्य संपल्यामुळें, **पार्लमेंट** पुनः

भरूं देऊन, **कामन्सांच्या** कोपाला त्याला तोंड देणें भाग आलें. त्या **कामन्सांनीं** त्याच्याकडून तो **"डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स"** एकदम रद्द करविला; आणि **"टेस्ट आक्ट"** (कसोटीचा कायदा) ह्या नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यानें सर्व दिवाणी किंवा मुलकी आणि लष्करी कामदारांना **रोमच्या धर्मां**तील मतांवर आमचा बिलकूल विश्वास नाहीं, अशी प्रतिज्ञा करून **इंग्लिश** धर्माप्रमाणें प्रभुभोजन नामक संस्कार करून घेणें भाग आलें. त्याच कायद्यामुळें **यार्कच्या ड्यूकाला** आपल्या **आड्मिरलच्या** (अरमाराच्या अधिपतीच्या) हुद्द्याचा राजीनामा देणें प्राप्त झालें, आणि **क्लिफर्ड** व **आर्लिंग्टन** ह्या दोघांना आपलीं सरकारी कामें सोडून देणें भाग पडलें. **आश्ली** ह्याला **शाफ्ट्स्बरीचा अर्ल** हा किताब दिलेला होता, त्याला हजार वाटांनीं त्या **डोव्हर** एथील गुप्त तहाबद्दल कांहीं शोध लागला असावा त्यामुळें त्याचाही राजाशीं तंटा झाला. ह्या कारणांनीं त्या **"कबाल मिनिस्ट्रीच्या"** (कबाल नांवाच्या प्रधानमंडलाच्या) कारकीर्दींत ज्या अपायकारक गोष्टी घडल्या, त्यांच्या योगें लोकांचें वैर संपादून, तें कबाल नांवाचें प्रधानमंडल शेवटीं मोडलें. त्यानंतर **शाफ्ट्स्बरी** हा, होईल तितका प्रयत्न करून, राजाला आड येऊं लागला. तो **पार्लमेंटांत**, **"कन्ट्रि"**पार्टि ऊर्फ **"आपोझिशन"**, म्हणजे देशीपक्ष ऊर्फ प्रतिपक्ष, ह्याचा प्रमुख झाला; आणि आमच्या हालींच्या काळापर्यंत चालत आलेल्या "मिनिस्ट्रि" (प्रधानमंडल) आणि

धि टेस्ट आक्ट, १६७३.

कबाल नांवाच्या प्रधानमंडलाची समाप्ति होते.

प्रधानमंडल आणि प्रतिपक्ष.

"आपोझिशन" (प्रतिपक्ष) ह्यांच्या दरम्यानच्या दुफळीचा हा आरंभ झाला.

डान्बीचा राज्यकारभार, १६७३-१६७९.

पार्लमेंटाचा निश्चय झालेला पाहून **चार्लसानें** नेहमीप्रमाणें आपला दुराग्रह सोडला. त्यानें **डान्बीचा अर्ल, सर टामस आस्बोर्न,** ह्याला आपला मुख्य प्रधान केलें. तो **कामन्सांना** आवडला, आणि **चार्लसानें** १६७४ त **हालंडाशीं** तह केला. **कामन्सांनीं** त्या गोष्टीचा मोबदला म्हणून त्यानें मागितलेलें द्रव्य सढळपणानें दिलें. त्यानें १६७७ त **यॉर्कच्या ड्यूकाची** सर्वांत वडील मुलगी **मेरी** हिचें **आरेन्जचा वुइलियम** ह्याच्याशीं लग्न जुळविण्याला देखिल **डान्बीला** परवानगी दिली. ह्या लग्नानें लोकांना फार आनंद झाला, कारण, **वुइलियम** आणि **मेरी** हीं उभयतां **प्राटेस्टंट्स** होतीं, आणि **जेम्साला** (यार्कच्या ड्यूकाला) पुत्र नव्हता, त्यामुळें त्याच्या पश्चात् **मेरीच** गादीची वारस होती.

वुइलियम आणि मेरी ह्यांचें लग्न, १६७७.

चार्लसाला लूईकडून पेनशन मिळतें.

परंतु ह्या साऱ्या वेळांत, **चार्लसाचें** अजून **लूईशीं** गुप्त बोलणें चालू होतेंच. १६७५ त **लूईकडून** त्याला दरसालचें १२२००० पौंडांचें पेनशन (बैठेंवेतन) मिळालें, आणि त्याच्या मोबदला, **लूईच्या** अनुमोदनावांचून कोणतींही युद्धें किंवा तह करणार नाहीं, असें त्यानें वचन दिलें. पुढें १६७८ त जेव्हां, **फ्रान्स** देशाशीं युद्ध केलें पाहिजे म्हणून त्याला **पार्लमेंटानें** टुमणी लावली, तेव्हां त्यानें फ्रान्सच्या राजाशीं दुसरा एक गुप्त तह केला, आणि **पार्लमेंटाचें**

विसर्जन करण्यासाठीं म्हणून लांचादाखल त्या राजाकडून त्याला २४००० पौंड मिळाले.

हें सर्व गुप्तपणें चाललें होतें तथापि, आपला विश्वासघात होत आहे, असली सर्व राष्ट्रांतील लोकांच्या अंतःकरणांत अस्वस्थ करणारी वृत्ति उत्पन्न झालेली होती. त्याच समयीं एका विलक्षण वार्तेनें साऱ्या इंग्लंडभर दहशत उत्पन्न झाली. **टैटुस ओट्स** नांवाचा एक हलक्या आब्रूचा धर्मोपदेशक होता, तो, **जेझुइट्स** नांवाचा **रोमन क्याथलिक** धर्मांतला एक पंथ होता, त्या पंथाला मिळाला होता. तो, राजाला ठार मारून **क्याथलिक**-पंथाचें राज्य स्थापन करण्यासाठीं **क्याथलिक्स** लोकांमध्यें एक गुप्त कट झालेला मला माहीत आहे, म्हणून उघडपणें बोलूं लागला. त्यानें ती आपली गोष्ट सर **एड्मंड बरि गॉड्फ्रे** नांवाच्या एका माजिस्त्रेटाला कळविली, आणि पुढें थोड्या दिवसांनीं **सेन्ट पान्क्रासच्या** देवळानजीक एका खंदकांत **गॉड्फ्रे** ठार मारून टाकलेला सांपडला. तेव्हां तो “**पोपिश प्लॉट**”

पोपिश प्लॉट, १६७८.

(पोपाच्या अनुयायांचा म्हणजे **क्याथलिक्स** लोकांचा कट) छपविण्यासाठीं **क्याथलिक्सांनीं** गॉड्फ्रेचा खून केला असें लोकांस वाटलें, आणि जेव्हां **पार्लमेंट** भरलें, तेव्हां, त्या गोष्टीची चौकशी करण्यासाठीं त्यानें एक कमिटी नेमली. **कोलमन** नांवाच्या एका **जेझुइटाचे** कांहीं कागद उघडकेस आले. त्यांनीं **पार्लमेंटाला** भीति वाटली, आणि त्यापासून इतकी भारी दहशत पडली कीं, **पार्लमेंटानें** एक कायदा केला, त्यानें, **यार्कच्या ड्यूकाखेरीज**, इतर सर्व **क्याथलिक्सांना पार्लमेंटचें** द्वार बंद केलें. ह्यानंतर दीडशें वर्षेपर्यंत कोणीही **क्याथलिक पार्लमेंटच्या** दोहीं सभांपैकीं ए-

कींतही कधीं बसला नाहीं. परंतु पुढें त्याहूनही वाईट झालें. **ओट्स** हा लोकप्रिय झाला, आणि चहाडखोरी सफल झालेली पाहून, तो, आणि इतर खबर देणारे लोक, ह्यांनीं शपथा घेऊन शेंकडों निरपराध **क्याथलिक्सां**च्या जीवांवर घोरपडी आणण्याचा धंदा मांडला. अशा पेंची आलेल्या **क्याथलिक्सां**पैकीं अति प्रख्यात पुरुष **लार्ड स्टाफ्फर्ड** नांवाचा होता. तो सरळ स्वभावाचा आणि प्रामाणिक बडा लोक होता. मी निरपराध आहें असें प्रतिज्ञेवर सांगत असतां, त्याला १६८१ त देहांतशासन केलें. **चार्लस** त्या साऱ्या चाललेल्या गोष्टींबद्दल आपल्या मित्रमंडळीमध्यें हांसत असे, परंतु त्या त्यानें तशाच चालूं दिल्या, आणि **शाफ्ट्स्बरी**च्या मनांत **लार्ड डान्बी**ला काढून लावावयाचें होतें, म्हणून तो होईल तितका प्रयत्न करून, त्या पेटलेल्या आगींत तेल ओतीत होता.

दरम्यानच्या वेळांत, **फ्रान्स**चा राजा, **लूइ**, ह्यानें **"निमेगेनचा तह"** करून, **हालंड** आणि **स्पेन** ह्या देशांशीं सल्ला केला, आणि आतां **चार्लसा**च्या मदतीची जरूर राहिली नाहीं, म्हणून त्यानें त्याला ठरलेलें पेनशन देण्याचें नाकारलें; त्या वेळीं **पारिस** एथें **इंग्लिशां**चा वकील **मान्टेगू** नांवाचा होता, त्याला **डान्बी**विषयीं भीति वाटण्याला कारण होतें, म्हणून त्यानें **हौस आफ् कामन्स** ह्यांस, ज्या खलित्यांत त्या पेनशनाबद्दल करार वगैरे केलेले होते तो खलिता दाखविला. त्या खलित्यावर **डान्बी**ची सही होती, आणि राजाच्या स्वदस्तूरची टीप होती. तो खलिता पाहून ती **कामन्सां**ची सभा थक्क झाली. **इंग्लंड**च्या

निमेगेनचा तह, १६७८.

राजानें फ्रान्सच्या राजाचें पेनशनदार व्हावें, ही अतिशय मानखंडना करणारी गोष्ट होती. तेव्हां डान्बीवर एकदम दोषारोप केला, आणि चार्लसानें, आणखी गोष्टी उघडिकेस न याव्या म्हणून, त्या पार्लमेंटाचें विसर्जन केलें. तें पार्लमेंट साडेसतरा वर्षेपर्यंत टिकलें होतें.

डान्बी पदच्युत होतो, १६७९.

परंतु आतां सर्व राष्ट्र अगदीं भयभीत होऊन गेलें, आणि १६७९ त मार्चच्या ६ व्या तारिखेस नवीन पार्लमेंट निवडणूक होऊन भरतांच, डान्बीला टौअरांत कैदेंत टाकलें. तेथें तो पांच वर्षेपर्यंत राहिला. त्या पार्लमेंटानें नंतर, यॉर्कचा ड्यूक हा क्याथलिक होता, ह्या सबबेनें त्याला गादीवरून अजीं वर्ज करून त्याचे पाय गादीस कधींच लागूं नयेत असें करण्यासाठीं एका कायद्याचें बिल, म्हणजे मसुदा, पुढें आणला, तेव्हां चार्लस भयभीत होऊन त्यानें, जेम्साला (यॉर्कच्या ड्यूकाला) परदेशीं पाठविलें, आणि त्या पार्लमेंटाला, फक्त दोनच महिनेपर्यंत बसल्यावर, त्यानें फांटा दिला. असें असतां, त्या थोड्या वेळांतच, शाफ्ट्स्बरी ह्यानें अतिशय उपयोगी असा एक कायदा पसार केला. ही गोष्ट स्मरेलच कीं, माग्ना कार्टा झाल्या दिवसापासून, कोणाही इंग्लिश माणसाला कैदकेलें तर, "हेबियस कॉर्पस" (शरीर हाजीर कर) ह्या नांवाचा तुरुंगाच्या अधिकाऱ्याला लेखी हुकूम मिळण्याकरितां अर्ज करण्याचा त्या माणसाला हक्क होता (३८३ वें पृष्ठ पहा). परंतु राजे आणि न्यायाधीश हे फार दिवसांपासून आपल्या मर्जीस येईल तेव्हां ते लेखी हुकूम युक्तीनें एकाबाजूस ठे-

एक्सक्लूझन बिल (गादीवरून वर्ज करण्याच्या कायद्याचा मसुदा) ह्याविषयीं झगडा, १६७९-१६८१.

वीत. आतां **चार्लसानें** अडथळा केला तथापि त्याला न जुमानून, **शाफ्ट्स्बरीनें "हेबियस कार्पस आक्ट"** नांवाचा कायदाच, पसार करविला. तो कायदा झाल्यामुळें, ह्या गैरवहिवाटी सुधरून गेल्या, आणि तो कायदा इतका अतिशय स्पष्ट झाला कीं, त्याची टाळाटाळ करण्याची सवडच राहिली नाहीं.

हेबियस कॉर्पस आक्ट, १६७९.

दरम्यानच्या वेळांत, त्या **एक्स्क्लूझन बिल्लाबद्दल**, म्हणजे **जेम्साला** गादीवरून वर्ज करण्याच्या कायद्याच्या मसुद्याबद्दल, झगडा चालूच होता. पुढलें **पार्लमेंट** आक्टोबरमध्यें भरलें, तेव्हां **कामन्सांच्या** सभेंत तो मसुदा पसार झाला. परंतु **लार्डसांच्या** सभेंत तो पसार झाला नाहीं, कारण, **लार्ड हालिफाक्स** नांवाचा एक फार वाकब मुतसद्दी होता, त्यानें त्या **बिल्लाला** हरकत आणली. **हालिफाक्स** हा आपणाला **"ट्रिमर"** (रंग पाहून चालणारा दोहोंडगरीवर हात ठेवणारा) म्हणवी, कारण तो, एकादी बोट झुकूं लागली असतां तिला समतोल करण्यासाठीं ह्या बाजूवरून त्या बाजूला त्या बाजूवरून ह्या बाजूला सरकणाऱ्या माणसासारखा होता. तो दोहों पक्षांतून एकालाही परम मर्यादेला जाऊं देत नसे. आतां **प्रिन्स आफ् आरेन्ज** (आरेन्जचा राजा किंवा राजपुत्र) ह्याची बायको **मेरी** ही **चार्लसाच्या** पश्चात् राज्याधिकारिणी व्हावी अशी **पार्लमेंटाची** इच्छा होती, तथापि **दुसऱ्या चार्लसाचा मान्मथचा ड्यूक** ह्या नांवाचा राखेच्या पोटचा आणि लाडका मुलगा होता, त्याला **चार्लसाच्या** मागें गादीवर बसवावा, असें **शाफ्ट्स्बरीनें** खरोखर कारस्थान चालविलें होतें. ही गोष्ट झाली असतां फार अनिष्टकारक होईल असें **हालिफाक्साला**

मान्मथचा ड्यूक.

वाटत होतें. **मान्मथ** हा फार लोकप्रिय होता, आणि त्याला **"थि प्राटेस्टंट ड्यूक"** हें नांव पडलेलें होतें. तशांत **शाफ्ट्स्बरीनें** असें एक ढोंग मछावलें होतें कीं, **चार्लसाचें** त्याच्या राणीशीं लग्न होण्यापूर्वी त्या तरुण **ड्यूकाच्या** आईशीं त्याचें लग्न झालेलें होतें. ह्या काळचा महाकवि **ड्राइडेन** ह्यानें एक उपहासपर काव्य रचलें, त्यांत, **मान्मथ** आणि **शाफ्ट्स्बरी** ह्या दोघांना **आब्सालम** आणि **आकिटॉफेल** हीं कल्पित नांवें देऊन ते दोघे राज्याकरितां कारस्थान करीत आहेत असें वर्णन केलेलें आहे. परंतु राजा **यॉर्केच्या ड्यूकाविषयीं** आपलें इमान राखून होता, आणि सर्व गोष्टी इतक्या जड दिसूं लागल्या कीं, राजानें पुनः **पार्लमेंटाचें** विसर्जन केलें.

पार्लमेंटचें विसर्जन होतें, जान्युअरी १६८१.

नंतर दोन जबरदस्त किंवा दांडगे पक्ष उत्पन्न झाले. (१) **शाफ्ट्स्बरीचा** पक्ष, ह्याला **"पिटिशनर्स"** (अर्जदार) असें नांव पडलें, कारण त्या पक्षांतील लोकांनीं त्या **एक्सक्लूझन बिल्लाला** आपण संमति द्यावी म्हणून राजाकडे अर्ज केलेला होता. (२) **"थि अब्होरर्स"** (अति द्वेष करणारे) ह्यांचा पक्ष, हे त्या **बिल्लाचा** अति द्वेष करीत असत. ह्या दोहों पक्षांनीं एकामेकाला लवकरच **"व्हुइग"** आणि **"टोरी"** हीं निंदापर किंवा ठेंगमताचीं नांवें दिलीं. **व्हुइग** ह्या शब्दाचा अर्थ आंबट झालेलें दूध किंवा ताक, असा होता, आणि तें नांव पूर्वी **स्काच्च** बंडवाले ह्यांस दिलेलें होतें. **यॉर्केच्या ड्यूकाचे** मित्र **शाफ्ट्स्बरीच्या** पक्षाला **"व्हुइग्स"** असें म्हणूं लागले, कारण त्यांच्यामतें त्या पक्षांतील लोक राजाविरुद्ध बंड करणारे होते. **टोरी** हें नांव पूर्वी **आयर्लंडांतील** जे

व्हुइग आणि टोरी.

रोमन-क्याथलिक-पंथी लोक न्यायरक्षणबाह्य झालेले होते त्यांना दिलेलें होतें; आणि **शाफ्ट्स्बरी**च्या पक्षांतील लोक **यॉर्क**च्या **ड्यूका**च्या मित्रांना **"टोरीझ"** म्हणूं लागले; कारण त्यांच्या मतीं ते, त्या **आयरिश** न्यायरक्षणबहिष्कृतांप्रमाणें, **प्राटेस्टंट्सांचे** शत्रु होते. ह्या दोन्ही नांवांच्या मूळच्या खऱ्या अर्थांचा लवकरच लोप होऊन, तीं नांवें, जो पक्ष लोकांची तरफ विशेष धरतो तो **व्हुइग**-पक्ष, आणि जो पक्ष राजसत्तेची तरफ धरतो तो **टोरी**पक्ष, ह्या अर्थीमात्र तेव्हांपासून वापरूं लागले.

१६८१ च्या मार्च महिन्यांत **चार्लसा**चें पांचवें आणि अखेरीचें **पार्लमेंट आक्सफर्ड** एथें भरलें, तेव्हां पुनः **रोमन क्याथलिक्सां**चा अमल स्थापण्याकरितां खरोखर संगनमत होऊन कट झालेला आहे असा त्यांतील **व्हुइग** पक्षाच्या सभासदांचा दृढ ग्रह झालेला होता, म्हणून त्या **व्हुइग्सां**नीं हत्यारबंद लोक आपल्याबरोबर नेले. त्यामुळें त्यांच्या काजाचा नाश झाला. पुनः यादवी होते कीं काय अशी लोकांना भीति वाटूं लागली, आणि जेव्हां **चार्लस** हा खंबीर पाहरा बरोबर घेऊन **आक्सफर्डा**स आला, आणि **जेम्स** (यॉर्कचा ड्यूक) ह्याला माझ्या मृत्यूनंतर नांवाचा राजा म्हणावें, परंतु **आरेन्जची** राणी (मेरी) हिला राजप्रतिनिधीण नेमून तिनें वास्तविक राज्यकारभार करावा, असें **पार्लमेंटा**शीं त्यानें बोलणें लावलें, तेव्हां त्या **पार्लमेंटा**पैकीं त्याच्या म्हणण्याचा पुरस्तपन्हा करणारा असा एक बलाढ्य पक्ष त्याच्या तरफेचा झाला. नंतर एका आठवड्याच्या अखेरीस अगदीं एकाएकीं, पूर्वी कांहीं सूचना न करतां, त्यानें त्या **पार्लमेंटाचें** विसर्जन केलें, आणि पुढें कधींही दुसरें **पार्लमेंट** बोलावलें नाहीं.

आक्सफर्ड एथील पार्लमेंट, १६८१.

त्याचा पुरा जय झाला. **मान्मथाशीं** मिळून फंदपितूर केल्याबद्दल **लार्ड शाफ्ट्स्बरी** ह्यावर राजद्रोहाच्या गुन्ह्याचा आरोप कोडतापुढें आणला, आणि **लंडन** शहरचे शेरिफ्फ्स **व्हुइग्स** होते, त्यांनीं त्या आरोपाची चौकशी करण्यासाठीं **शाफ्ट्स्बरीला** अनुकूल अशी ग्रान्ड जूरि (मोठी जूरी) निवडली, तेव्हां **चार्लसानें** **लंडनच्या** सनदेंत कांहीं गोम शोधून काढून, युक्तीनें दोन नवे शेरिफ्फ्स निवडवून नेमविले. ह्या नवीन शेरिफ्फ्सांची निवडणूक होईतों, **शाफ्ट्स्बरी हालंडांत** पळून गेला. तेथें तो पुढल्या सालीं, म्हणजे १६८३ त, मरण पावला. त्याचा कडेलोट झाला तेव्हां त्यानें आपल्याबरोबर आपल्याहून चांगलीं चांगलीं माणसें खेंचलीं. जरी त्यांचा प्रमुख गेला, तथापि **व्हुइग्स** लोक अजून राजावर आपण शेर होऊं अशी उमेद बाळगून होते. **मान्मथचे** पुष्कळ दोस्त होते. त्यांत मुख्यत्वेंकरून **रस्सेल** आणि **एसेक्स** हे दोघे **अर्ल, आल्गर्नोन सिड्नी, लार्ड ग्रे,** आणि **लार्ड हाउअर्ड,** हे होते, आणि त्या मित्रांनीं मिळून एक कट केला. लोकांना बंड करून उठण्यास चिथवण्याचा त्यांचा इरादा होता किंवा नाहीं, हें निश्चयानें सांगवत नाहीं, कारण दुर्दैवानें त्या पक्षाला माहीत नव्हते अशा कांहीं दांडग्या आणि जिवावर उदार माणसांनीं, **चार्लस** व **जेम्स** हे उभयतां **न्यूमार्केटाहून लंडनास** येणार होते तेव्हां, वाटेंत **हर्टफर्डशायरांतील,** एका **राइ हौस** नांवाच्या आडवळणी ठिकाणीं, त्यांना दग्यानें ठार मारण्याची गुप्त मसलत केली होती. ती मसलत उघडिकेस आली, आणि त्या प्रमुख **व्हुइग्सांना** तीविषयीं मुतराम वार्ताही माहीत नसतां, राजाच्या वकी-

शाफ्ट्स्बरीचा अपकर्ष १६८२.

राइ हौस प्लॉट, माहे जून १६८३.